

# माणूस
साप्ताहिक

८ ऑक्टोबर १९६६
चाळीस पैसे





## राजसूय...

✳ पूर्वी राजे राज्यविस्तारासाठी राजसूय यज्ञ करीत असत.

## ✳ प्रजासूय...

आज काळ आहे प्रजासूय यज्ञाचा
प्रजेने, सर्वसामान्य जनतेने आपल्या विकासासाठी,
आत्मस्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी,
परस्परांच्या हिताची व देशाच्या उभारणीची लहानमोठी कार्ये
स्वयंप्रेरणेने पुढे येऊन सिद्ध करण्याचा.

## माणूस प्रतिष्ठान

म्हणजे 'माणूस' साप्ताहिकाच्या असंख्य वाचकांनी
स्वयंप्रेरणेने आरंभिलेला एक प्रजासूय यज्ञच आहे.

* विक्री झालेल्या दर अंकाच्या दर प्रतीमागे ४० पैशांतीलच एक पैसा 'माणूस प्रतिष्ठान' साठी (माणूस फौंडेशन) वेगळा शिल्लक टाकणे.
* या शिल्लक निधीतून सर्वप्रथम महाराष्ट्रातला एखादा लहानसा मागासलेला भाग निवडून तेथे अन्नधान्य वाढीसाठी उपयुक्त ठरणारी पाणीपुरवठ्याची काही कामे पुरी करणे—
  विहिरी, तळी, एखादा छोटा तलाव इत्यादी.

येत्या २॥ वर्षांत १। लाख रुपयांचा निधी
या कार्यासाठी उभा राहावा असा संकल्प आहे.
यासाठी 'माणूस' साप्ताहिकाच्या १। लाख प्रतींची विक्री
दर आठवड्याला होणे अवश्य आहे.




## एक समग्र साप्ताहिक

*वर्ष – सहावे*
*अंक : चौदावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**

*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**

*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.*

*दूरध्वनी – ५७३५१*

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्रमैत्री

**स. न.** १३–९–६६

'माणूस'चा मी सुरुवातीपासून वाचक आहे. आतापर्यंत आपण 'माणूस'-मधून प्रकाशित केलेलं लिखाण जितकं वाचनीय तितकंच दर्जेदार पण होतं. 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' सारख्या लेखमाला 'माणूस'ची लोकप्रियता वाढवायला कारणीभूत झालेल्या आहेत. 'माणूस'चं रूपांतर साप्ताहिकामध्ये झालेलं पाहून विशेष आनंद वाटला. 'साप्ताहिक' स्वरूपात 'माणूस' निघाल्यानंतरचे सुरुवातीचे दोन अंक मला इकडे मिळाले नाहीत. अर्थातच त्यामुळे चुकल्यासारखे वाटले. सदरहू दोन अंक उपलब्ध असल्यास व्ही. पी. ने पाठवावे. नवीन सदरे, एकंदर मांडणी वगैरे आकर्षक वाटली. 'माणूस'कडून आमच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. आपल्या संपादकत्वाखाली 'माणूस' उत्तरोत्तर प्रगती करील, अशी अपेक्षा बाळगून आहे.

— **कृ. बा. देशपांडे**, गोवा.

**स. न.** २४ सप्टेंबर, ६६

आता आपल्या हितचिंतकासाठी 'माणूस'ची किंमत पाच पैसे वाढवून दसऱ्याच्या सुमुहूर्तावर, सीमोल्लंघन करा.

गुजराती, हिंदी व कानडी या महाराष्ट्रावर फारच प्रेम करणाऱ्या बांधवांना, आता आपल्या लेखणीचे अस्सल राष्ट्रीयत्व जरा कळू द्या. शनिवारी 'माणूस' वाचल्याशिवाय जेवणार नाही, अशी अवस्था करा. दर आठवड्याला वाट पाहणारा

— **एक लहान माणूस**, बेळगाव



## ☐ गद्धे पंचविशी !

भारताला आर्थिकदृष्ट्या वाईट दिवस आहेत व याला काँग्रेस राज्य जबाबदार आहे, असे म्हणणाऱ्यांचे परवा चांगले दात पडले. तहत अमेरिका, रशियापासून तो मादागास्कर, थायलंड, ग्रीनलंड, फिनलंडपर्यंत सर्व देशांनी भारताला देऊ केलेल्या कर्जांचे आकडे वाचून, आतापर्यंत सर्वांची अशी समजूत होती की भारत हळू हळू दिवाळखोर होत आहे. विरोधी पक्षांचे पुढारी आपल्या भाषणांतून मुख्यत: याच गोष्टीचे भांडवल करून, आपल्या सभांना गर्दी जमवीत होते. या सर्वांचे तोंड बंद करणारी सनसनाटी कृती श्री. मनुभाई शहांच्या स्मिताळलेल्या फोटोसह सर्वत्र जाहीर झाली आहे. वृत्तपत्रांनी ठळक अक्षरांत बातमी दिली आहे– 'भारताचे इंडोनेशियाला दहा कोटींचे कर्ज !' पुष्कळांनी आपल्या वाचनात काहीतरी गफलत होते आहे म्हणून, ही बातमी पुन: पुन्हा वाचली असेल व त्यातील अर्थ लक्षात येताच अनेक वाचकांना धक्का बसला असेल यात शंका नाही. अनेकांना रात्रपाळीच्या उपसंपादकाने 'इंडोनेशियाचे भारताला कर्ज' या बातमीचा असा विचका केल्याची शंका आली असेल व पुढची संपूर्ण बातमी वाचताना त्यांनी स्वत:ला चिमटा काढला असेल !

हा चिमटा खरोखरच काँग्रेस सरकारने विरोधी पक्षांच्या मर्मस्थानी काढलेला आहे. योजना फसल्या आणि देश दिवाळखोर होत चालला म्हणता काय ? आता बोला ! दहा कोटी रुपयांचे कर्ज भारताने इंडोनेशियाला देऊ केले ते काय योजना फसल्या म्हणून ! इंडोनेशियाचे सुलतान बुवानो यांचा चेहरा पाहा कसा उजळला आहे ! मनुभाईंचा चेहरा पाहा कसा समाधानाने फुलला आहे ! भारताने कर्ज दिले. आहात कुठे महाराज ? भारताची लोकसंख्या चाळीस कोटी आहे. म्हणजे भारतातल्या प्रत्येक माणसाने इंडोनेशियाला चार आणे दिले ! या पावलीचे म्हणणे काय आहे ? या भारतीय पावलीचे म्हणणे आहे–

तुझी माझी प्रीति कैशी सख्या कोठे गेली ।
मला वाटे रांड कोणी गडचा तुला प्यारी झाली ।। ( राम जोशी )

ताश्कंद करार करा, तरच मदत देतो अशी रशियाने भारताला अट घातली. युद्ध करणार नाही, असे वचन द्या, तरच शस्त्रे देतो, असे अमेरिकेने भारताला बजावले. अडलेल्या माणसांना खिंडीत गाठून असल्या अटी घालणाऱ्या या देशांसारखा

हा भारत नाही ! रशियाच्या काय किंवा अमेरिकेच्या काय मदतीला अशा ताडच्या लावलेल्या असतात. पण भारत सरकारने अशी कोणतीही अट इंडोनेशियाला घातली नाही. इंडोनेशियाचा सुलतान बुवानो उगाचच घाबरत होता ! त्याला भीती वाटत होती की, यशवंतराव चव्हाण किंवा मनूभाई शहा म्हणतील–

" हरामखोरांनो, भारत–पाक युद्धात तुमचा देश पाकिस्तानच्या बाजूने उभा केलात ! नेहरूंनी केलेले उपकार विसरून तुमचा ऐदी हुकूमशहा डॉ. सुकार्नो याने आयुबच्या गळ्यात हात टाकला. डॉ. सुकार्नोला गचांडी मिळून तो हाकलला जाईपर्यंत भारताकडून एक छदाम मिळणार नाही ! "

असे काहीतरी दिल्लीत ऐकावे लागेल अशी भीती बिचाऱ्या सुलतान बुवानोला वाटत होती. खुळा कुठला ! अशी भीती बाळगण्याचे कारण काय ? नेहरूंनी केलेले उपकार कुणी आठवले तर इंडोनेशियाला जाब विचारणारे होते एवढी साधी गोष्टी बुवानोला समजू नये ना ? शिवाय मित्रांना अडीअडचणीला उपयोगी पडणारे पुष्कळ असतात. परंतु चोरांना, हरामखोरांना उपयोगी पडणारा जगात कुणी आहे का ? जगात जे नाही ते भारत पुरवतो ! बुवानो खजील झाला होता, पण भारताने त्याला लाजवले नाही. प्रत्येक भारतीय माणसाच्या खिशातून चार आणे काढून काँग्रेस सरकारने दहा कोटी रुपये बुवानोला दिले. चार आणे म्हणजे पंचवीस पैसे. या पंचवीस पैशांनी इंडोनेशियाची 'गद्धे पंचवीशी' संपून 'हरवलेली प्रीत' लाभण्यासाठी हा सौदा आहे. भारत सरकारने एक चांगला धडा घालून दिला आहे. गुरूपदेश घेऊन गेलेला हा बुवानो आता इंडोनेशियासाठी कर्जाचे डोंगर उभारून लवकरच भारताला या बाबतीत मागे टाकील, अशी आशा आपण करूया !

## □ मौनास्त्र आणि महात्मा !

दक्षिण आफ्रिकेचा पंतप्रधान व्हेरवोर्डसाहेब याचा वध झाला. व्हेरवोर्डसाहेबाने दक्षिण आफ्रिकेत वर्णद्वेष माजवला. म्हणजे वर्णभेद होताच, पण त्याच्याच आधारावर त्याने मूठभर गोऱ्यांचे राज्य बहुसंख्य काळ्या माणसांवर चालेल अशी व्यवस्था दंडुकेशाहीच्या जोरावर तिथे अंमलात आणली. वस्तुतः, प्रत्येक बाबतीत गोरेपणा हा काळ्यावर मात करीत असतो. तरुण मुलांना वधू गोरी लागते. मूठभर गोऱ्या मुलींनी लग्नाच्या बाजारात बहुसंख्य काळ्या मुलींवर सतत अन्याय चालवलेला आहे. 'गोरी' ( स्मार्ट याला तरतरीत हा मराठी प्रतिशब्द तितकासा स्मार्ट नाही ! ) व 'अव्यंग वधू पाहिजे' अशी जाहिरात देऊन, या क्षेत्रात सतत वर्णद्वेष माजवला जात असतो. मुळात काळ्यात जमा असणाऱ्या भारतीयांना वधू मात्र गोऱ्या लागतात. हा अन्याय आहे, वर्णभेद आहे, वर्णद्वेष आहे. वाघ हा पशूंचा आयाळ नसलेला राजा असला, तरी पांढऱ्या वाघिणीला अव्वाच्या सव्वा किंमत देऊन 'राणीच्या बागे'त खास तैनातीत ठेवण्यात येते. पांढऱ्या वाघिणी-

विषयी दाखविण्यात येणारी ही पक्षपाती वृत्ती याच वर्णद्वेषाची द्योतक आहे पांढऱ्या पोशाखात नखशिखांत वावरणाऱ्या काँग्रेस उमेदवारांना भारतात मतांचा तुटवडा कधीच पडत नाही. याला मुख्य कारण खादीचा पांढरा रंग !

पांढऱ्या रंगावर, गोरेपणावर, प्रेम करण्याचे हे वर्णद्वेषी वेड भारतातही फोफावलेले आहे. दक्षिण आफ्रिकेत गोऱ्यांचे अधिराज्य निर्माण करणाऱ्या व्हेरवोर्ड याचा वध झाला आणि सर्वत्र काळजी काय व्यक्त झाली ? वध गोऱ्याने केला की काळ्याने ? आता वध होणे जर अवश्यच असेल तर तो गोऱ्याने केला काय आणि काळ्याने केला काय ? परन्तु नाही. तिथेही पुन्हा वर्णभेद ! हा वध एका गोऱ्या माणसाने केला हे जाहीर होताच, सर्वांनी निःश्वास टाकला. निदान व्हेरवोर्डला काळ्याकडून तरी मरण आले नाही! काळ्याकडून मरण येते तर बाकी काळ्यांची कंबक्तीच होती. गोऱ्यांनी त्यांची घरेदारे जाळून टाकली असती. परंतु मारणारा मनुष्य गोरा आहे, हे कळताच जमविलेले सर्व ' इंधन ' तसेच रोखून धरण्यात आले असावे.

आता व्हेरवोर्डने जे कायदे केले, ते सर्व वर्णभेदावर अधिष्ठित होते. व्हेरवोर्डच्या राज्यात हे कायदे काळ्या बहुसंख्याकांना मान्य नव्हते. ज्यांनी कायदे मोडले त्यांना व्हेरवोर्डने कडक शासन केले. कायदे बदलणे शक्य नसल्याने एका गोऱ्याला काळ्यांचा कैवार आला व त्याने व्हेरवोर्डचीच परलोकात बदली केली.

वध झाला ! आता प्रश्न आला या वधाबद्दल दुःख व्यक्त करायचे, आनंद व्यक्त करायचा की आपले तटस्थ राहायचे ! कुणाचाही वध म्हटला की, तो निषेधार्हच असे काहींना वाटते. रामरावण युद्ध पाहतानादेखील रावणाच्या वधानंतर या माणसांना दुःख होते. दुःशासनाची माणुसकी, औरंगजेबाची सहृदयता, शिवाजीची कपटनीती, हे सर्व यांचे खास संशोधनाचे विषय असतात.

अशा बाबतीत भारतात काँग्रेसभक्तांची मोठी दीनवाणी परिस्थिती होते. व्हेरवोर्डची धोरणे वाईट परन्तु त्याचा वध व्हायला नको होता, असे लोकसभेतील काँग्रेस पक्षाचे खरेखुरे मत. कारण कुणाचाही वध हा अहिंसेत बसत नाही, असे रोखठोक मत असायला काही हरकत नाही. गांधीजींचे ठीक होते. त्यांची जी काही मते होती ती त्यांनी कुणाच्या भीड-भिकेची पर्वा न करता रोखठोक मांडली. १९२९ साली, महात्माजी अशा पेचात होते, पण ते पेचात पडले नाहीत. २३ डिसेंबर १९२९ ला त्या वेळचे भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड आर्यविन यांच्या गाडीवर नव्या दिल्लीजवळ बाँब फेकण्यात आला. लॉर्ड आर्यविन वाचले. काही दिवसांतच लाहोर येथे काँग्रेस अधिवेशनात यासंबंधी महात्माजींनी बाँबफेकीचा निषेध करण्याचा आग्रह धरला. गांधीजींनी स्वतःच हा ठराव लिहिला व मांडला. हा ठराव असा आहे —

" व्हाईसरॉयसाहेबांच्या गाडीवर जो बाँब फेकण्यात आला, त्या अत्याचाराचा

काँग्रेस धिक्कार करते व पुन्हा जाहीर करते की, काँग्रेसच्या ध्येयधोरणाला विरोधी अशीच केवळ ही घटना नसून, अशा अत्याचारांनी राष्ट्रहिताची हानीच होते. व्हाईसरॉय, त्यांच्या पत्नी लेडी आर्यविन, त्यांचे अंतेवासी व बिचारे नोकर हे सुदैवाने यातून वाचल्याबद्दल, ही काँग्रेस त्यांचे अभिनंदन करीत आहे."

व्हाईसरॉय वाचला म्हणून अभिनंदन करण्याची ही महात्माजींची भूमिका त्यांच्या भित्रेपणाचे अंगी नव्हती. कारण भगतसिंग, राजगुरू, सुखदेव या तिघांची फाशी रद्द करण्यासाठी याच आर्यविन साहेबांकडे गांधीजींनी केलेल्या रदबदलीला अपयश येऊन २३ मार्च १९३० रोजी हे तिघे फासावर चढले. या वेळी गांधीजींनी जो ठराव केला तो असा होता –

"राजकारणात कोणत्याही स्वरूपाच्या हिंसाचारापासून अलिप्त असणारी ही काँग्रेसची सभा, भगतसिंग व त्यांचे सहकारी यांच्या शौर्याची व त्यागाची तारीफ करते व मृतांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी होऊ इच्छिते."

स्वातंत्र्य मिळताक्षणीच म्हणूनच महात्माजींनी सांगितले – "बाबांनो, आता काँग्रेस बरखास्त करा!" कारण त्यांना अनुयायांची शंका वाटत होती. परन्तु महात्माजींची ही भीती त्याच्या अनुयायांनी गेल्या १८ अठरा वर्षांत खोटी पाडली आहे.

व्हेरवोर्डसाहेबांचा खून झाला, याचा काँग्रेस पक्ष निषेध करतो की, आनंद प्रदर्शित करतो, याची बघे वाटच पाहत होते. जो तो गप्प होता. सर्व थोर पुढाऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आहेत, असे वाटत होते. कुणी म्हणत ते आनंदाश्रू आहेत, कुणी सांगत ते दु:खाश्रू आहेत. सगळीकडे 'तेरी भी चूप मेरी बी चूप.' इंदिराजी, कामराज, यशवंतराव...ते सिंडिकेट का कुणी आहेत ते. कुणी काही बोलेना. या मौनास्त्राचा असा प्रभाव पडला की, विचारू नका! लोकसभेत शेवटी कुणी अपक्षीय स्वतंत्र सभासदाने व्हेरवोर्डसंबंधी दुखवटयाचा ठराव आणला. भल्या-भल्यांना वाटले, आता हे शिष्यवर काहीतरी बोलणार! पुन्हा सगळीकडे चुपचाप काँग्रेस पक्षाच्या प्रतोदाने सूचना दिली. "काहीही बोलायचे म्हणून नाही!"

अडचणीतून सुटण्यासाठी लोकसभेने हा ठरावच नियमबाह्य ठरवला! दक्षिण आफ्रिकेशी भारताचे राजकीय संबंध तुटलेले आहेत. तेव्हा हा ठराव लोकसभेत येऊच शकत नाही, अशा मुद्यावर ठराव निकालात निघाला. काही काही बाबतींत गांधींचे शिष्य गुरुपेक्षा श्रेष्ठ आहेत, हे अधूनमधून भारतीयांना कळते हे ठीक आहे! ●

---

☐ विनोद करण्याची माझी तऱ्हा म्हणजे सत्य सांगणे. सत्य हे या जगात सर्वांत मजेशीर असते.

—बर्नार्ड शॉ

---

# शंभर मण गुलाब

एर्नाकुलम येथील शास्त्री नगरात भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे सूप वाजले. सालाबादप्रमाणे यंदाही अधिवेशनात बडचाबडच्यांच्या भाषणांची आतषबाजी उडाली, ठरावांचे नगारे झडले. शिवाय निवडणूक-जाहीरनाम्याचे रणशिंगही फुंकले गेले. काटकसरीचे व साधेपणाचे प्रदर्शन म्हणून इंदिराजी खास मोटारीशिवाय साध्या बसने अधिवेशनाच्या ठिकाणी पोहोचल्या. गहू व तांदूळ वर्ज्य करून विद्यार्थिनींनी तयार केलेल्या काही खाद्यपदार्थांनी कँटीनमध्ये जाऊन इंदिरा-कामराजांची चव घेऊन हेही दाखवून दिले, की, देशात अन्नधान्यटंचाई आहे याची आपल्याला जाणीव आहे.

पण सोंग ते सोंगच ! केव्हा उघडे पडून लाज काढील याचा काय नेम ! येथेही तसेच झाले. केरळचे माजी राज्यपाल श्री. ए. पी. जैन अधिवेशनात भाषण करताना व्यासपीठावर बसलेल्या सर्व बडचा नेत्यांना उद्देशून म्हणाले, "आपण सर्वांनीच बचतीचा, उधळपट्टी न करण्याचा, काटकसरीचा आदेश आपल्या भाषणांतून जनतेला दिलात. पण कालच येथील एका बडचा हॉटेल मालकाने आपल्या सर्वांना मोठा अलिशान खाना दिला. त्याला आपण कसे काय हजर राहिलात ! या खान्याच्या रोषणाईसाठीच कित्येक हजार रुपयांचा चुराडा उडाला आहे. मी केरळचा राज्यपाल असताना अशा कोणत्याही खान्याला हजर न राहण्याचा नियम कटाक्षाने पाळत होतो. फक्त नेपाळनरेशांच्या स्वागतप्रसंगी मला हा नियम एकदा—एकदाच मोडावा लागला. काल रात्रीच पंचपक्वान्नांवर ताव मारणाऱ्यांनी आज भाषणातून साधेपणाचा, काटकसरीचा आदेश जनतेला द्यावा, हे किती विसंगत आहे ! जनतेला हे कसे पटणार !".....

असेच एक मागे घडलेले उदाहरण आठवते. रुपयाचे अवमूल्यन झाले. स्वदेशी बचत, आर्थिक शिस्त, भाववाढीला आळा घालणे, निर्यात वाढ करणे वगैरे उपाययोजनांसाठी एकदम धावपळ सुरू झाली. सरकार आता काहीतरी क्रांतिकारक पाऊल उचलणार, पुन्हा अवमूल्यन करण्याची पाळी येऊ नये म्हणून या वेळी आता अगदी निर्णायक स्वरूपाची कृती सरकारकडून होणार अशी उगीचच वेडी आशा लोकांच्या मनात निर्माण झाली. सरकारनेही सुरुवात तर जोरदार केली. दिल्लीत कॅनॉट प्लेससारख्या श्रीमंती मध्यवस्तीत स्वस्त व प्रामाणित दराने ग्राहकांना नित्यो-

# एकच चमचा साखर

पयोगी वस्तू पुरविण्यासाठी एक प्रचंड ग्राहक–भांडार सरकारतर्फे उघडण्यात आले. पण उद्घाटनाचा जल्लोष उडवून सरकारने आपले खरे स्वरूप उघडे केले तें केलेच. असे छापून आले होते की या उद्घाटनप्रसंगी जी गुलाबपुष्पे उधळली गेली त्यांचे वजन भरले सुमारे दहा मण! जय स्वावलंबन! जय खर्चकपात! आता लवकरच मुंबईतही मॅजेस्टिक हॉटेलमध्ये याच धर्तीचे एक सरकारी दुकान सुरू होणार आहे. याही प्रसंगी काटकसरीचे काही नवे उच्चांक प्रस्थापित होतील, अशी आशा बाळगण्यास काहीच हरकत नाही!

पण केरळचे राज्यपाल श्री. जैन यांच्यासारखी काही 'जागरूक' माणसे कुठे कुठे तुरळकपणे या फाटलेल्या आकाशाला ठिगळ लावण्याचा मनापासून प्रयत्न करीत असतात हे ऐकून मोठे कौतुक वाटते. राज्यकर्ते नादान निपजले तरी जनतेची सदसद्‌विवेक बुद्धी जागृत आहे हे पाहून देशाच्या भविष्याविषयी आशा वाटू लागली. भारताचे माजी अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांचे बंधू श्री. पुंडलीक द्वारकानाथ देशमुख व त्यांचे काही सहकारी यांनी नागपुरात स्वदेशी स्वावलंबन खर्चकपातीसाठी अशीच एक लहानशी चळवळ चार–सहा महिन्यांपासून सुरू केली आहे. तिची दखल फारशी कुणी घेतली नसल्याने सहज त्यासंबंधी कुतूहल वाटले व 'माणूस'ने आपल्या प्रतिनिधीला पाठवून चळवळीसंबंधी थोडी अधिक माहिती गोळा केली.

श्री. देशमुखांनी पुढे केलेल्या चहाचा घुटका घेताघेताच 'माणूस'चे प्रति-



सुधारणेची सुरुवात घरापासूनच....
श्री. देशमुख

निधी पुटपुटले, "खरोखर या महागाईला तोंड देणे कठीण आहे."

"प्रयत्न केला तर काही कठीण नाही. आता हेच पाहा ना, मी पूर्वी चहात तीन चमचे साखर घेत होतो. पण आता एकच घेतो. सवय व्हायला वेळ लागला. पण ते आता जाणवतही नाही. महागाई कमी होणार नाही. तुमच्या सवयी व अनाठायी खर्च कमी करावा लागेल. चित्रपट न पाहता आपण राहू शकतो. इतर व्यसनांचाही त्याग करावयास हवा," श्री. देशमुख.

स्वत: श्री. देशमुखांनी हा त्याग केला आहे. ते धूम्रपान करीत नाहीत, चित्रपट बघत नाहीत. अनावश्यक कापडखरेदी त्यांनी रद्द केली आहे. महाग टूथपेस्ट, शेव्हिंग क्रीम्स्, ब्लेड्स् विकत घेण्याऐवजी ते टूथपावडर, शेव्हिंग केक व ब्लेडशार्पनर वापरतात. त्यामुळे बराच खर्च कमी होतो.

"आम्ही मात्र उगाच तुमचा चहाचा खर्च वाढविला–" माणूस प्रतिनिधी.

"छे... छे..." श्री. देशमुख म्हणाले. "माझा नियमच आहे की, चहाच्या वेळेवर कुणी पाहुणे आले तरच त्यांना चहा द्यायचा. एरवी नाही. आपल्या आदरातिथ्याच्या कल्पना बदलल्या पाहिजेत. चैनीच्या वस्तूंना फाटा देऊन आवश्यक त्या वस्तूंवरच खर्च करण्याची सवय लागली पाहिजे. कदाचित पुढे आणखीही अवमूल्यन होईल. त्याची तयारी आतापासून करावयास हवी."

"पण हे काटकसरीचे मार्ग सामान्यांनीच वापरायचे काय ?–" प्रश्न.

"केवळ सर्वसामान्यांनीच नव्हे तर बड्यांनीही. सुखवस्तू, श्रीमंत लोक आपल्या चैनीच्या वस्तूंवरील खर्च कमी करतील तर कितीतरी बचत होईल."

श्री. देशमुख यांचा कुटुंबनियोजनावर विशेष भर आहे. कुटुंब नियोजनात केवळ संततिनियमनच त्यांना अभिप्रेत नसून त्यामध्ये सबंध कुटुंबाने राहावे कसे, आपल्या सवयी कशा ठेवाव्या, महिन्याचा व सबंध वर्षाचा खर्च कसा आखावा याची संपूर्ण योजना त्यांना अभिप्रेत आहे व त्या दृष्टीने ते प्रचार करीत असतात. श्री. देशमुख हे माजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे चिटणीस होते. सेवानिवृत्तीनंतर ते नागपुरात स्थायिक झाले. काही दिवसांपूर्वी त्यांचा मासिक खर्च पाचशे होता तो वाढत्या महागाईने साडेसातशेवर नेला. त्यांनी लगेच पत्नीशी चर्चा करून वर सांगितल्याप्रमाणे धोरण आखले व खर्च आपल्या आवाक्यात बसविला.

श्री. देशमुखांप्रमाणेच मोठ्या प्रमाणावर लोकजागृती निर्माण करण्यासाठी नागपूरचे सामाजिक कार्यकर्ते श्री. मा. ज. कानेटकर व श्री. डी. टी. देशपांडे हे प्रयत्न करीत आहेत. स्टेनलेस स्टीलची भांडी, टेरीलीन, ६० कौन्ट सुतावरील कपडा व चैनीचे कोणतेही परकीय सामान खरेदी करू नये अशा तऱ्हेचा जोरदार प्रचार ते करीत असून त्यासाठी ते गल्लीगल्लीतून, पेठापेठांमधून गटबैठकी घेत आहेत, घरोघरी समजावून सांगत आहेत व तशी आवाहने करणारी भित्तिपत्रके ठिकठिकाणी चिकटवीत आहेत.

श्री. कानेटकर व देशपांडे यांनी १९६०–६१ साली झालेल्या नॅशनल सॅंपल सर्व्हेतील काही बोलकी आकडेवारीच 'माणूस' प्रतिनिधीपुढे ठेवली. या आकडेवारीनुसार देशातील एकूण कुटुंबांचा वार्षिक खर्च १२,६०० कोटी रुपये एवढा आहे. त्यातील ६,६०० कोटी रुपये जीवनावश्यक वस्तूंवर व माफक चैनीच्या वस्तूंवर होतो. उरलेला खर्च अगदी अनावश्यक अशा केवळ चैनीच्या वस्तूंवर होतो. हे ६००० कोटी रुपये वाचविले तर देशाची आर्थिक स्थिती किती तरी सुधारेल, असे श्री. कानेटकर–देशपांडे यांना वाटते. म्हणून त्यांच्या प्रचाराचा रोख श्रीमंत सुखासीन वर्गाकडे विशेष आहे.

श्रीमंत सुखासीन वर्ग किंवा त्यांचेच प्रतिनिधित्व करणारे आजचे सरकार यांच्यावर या लहानशा चळवळीचा परिणाम किती होईल, हे सांगणे कठीण आहे. पण सर्वसामान्य मध्यमवर्गीय व गोरगरीब जनता अशा चळवळीत थोडा अधिक नेटाने प्रयत्न केला तर सहभागी होणें अशक्य नाही. ● ● ●

# इच्छापूर्ती....डॉ. चंपकरमण पिलाई

स्वातंत्र्यवीरांची भारतामध्ये जेवढी उपेक्षा, अवहेलना झाली तेवढी कोठेही, केव्हाही झाली नसावी; नाहीतर चालू शतकातील एका आद्य क्रांतिकारकाची, एका थोर देशभक्ताची इच्छा परिपूर्ण करण्यास स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९ वर्षे लागती ना ! आणि ही इच्छाही तशी अवघड होती असे नाही.

जर्मनीत १९३४ साली निधन पावलेल्या डॉ. चंपकरमण पिलाई यांनी ह्यातभर फक्त भारतीय स्वातंत्र्याचाच ध्यास घेतला होता. त्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. अविरत परिश्रम केले व त्याकरिताच त्यांना वयाच्या केवळ ४५ व्या वर्षी अकाली मृत्यूला सामोरे जावे लागले. वयाच्या १७ व्या वर्षानंतरचे सर्व आयुष्य परदेशांत काढलेल्या या देशभक्ताची मनीषा एकच होती. मायदेशी परतायचे ते प्रजासत्ताक भारताचा झेंडा डौलाने फडकत असलेल्या बलशाली युद्धनौकेतून.

दुर्दैवाने ही मनोकामना पूर्ण होण्याआधीच त्यांना मृत्यू आला. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी त्यांच्या अस्थी एका कलशात घालून १९३५ सालीच भारतात आणल्या. त्यानंतर १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले आणि आपल्या दिवंगत पतीची अपुरी राहिलेली इच्छा आता तरी पूर्ण करावी म्हणून त्यांच्या मनाने उचल घेतली. त्या मुंबईतील त्या वेळचे काँग्रेस कार्यकर्ते स. का. पाटील आदींना भेटल्या. डॉ. पिलाई स्मारक समितीही स्थापन झाली. दोन-तीन वर्षे स्मृतीसभाही भरल्या. मोठमोठ्या नेत्यांनी डॉ. चंपकरमण यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

पण त्यापुढे प्रगती शून्य. शेवटी लक्ष्मीबाईंनीच पुन्हा पुढाकार घेतला. सगळीकडची सूत्रे हलविण्यास प्रारंभ केला व गेल्याच आठवड्यात डॉ. चंपकरमण पिलाई यांच्या अस्थी भारतीय नौदलाच्या 'आय एन एस दिल्ली'-मधून मुंबईहून कोचीनला नेण्यात आल्या. एर्नाकुलम येथे काँग्रेस अधिवेशनात दर्शनार्थ ठेवल्यानंतर, अस्थिकलश त्यांच्या जन्मग्रामी नेण्यात आला व एका महान क्रांतिकारकाची इच्छा अंशत: सफल करण्याचे भाग्य दिरंगाई करून का होईना, पण या देशाने मिळविले.

डॉ. चंपकरमण पिलाई स्मारक समिती विसर्जित झाल्यासारखीच दिसते. इंडियन मर्चंटस् चेंबरचे त्या वेळचे अध्यक्ष श्री. चिमणलाल बी. पारीख यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने आजपर्यंत काहीच केले नाही, असे खेदपूर्ण उद्गार लक्ष्मीबाई यांनी अस्थीबरोबर मुंबई सोडताना काढले. डॉ. पिलाई यांची स्मृती आता फक्त ते जन्मले त्या गावातच राहणार आहे.

## भारताबाहेर प्रयाण

त्रावणकोरच्या एट्टुविट्टील पिलाई या घरंदाज कुटुंबात डॉ. चंपकरमण यांचा १८९१ साली जन्म झाला. देशात सर्वत्र स्वातंत्र्याचे नवे विचार मूळ धरत असतानाच ते वयात आले. वयाच्या केवळ १२ व्या वा १३ व्या वर्षात असतानाच त्यांनी आपल्या गावी काही मुले जमविली व 'जयहिंद'चा पुकारा केला असे म्हणतात. पुढे तर त्यांनी करविरोधी मोहीम सुरू केली. ते घरोघरी जात व जुलूमजबरदस्ती करणाऱ्या ब्रिटिश सरकारने लादलेले कर बिलकुल देऊ नका, असे आग्रहाने सांगत.

यामुळे त्यांच्यावर सरकारी रोष ओढवला. पोलिसांच्या करड्या नजरेत आपल्याला जराही हालचाल करणे मुष्कील आहे, हे पाहून त्यांनी १९०८ साली भारताबाहेर पाऊल काढले. मनात ईर्षा एकच, मी देशात पेटलेली क्रांतीची ज्वाला अवघ्या जगापर्यंत नेऊन पोचवावी, सगळ्या जगाला माहिती करून द्यावी, की भारतात काय पेटते आहे !

परदेशांत गेल्यावर त्यांनी प्रथम आपले शिक्षण पूर्ण केले. स्वित्झर्लंड, इटली, जर्मनी अशा देशांतून जाऊन त्यांनी इंजिनियरिंग व अर्थशास्त्र या दोन विषयांतील डॉक्टरेट घेतली. एकीकडे संबंध जोडण्याचे, संधान बांधण्याचे काम चालूच होते. अशाच प्रयत्नांत त्यांच्या ध्यानी आले, की ब्रिटिशांच्या जाचातून मुक्त होण्यास भारताला जर्मनांचा पाठिंबा व सहानुभूती मिळू शकेल. आयरिश क्रांतिकारक सर रॉजर कॅसमेंट यांची व डॉ. पिलाई यांची चांगली दोस्ती होती. सर रॉजर हे आयरिश स्वातंत्र्य लढ्याकरिता जर्मनांची मदत घेतच होते.

एकदा जर्मनीत या कामासाठी गेल्यावर डॉ. पिलाई यांनी प्रत्यक्ष कैसर व जर्मन नाविक अधिकाऱ्यांशीच संबंध जोडला. हिंदी महासागरात युद्धनौका

पाठविल्यास आपण तीबरोबर जाऊ असे त्यांनी जर्मन नौदलास सांगितले. त्याप्रमाणे पहिल्या महायुद्धाच्या काळात एम्डेन ही युद्धनौका हिंदी महासागरात आली व तिने दक्षिण भारताच्या किनाऱ्यावर बाँबफेकही केली. या हल्ल्याची सूत्रे डॉ. पिलाई यांच्याच हाती होती. फक्त सार्वजनिक व लष्करी मालमत्तेचे नुकसान करावयाचे, एकाही भारतीयाच्या जिवास धोका पोचता कामा नये, अशा त्यांच्या सक्त सूचना होत्या. असे म्हणतात की, या काळात ते एकदा भारतीय भूमीवर येऊनही गेले.

या कारवाईनंतर ब्रिटिश सत्तेचा डॉ. पिलाई यांच्यावर रोष होणे स्वाभाविकच होते. त्यांच्या मस्तकासाठी ब्रिटिशांनी एक लाख पौंडांचे बक्षीस लावले होते व नंतरच्या काळात माताहारीसारख्या मातबर स्त्री-हेरास, त्यांना पकडण्याचे काम दिले होते. पण व्यर्थ.



हिटलरकडूनही खुलासा मागितला... डॉ. पिलाई

## स्वतंत्र सरकारची स्थापना

डॉ. पिलाई यांचे युरोपातील कार्य (१९०८ ते १९३४) म्हणजे देशप्रेमाने वेड्या झालेल्या तरुणाची धगधगती जीवनगाथाच आहे. या काळात त्यांनी अमेरिकेपासून तुर्कस्थानपर्यंत व दक्षिण आफ्रिकेपासून स्वीडनपर्यंत प्रवासही केला व भारतीय स्वातंत्र्याची महती त्या त्या देशांच्या जनतेला पटविण्याचा प्रयत्न केला. लाला हरदयाळ, बरकतुल्ला, चंद्र के. चक्रवर्ती, कृष्ण वर्मा, एच्. लाल गुप्ता या क्रांतिकारकांच्या डॉक्टरांच्या घरी बैठकी होत. त्यांनी सर्वांनी मिळून भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे परदेशांतील पर्वच चालू ठेवले होते. पंडित मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल आदी नेते जर्मनीत गेले की कटाक्षाने डॉ. पिलाईंना भेटत. महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेत असताना डॉ. पिलाई त्यांना जाऊन भेटले होते. पण डॉक्टरांच्या तरुण पेटत्या मनास गांधींचे सत्याग्रह वगैरे मार्ग मानवले नाहीत.

डॉ. पिलाई यांनी अमेरिकेचे कर्नल एडविन इमर्सन, तुर्कस्थानचे वझीर तलत पाशा, अर्ल स्ट्रिकलँड वगैरे मंडळी आपलीशी केली होती. त्यामुळे डॉक्ट-

रांना त्या त्या देशांत आपले कार्य करण्यास सर्व सोयी उपलब्ध होत.

पहिल्या महायुद्धाच्या काळात 'फर्स्ट प्रोव्हिजनल गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया'ची १ डिसेंबर १९१५ ला स्थापना झाली. त्याचे अध्यक्ष होते राजा महेंद्र प्रताप व परराष्ट्रखाते डॉ. पिलाई यांच्याकडे होते. या सरकारचे काम काबूलमधून चाले. परराष्ट्र संबंधांचे काम डॉक्टर बर्लिनमधून पाहत. ब्रिटिश सरकारने १९२० साली अफगाणिस्तानात हस्तक्षेप केला तेव्हाच भारताच्या या पहिल्या सरकारचा कारभार खंडित झाला. तरी डॉक्टरांचे काम थांबले नाही. पायाला जणू भिंगरी लावावी असे ते सर्वत्र जात, तेथील भारतीयांशी संबंध जोडीत व स्वातंत्र्यलढ्याच्या परदेश विभागात त्यांना सामील करून घेत.

पहिल्या युद्धात फ्रान्समध्ये भारतीय सैनिक लढत आहेत, असे डॉक्टरांना कळले. तांबडतोब त्यांनी जर्मनीकडून एक विमान मिळविले, ढीगभर पत्रके घेऊन ते विमानाने फ्रान्समध्ये गेले व त्यांनी भारतीय सैनिक लढत असलेल्या भागात ती पत्रके विखुरली.

### या पत्रकात ते म्हणतात :

"गुलामगिरीच्या शृंखला तोडून मुक्त व्हा, अशी तुमच्या देशबंधूंची तुम्हांला हाक आहे. ही फार मोठी योग्य वेळ आहे. हिंदुस्थानातील तुमचे देशबांधव तयार आहेत, फिरंगी सत्ता नष्ट करण्यासाठी त्यांनी गनिमी युद्ध आरंभले आहे..... आणि तुम्ही फिरंग्यांसाठी रक्त सांडत आहात. तुमच्या मातृभूमीवर आक्रमण करणाऱ्याविरुद्ध तुम्ही शस्त्र उचलले पाहिजे."

महायुद्धानंतर लीग ऑफ नेशन्सची स्थापना झाली। डॉक्टरांना ही लीग मान्य नव्हती. जोपर्यंत जगातील निम्म्याहून अधिक जनता पारतंत्र्यात आहे, तोपर्यंत शांततेला काही अर्थ नाही, म्हणून त्यांनी 'इंटरनॅशनल लीग ऑफ दि ऑप्रेस्ड पीपल्स' ची स्थापना केली. या लीगतर्फे काढलेल्या एका पत्रकात ते म्हणतात : गेल्या काही काळातील भारतातील घटना पाहिल्या तर या देशात असमाधान आहे, हे स्पष्टच होते. स्वयंनिर्णय व स्वयंसरकार या जनतेच्या वादातीत हक्कांचीच भारत मागणी करीत आहे. अशा परिस्थितीत श्री. विल्सन (अमेरिकेचे अध्यक्ष) व इतर सहकारी मोठ्या अभिमानाने सांगतात तो न्याय आहे कोठे?

### नेताजींच्या गाठीभेटी

नेताजी सुभाषचंद्र बोस यांची व डॉ. पिलाई यांची पहिली मुलाखत व्हिएन्नामध्ये १९३३ साली झाली. डॉक्टरांचा परदेशातील साहसी कार्यक्रम पाहूनच नेताजी त्यांच्याकडे आकृष्ट झाले होते. त्यांची ही पहिली बैठक अनेक तास चालली. त्या वेळी सुभाषबाबू नॅशनल काँग्रेसचे काम करीत. त्या दोघांची दुसरी बैठक बर्लिनमध्ये त्याच वर्षअखेर झाली. भारतास मुक्त करण्याच्या परस्परांच्या कल्पनांची देवाणघेवाण झाली. सुभाष

बाबूंच्या आझाद हिंद फौज व आझाद हिंद सरकारने मूर्त आकार घेतला तो याच बैठकीनंतर.

डॉ. पिलाई यांनी १९१४ मध्येच बर्लिन येथे इंडियन नॅशनल पार्टीची स्थापना केली. अनेक वर्षेपर्यंत ते 'प्रो इंडिया' नावाचे एक पत्र जर्मनीमधून चालवत होते. परदेशांतील भारतीय जनतेला राजकीय दृष्टचा जागृत करणे, हाच आपल्या पत्राचा उद्देश असल्याचे त्यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले. मोठ-मोठचा राजकीय विचारवंतांचे लेख यामध्ये प्रसिद्ध होत. आफ्रिकेतील भारतीयांची पहिली काँग्रेस भरली तेव्हा डॉ. पिलाई यांनी त्यांना संदेश पाठविला. इंडियन मर्चंटस् चेंबरचे प्रतिनिधी म्हणूनही ते जर्मनीत काम पाहत.

अशा या थोर देशभक्ताचा अंत करुणाजनक झाला. हिटलरने भारत-विषयक काही अनुदार उद्‌गार काढले, तेव्हा डॉक्टरांनी 'प्रो इंडिया' पत्रात त्यावर लिहून खुलासा मागितला. हिटलरने आपले विधान दुरुस्त केले. परंतु डॉक्टरसाहेब मात्र हिटलरच्या मनातून उतरले. हळूहळू विष भिनत जाईल असे एक औषध त्यांच्या पोटात गेल्याने त्यांना मे १९३४ मध्ये संशया-स्पद रीतीने मृत्यू आला. त्यांच्या शेवटचा अंत्यविधी करण्यात आला.

डॉ. पिलाई व त्यांच्या पत्नीचे साह-चर्य काही वर्षांचेच. पण एवढ्या अवधीतच लक्ष्मीबाई त्यांच्या व्यक्ति-मत्त्वाने पार भारावून गेल्या. परदेशांत वावरलेल्या या बाईंनी एखाद्या सती-प्रमाणे आपल्या पतीच्या स्मृतीची पूजा बांधली. त्या डॉ. पिलाई यांचा अस्थि-कलश घेऊन १९३५ मध्ये भारतात आल्या. तेव्हापासून त्या मुंबईत एकाकी जीवन जगत आहेत. आजपर्यंत अस्थि-कलशाच्या रूपाने त्यांना पतीची तरी संगत होती, पण आता उतार वयात तीही हरपली आहे.

जमशेटजी टाटा रोडवरील रवींद्र मॅन्शनमधील एका बाजूच्या त्या खोलीत तो अस्थिकलश असल्याच्या भावनेची त्यांना इतकी सवय झाली होती की तो कलश तेथून हलविणार या व्यथेनेच त्या विषण्ण झाल्या होत्या. मुंबई प्रदेश काँग्रेसने अस्थी मिरवणुकीने नेण्याचा समारंभ आखला होता १७ सप्टेंबरला. पण १५ दिनांकापासूनच लक्ष्मीबाईंना अस्थिकलशाच्या विरह वेदनेने 'नर्व्हस-ब्रेकडाऊन'चा झटका आला होता. त्या कोणाला भेटत नव्हत्या, की बाहेर जात नव्हत्या. अस्थिकलशासमोर बसून अश्रू ढाळणे यातच त्यांचे दिवस चालले होते.

आणि शनिवारी 'आय एन एस दिल्ली'मधून अस्थिकलश नेण्याची वेळ आली. मुंबईचे महापौर श्री. पाटकर, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष श्री. पु. ग. खेर डॉक्टर पिलाई यांची थोरवी सांगत होते आणि तरीही लक्ष्मीबाईंच्या डोळ्यांतून पाणी ठिपकतच होते. पण त्यांत साफल्याच्या आनंदाचेही अश्रू होते. त्यांच्या पतीची अपुरी मनोकामना पूर्ण होत असल्याचे विलक्षण समाधान त्यांना झाले होते. ●


# मधू लिमये : लोकसभेतील संताजी

आमच्या प्रतिनिधीकडून

एस्. इ. एस्. कॉलेजचे सभागृह तरुण विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तुडुंब भरले होते. टाळ्या, शिट्या, हशा यांचा एकच गोंगाट चालू होता. पाहुणे येण्याची वेळ अद्याप व्हायची होती. त्या तरुणांची उत्कंठा क्षणाक्षणाला वाढत होती. आणि त्यांचा तारुण्यसुलभ उत्साह काबूत ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्वयंसेवकांच्या आणि प्राध्यापकांच्या नाकी नऊ येत होते.

तेवढ्यात उंच, भरदार बांध्याची, गोऱ्या चेहऱ्याची आणि गंभीर मुद्रेची श्री. मधू लिमये ही तरुण व्यक्ती व्यासपीठावर प्रवेश करती झाली आणि टाळ्यांच्या प्रचंड गजराने सभागृहाचे छप्पर दणाणून गेले. औपचारिक ओळख झाल्यानंतर श्री. लिमये यांनी 'मित्रहो' अशी आपल्या सुप्रसिद्ध खणखणीत आवाजात सुरुवात करून निमिषार्धात त्या तरुण श्रोत्यांची मने जिंकली. लोकसभेसारख्या रुक्ष विषयावरील रोखठोक भाषण त्या दिवसाएवढ्या तन्मयतेने आणि शांततेने त्या विद्यार्थ्यांनी क्वचितच ऐकले असेल. भाषण संपले तेव्हा स्वाक्षऱ्या घेण्यासाठी त्यांच्याभोवती जमलेल्या तरुण-तरुणींच्या घोळक्यातून बाहेर पडताना श्री. लिमये यांची पुरेवाट झाली.

मंत्र्यांनाही हेवा वाटावा असा प्रसिद्धीचा प्रकाशझोत संयुक्त समाजवादी पक्षाचे बिहारमधील मोंघीर जिल्ह्यातून १९६४ च्या पोटनिवडणुकीतून लोकसभेत निवडून आलेले, ४४ वर्षांचे खासदार श्री. मधू रामचंद्र लिमये यांच्यावर, गेल्या केवळ एका सांसदीय अधिवेशनात त्यांनी बजावलेल्या कामगिरीमुळे एकवटला आहे. आणि त्यांचे यशच तसे उज्ज्वल आणि डोळ्यांत भरणारे आहे. आपल्या चौफेर हल्ल्याने त्यांनी पराक्रमी अभिमन्यूप्रमाणे बड्या बड्या सत्ताधारी, खंद्या, चतुरस्त्र पुढाऱ्यांना हतप्रभ करून त्यांना पळता भुई थोडी केली आणि आजपर्यंत कुणी मिळवला नाही असा 'हीरो ऑफ पार्लमेंट' हा सर्वांनी स्वयंस्फूर्तीने बहाल केलेला किताब त्यांनी मिळविला. देशाच्या कानाकोपऱ्यातून त्यांना शेकड्यांनी पत्रे आली . . . "आजपर्यंत आम्हांला सांसदीय कामकाजात काहीच रस वाटत नव्हता. आपण आम्हांला जागृत केलेत याबद्दल धन्यवाद."



## १८ हजार रुपये किमतीचा तास

आपल्या पक्षाच्या रोखठोक, सर्वांगीण आणि सर्वंकष विरोधाच्या कार्यक्रमाची चुणूक मधू लिमये यांच्याएवढ्या तडफेने दुसऱ्या कोणत्याच सं. सो. पा. खासदाराने लोकसभेत दाखविली नाही. "पहिलीच सलामी मी इंदिरा गांधींना दिली." त्यांनी मला अभिमानाने सांगितले. इंदिरा गांधी या राज्यसभेच्या सदस्या. त्या लोकसभेच्या नेत्या होऊच कशा शकतात, असा पेच टाकून त्यांनी लोकसभेत एकच खळबळ उडवून दिली. आणि त्यानंतर गृहमंत्री नंदा, अर्थमंत्री सचिंद्र चौधरी, अन्नमंत्री सुब्रह्मण्यम आणि इतर अनेक मंत्र्या-उपमंत्र्यांविरुद्ध विशेषाधिकाराचे शस्त्र वापरून लोकसभेत एकच धमाल उडवून दिली. आणि शेवटी तर लोकसभेच्या सभापतींच्या जागेविषयीच त्यांनी वाद उपस्थित केला. "तुम्ही लोक, पक्षीय दृष्टिकोनातून विचार करता. मी मात्र भारतात लोकशाही कशी टिकून राहील, या दृष्टीने संसदेचा आणि संसदेच्या नियमांचा विचार करतो," असे काँग्रेस खासदारांनाच सांगून त्यांनी गार केले. आणि विरोधी पक्ष हक्कभंगाचे वगैरे निरर्थक ठराव आणून लोकसभेचे अठरा हजार किमतीचा एक एक तास वाया घालवितात, असा टोमणा मारणाऱ्या इंदिरा गांधींना त्यांनी सांगितले, "मी अठरा हजार रुपये किमतीचा तास वाया घालवतो खरे, पण त्यामुळे मंत्री आपल्या नादान गलथानपणामुळे या गरीब देशाला कोट्यवधी रुपयांनी कसे बुडवितात हे तर कळते!"

आपल्या केवळ दीड वर्षांच्या लोकसभेच्या कारकीर्दीत श्री. लिमये यांनी ही जी मजल मारून देशाच्या प्रथम श्रेणीच्या पुढाऱ्यांत नाव पटकाविले ते केवळ त्यांच्या लोकसभेच्या आडदांड विरोधामुळे नव्हे. त्यांच्या 'सर्वंकष, सर्वांगीण' विरोधाच्या जोडीला त्यांचा सखोल अभ्यासही असतो. लौकिक अर्थाने त्यांचे शिक्षण फारसे झालेले नाही. इंटरचे वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच त्यांनी राजकारणात उडी घेतली होती व त्यामुळे त्यांना शिक्षण सोडून द्यावे लागले होते. पण आज देशातील कुशल संसद तज्ज्ञांमध्ये ते गणले जातात. संसदेतील ग्रंथालयामध्ये ते तासन् तास अभ्यास

[पृष्ठ ५० वर चालू]

# विचारधारे — समीर

## □ “ वसुधैव कुटुंबकम् ”चे शालेय शिक्षण

‘ वसुधैव कुटुंबकम् ’ हे तत्त्व लहान मुलांच्या मनावर पहिल्यापासूनच ठसावे या उद्देशाने युनेस्कोने तेरा वर्षांपूर्वी निरनिराळ्या देशांतल्या निवडक शाळांतून एक प्रयोग सुरू केला. तो म्हणजे आपण फक्त एखाद्या विशिष्ट देशाचेच नागरिक आहोत असे नाही तर जगाचेही नागरिक आहोत, अशी शिकवण मुलांना अभ्यासक्रमातूनच मिळेल अशा रीतीने विषय शिकविणे. भारतात ज्या शाळांतून हा प्रयोग चालू आहे तेथे तो कितपत यशस्वी झाला आहे, याचे मूल्यमापन करण्यासाठी टेरेन्स लॉसन नावाचे युनेस्कोचे एक ब्रिटिश सल्लागार येत्या आठवड्यात भारत-भेट देऊन गेले. त्यांच्या मते भारतात हा विषय फारच पुस्तकी पद्धतीने शिकविला जातो. युनेस्कोच्या भारतीय शाखेने या विषयावर एक पुस्तिका तयार केली आहे. ती वाचून दाखविण्यापलीकडे येथले शिक्षक जात नाहीत. अर्थात् या पुस्तकात बरीच उपयुक्त माहिती आहे; पण उ–थांटचा संदेश जसाच्या तसा छापण्याचा उपयोग काय ?

युनेस्कोच्या या प्रयोगासाठी शिक्षकाने स्वतःची बुद्धी चालविण्याची आवश्यकता आहे. कारण या प्रयोगासाठी काही ठराविक अभ्यासक्रम नाही व त्याची परीक्षाही नाही. शिक्षकाने कोणती पुस्तके वाचावीत एवढेच सुचविलेले आहे. कारण या प्रयोगाचा उद्देश लहान मुलांच्या मनात इतर देशांतले लोक व त्यांचे जीवन याबद्दल एक प्रकारचे कुतूहल निर्माण करणे हा आहे. एकदा हे कुतूहल जागृत झाले व थोडासा जागतिक दृष्टिकोन आला की मग ‘ संयुक्त राष्ट्रां ’चा विषय काढणे योग्य होईल. येथपर्यंत मुलांची प्रगती झाली की, मग छापील साहित्याची मदत घ्यायला हरकत नाही.

उलट, येथला एकूण प्रयोगच चुकीच्या पद्धतीने केला जात आहे. एकतर साधनांचा तुटवडा व पुस्तकावर वाजवीपेक्षा जास्त भर आहेच, पण पुस्तके आहेत तीदेखील केवळ इंग्रजी व हिंदीत नव्हे तर प्रादेशिक भाषांतूनही छापली गेली पाहिजेत; दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे धडे द्यायच्या आधी आंतर्प्रांतीय बंधुभाव शिकविण्यावर जास्त भर दिला गेला पाहिजे. उदाहरणार्थ, केरळमधल्या एखाद्या विद्यार्थ्याला ओरिसाची काही माहिती नसेल तर ब्रिटिश गियानात काय चालले आहे हे त्याला शिकवून काय

उपयोग ? शिवाय ही आंतर्प्रांतीय मैत्रीची भावना वाढविणे युनेस्कोच्या आंतर्राष्ट्रीय सौहार्द वाढविण्याच्या प्रयोगाशी सुसंगतच आहे.

## □ भारतीय सेन्सॉरचा मागासलेपणा

इंग्रजी चित्रपटांच्या रसिकांत डेव्हिड लीन या दिग्दर्शकाचे नाव माहीत नसलेला माणूस सापडणे अशक्यच. 'ब्रिज् ऑन् द रिव्हर क्वाय', 'डॉ. झिवॅगो', 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' या जगप्रसिद्ध चित्रपटांचा हा दिग्दर्शक सहल करीत सध्या हिंदुस्थानात आला आहे. त्याच्याबरोबर झालेल्या प्रश्नोत्तरीत त्याने आपल्या व्यवसायावर प्रकट केलेली मते आपल्याकडच्या 'फिल्लम'वाल्यांना निश्चितच बोधप्रद ठरावीत.

पहिला प्रश्न : आताचा जगप्रसिद्ध सिने-दिग्दर्शक डेव्हिड लीन सुरुवातीला 'क्लॅपर बॉय' होता. पण उज्ज्वल यशाचे गमक काय ?

उत्तर : मला चित्रपट काढणे आवडते. ('आवडते'वर सूचक भर.) शिवाय मला गोष्ट सांगायला आवडते. हल्लीच्या बऱ्याच नवीन दिग्दर्शकांना गोष्टीचे महत्त्व वाटत नाही.

लीन आपले काम अत्यंत पद्धतशीरपणे करतो व बारीक सारीक तपशिलाकडेही लक्ष पुरवितो. "मी प्रत्येक गोष्टीचा तपशील आधीपासूनच संपूर्ण तयार करून तो लिहून ठेवतो." पटकथेकडे त्याचे फार बारीक लक्ष असते, "डॉ. झिवॅगोच्या पटकथेवर मी सबंध वर्षभर काम करीत होतो."

नट-नटचा लहरी असतात असे सार्वत्रिक मत आहे. त्याचा लीनला अर्थ कळत नाही. "मला लहरी नव्हे तर घाबरलेल्या नटचा दिसल्या आहेत.– कारण अभिनयाचे काम घाबरवून सोडणारे आहे."

यक्ष प्रश्न : हिंदुस्थानातल्या चित्रपटसृष्टीबद्दल एकूण मत काय ?

फटकळ उत्तर : हिंदुस्थानातल्या सेन्सॉरइतके वाईट सेन्सॉर सबंध जगात नाही असे सगळे म्हणतात. ते सर्वांत वाईट नसले तरी सर्वांत प्रतिगामी नक्की आहे. गेल्या पाच वर्षांत जगातले सेन्सॉर फार उदारमतवादी झाले आहेत. पण भारतीय सेन्सॉर अजूनही जनतेला व्हिक्टोरियन युगांतले आई-बाप आपल्या मुलांना वागवीत तसे वागवितात.

लीनचा हिंदुस्थानावर चित्रपट काढण्याचा विचार नाही. एकतर येथे चित्रपट काढणे फार कठीण आहे, – परवानग्या फारच घ्याव्या लागतात. गांधीजींवर चित्रपट काढण्याची कल्पना होती. पण ती सोडून दिली. – "मला चांगली पटकथा मिळू शकली नाही." पंडित नेहरूंवरही चित्रपट काढण्याचा विचार नाही. – "ते अजून फार जवळ आहेत."

●

# पत्र

## १

दि. १७ सप्टेंबर १९६४. मी ग्रेस, C/o लीला गुणवर्धिनी, मेडिकल
कॉलेज ले आऊट, नारापूर; हे पहिले आणि शेवटचे पत्र तुझ्यासाठी–
उण्यापुऱ्या दोन महिन्यांचा मुक्काम माझा; ईश्वराने मनात
काहीतरी पेरले, तें असे गवतासारखे भराभर उगवत
आहे...तुझे नाव ? उर्मिला, मिथिला, गांधारी...? मला ठाऊक
नाही. तू ग्रंथागारात उभी आहेस, लक्षावधी मेणबत्त्यांच्या
तेजात वितळणाऱ्या ख्रिस्ताच्या पुतळ्यासमोरील इन्ग्रिड
बर्गमनसारखी...हिवाळा अजून दूर आहे. कुणाच्या सुखाने
अशी थरथरतेस, सुगंधित झाल्यासारखी...माझी पुनर्जन्मावर
श्रद्धा आहे. तुझी ? गेल्या कित्येक वर्षांपासून स्वतःच्याच
देहात असा एकाकी फिरत आहे मी; अंधारात उमटणाऱ्या
प्रत्येक पावलांची रेषा तुझ्या झोळीत टाकीत...
आता एकच इच्छा आहे माझी. अगदी थेट पंचवीस वर्षांनी,
आयुष्याच्या एखाद्या गाफिल वळणावर तुझी भेट व्हावी...
मोरांचे पिसारे त्यावेळी झडून गेले असतील...आणि
कदाचित बळ राहिलेच तर आकाश आपोआपच सरकत
येईल तुझ्या दिशेने... तोपर्यंत हाडाच्या ओंजळीत तुझ्याच
प्रार्थना, ईश्वर सुखी व्हावा म्हणून....
—तू निघून गेलीस, जशी आलीस तशीच, शरीराच्या एका
विदग्ध लयीत ..ग्रंथागारात मी, माझ्या हातात पत्र, तू न
वाचलेले...पहिले आणि शेवटचे. आत्माराम नावाचा माझा
मित्र उभा राहिला माझ्या समोर, आणि पाहिली मी त्याच्या
डोळ्यांतून सरकतांना मृगजळातील हिरव्या-निळ्या
प्रतिबिंबांची एक प्रदीर्घ लाट...

## २

शिशिरांतील एक बर्फबंदिनी रात्र...
अवचित पावसाची हलकिशी सर
येऊन गेलेली.
घरी कोणी नाही. तू आता कुठे असशील ?
ते ग्रंथगार, आत्मारामच्या डोळ्यांतून
सरकणारी प्रतिबिंबांची हिरवी-निळी लाट
आता स्पष्ट दिसते आहे, डोळ्यातील अश्रुंच्या
काचातून...

—ग्रेस

## चंद्रमिठीत........

दोन स्वप्निल डोळ्यांनी
निळे आकाश व्यापिले
क्षण क्षण वेचताना
शब्द मुके मुके झाले
चंद्रमिठीत आकाश
रात्र–भान हरपले
प्राण प्राण एकसंध
सुख दवात नसेल.
चंद्रकोर रुतोनिया
अशी मनामध्ये गाठ
रुसलेल्या पापणीचे
उगा ओलावती काठ

*–रवींद्र किवहुने*

## आस्वाद

'पत्र' ही गद्यात लिहिलेली काव्यमय कहाणी आहे. एका विद्ध प्रेमिकाची. महाविद्यालयीन वातावरणाचे चित्रण वाचून 'विरहतरंगा'ची आठवण व्हायला हरकत नाही. पावलाची रेषा झोळीत टाकण्याची कल्पना फारशी सयुक्तिक वाटत नाही. पण बाकी प्रतिमाने आणि भावना चांगल्या साधल्या आहेत. 'गाफिल वळणावर' यांसारखे शब्दप्रयोग वेगळी मौज आणतात. हा प्रेमिक मोठा आशावादी आहे. पार्थिव शरीराची किंवा नामरूपाची फारशी पर्वा त्याला नाही. ग्रेस यांनी वेदना आणि अपेक्षा यांच्या मिश्र रांध्याने एक वेगळीच मूर्ती उभी केली आहे. पण वेगळी असली तरी अपरिचित न वाटावी इतकी स्पष्ट आहे ती.

रवींद्र किवहुने यांनी 'चंद्रमिठी'त सृष्टी आणि मानवी मन यांचा एक साचा चांगल्या तऱ्हेने ओतला आहे. प्रणयभावना ही चंद्राच्या आश्रयाने अनादिकालापासून राहत आली आहे. ती कवी चंद्रामुळे खुलते किंवा कोमेजतेही. पण ती पुष्कळदा स्फुट आणि अस्फुट अशा स्वरूपात राहते. तिचा असा आविष्कार फार हृदयंगम वाटतो.

*– गोपीनाथ तळवलकर*

[ आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या पुष्कळच असते. त्यामुळे कवितांसंबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने हवा तसा होऊ शकत नाही. त्यातून दिवाळी १९६७ पर्यंतच्या कवितांची निवड आताच पूर्ण झालेली आहे. यामुळे यापुढे येणाऱ्या कवितांची दखल घेणे जवळजवळ अशक्य आहे, हे कृपया गृहीत धरावे. —संपादक ]

# 'आठवण'

सौ. सुशिला गोखले

नित्याच्या सवयीने, त्याने शिपायाने टेबलावर नुकत्याच आणून ठेवलेल्या टपालाकडे एक दृष्टी टाकली; डोळ्यांसमोर असलेल्या प्लॅनवर पेन्सिलीने काही खाणाखुणा केल्या आणि त्यासंबंधी बोलण्यासाठी आपल्या असिस्टंटला पाठवले. मध्यंतरीच्या वेळात एका मागोमाग एक टपाल वाचून टाकायला सुरुवात केली. नीट रचलेला कागदांचा ढीग जरासा इकडे तिकडे हलला गेला आणि कितीतरी दिवसांनंतर दृष्टीस पडणाऱ्या एका पाकिटाकडे पाहून त्याच्या चित्तवृत्ती एकदम उत्साहित झाल्या.

त्याच्या मनात आले, अजूनही याच–किंचित लांबट चौकोनी, पांढऱ्या उत्तम प्रतीच्या पाकिटामधून पत्र पाठवण्याची आपली आवड तिनं लक्षात ठेवली आहे; आतला कागदही मग तोच असेल, आणि मजकुराचा आशयसुद्धा. त्याचे मन फुलून आले. त्याने पाकीट फोडण्यासाठी कटरपाशी आणले, एवढ्यात असिस्टंट आत आला. प्रयासाने आपल्या चेहऱ्यावरचे भाव उगीचच लपवण्याचा प्रयत्न त्याने करीत त्याच्याशी भराभर कामाचे बोलणे केले. असिस्टंट निघून गेला. आता जरा वेळ कुणी आत येण्याचा संभव नव्हता. निवांतपणे पत्र वाचायला त्याने सुरुवात केली—

" प्रिय रवी,

दिल्लीला भरलेल्या आंतरराष्ट्रीय आर्किटेक्ट व टाऊन प्लॅनरच्या परिषदेत झालेल्या तुझ्या भाषणाचा सारांश वाचला व त्यावरची वर्तमानपत्रांमधून आलेली दर्जेदार टीका वाचून त्याबद्दल तुला वाटला नसेल इतका मला, अत्यंत अभिमान वाटला. तुझं भाषण अभ्यासू वृत्तीनं केलेलं, अॅप्रोच प्रॅक्टिकल, मौलिक असे विचार मांडले गेलेले असं झालं !

भारतभर लौकिक झालेल्या या आणि तुझ्या भाषणाला मी अभिमानाने हजर...
वहिनी, काय म्हणतात ? ठीक ? त्यांची मैत्रीण परवा वाटेत भेटली होती

" तू त्याच्याशी लग्न करून सुखी झालीस, की माझ्या अपराधी मनाला बरे वाटेल. तू माझ्यासाठी हो म्हण..."
पत्र चालूच होतं —



मला. या ८–१५ दिवसांत तिकडे जाणार आहे म्हणाली. तिच्याबरोबर वस्तू पाठवीन म्हणते काही. तुझा वाढदिवस आला आता. भरलेली सिमला-मिरची, आणि फळं पाठवीन म्हणते.

हे मला एकदा म्हणाले होते की तुला लोकरीचा पुल–ओव्हर विणून पाठवावा. त्यांना वाटतं मी करणारी चांगली आहे, तेव्हा तुला नक्कीच आवडेल वस्तू. मग तुझी त्यांना फार आठवण झाली होती. मित्राची आठवण. भरतं आलं त्यांना. मला म्हणाले, चल आपण लोकर घेऊन येऊ.

त्यांची कल्पना–माझं करणं! आमच्या दोघांतर्फे तुला ही भेट तयार करीत आहे. सध्या बहुतांशी मी याच कामात मग्न आहे. वेळ चांगला जातो आहे.

हल्ली यांना कामानिमित्त लॅबोरेटरीच्या बाहेर जास्त राहावे लागते, त्यामुळे मीही लॅबोरेटरीच्या कामात गुंतलेली नाही. तुला माहीतच आहे, मी काही सायन्सची विद्यार्थिनी नव्हते. त्यामुळे मला त्या विषयातले जवळ जवळ ज्ञान असे नाहीच; म्हणून हे हजर असतील, तेव्हा ते मला समजावून सांगतात आणि मग मी काम करते. त्यांची समजावण्याची रीत फार चांगली आहे, अगदी थेट तुझ्यासारखी!

गृहकृत्य सोडून माझा सर्व वेळ त्यांच्यासमवेत लॅबोरेटरीमध्ये काम करण्यात गुंतलेला असतो. असे माझे दिवस जात असतात. त्यामध्येच आजच्या तारखेचा दिवस उजाडतो. हा दिवस तुलाही पक्का आठवत असेल. या दिवशी

ह्यांनी मला लग्नाबद्दल विचारले; तेव्हा मी त्यांना आपल्याबद्दलचे सर्व काही सांगितले. ते म्हणाले–तू सांगितलं नसतंस तरी ते मी ओळखून आहे. तरीही पूर्ण विचार करून मी तुला विचारीत आहे. हे सर्व नंतर लगेच मी तुला सांगितले व कितीतरी वेळ आपण मुग्ध बसून राहिलो होतो. शेवटी तू मनाचा काहीतरी निश्चय केलास. मला आजही तुझी सर्व वाक्ये जशीच्या तशी आठवतात. मी प्रश्नार्थक मुद्रेने तुझ्याकडे पाहिले. तू म्हणालास, "तू मला अतिशय आवडत असतानाही दुसऱ्या मुलीशी लग्न करण्याची चूक मी करून बसलो. आता आपल्या संबंधांना आकारच नाही. तू त्याला होकार द्यावास. आहे या परिस्थितीपेक्षा तू नक्कीच दुःखी होणार नाहीस. मी अतुलला ओळखतो. तो स्वतःला पुरता ओळखतो व दुसऱ्यालाही. सर्व समजून उमजून त्याने तुझी निवड केली आहे. तो चुकणारा माणूस नाही· त्याच्यापासून तू सुखी होशील हा वाटणारा विश्वास मला, तुला हे सांग म्हणतो. तू त्याच्याशी लग्न करून सुखी झालीस, की माझ्या अपराधी मनाला जरा शांत वाटेल माझ्यासाठी आजवर सगळं करीत आलीस. माझ्यासाठी हो म्हण."


तुझ्या शेवटच्या वाक्याने मी विरघळून गेले. त्यांचं प्रपोजल ही इष्टापत्ती मानली. वर म्हटलं, आणि माझे सर्व अवसानच गळून गेले.

दिवस तोच, वर्ष–साल बदलले आहे. दुःख तेच, भावना तीच, पण मी सुखी आहे. तेवढ्याकरता मुद्दाम तुला पत्र लिहायला घेतलं म्हटलं..."

तो मनाशी एकदम जरासा दचकलाच, आपल्याशिवाय चारू सुखी होऊ शकली! त्याच्या अहंकाराला हलकासा हादरा बसला.

तरीपण आतून त्याला कोणी तरी हटकले, तशी स्वतःला सावरून तो पुढे वाचू लागला– "मलाही आश्चर्य वाटतं रविकिरण, की त्याच्या सहवासात मी इतकी रमू कशी शकले? मी अगदी सुखात आहे बघ. छान जातात माझे दिवस. खूप बरं वाटेल तुला हे वाचून..." आता मात्र त्याला पुढे वाचवेना. त्याला वाटलं होतं तिने लिहावे, 'मनाने तुझा आधार घेते तेव्हाच जगता येतं मला. मला तुझ्या मनाच्या आधाराशिवाय जगताच येत नाही.' पण पत्र संपले होते. त्याला वाटत होते नाही-नाही असं होणंच शक्य नाही. निव्वळ अशक्य आहे. काहीतरी समजुतीखातर लिहिलेलं आहे नक्कीच. दुसरं पत्र येईल एवढ्यात...त्यात ती लिहील– "तुझ्या-शिवाय...?"

आणि तो खुळ्यासारखी पत्राची वाट पाहू लागला.



# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखांक नववा

अरुण साधू

हुनान प्रांतातील उत्तरविभागातील त्या घनदाट जंगलात मिट्ट काळोख दाटला होता. रात्रीच्या वेळी काळ्याकुट्ट ढगांनी सारे आकाश व्यापले होते आणि पावसाची रिपरिप सतत चालू होती. उंच उंच झाडांमध्ये कमरेएवढे गवत वाढले होते आणि त्यामधून चालताना कधी जिवाणूवर पाय पडेल, याचा नेम नव्हता.

अशा वेळी त्या जंगलातून फाटकी तुटकी अर्धवस्त्रे नेसलेली अनवाणी पायांची आणि हाती मोडकी तोडकी शस्त्रे असलेली, एक हजार शेतकऱ्यांची एक पराभूत सेना दक्षिणेच्या दिशेने अडखळत, ठेचकाळत वाट काढीत होती. सेनेच्या अग्रभागी माओ-त्से-तुंग होता. आपल्या या सेनेनिशी माओने चांगशा या सुभेदारी राजधानीवर चाल करून जाण्याचा प्रयत्न केला होता; पण त्याच्या सैन्यातील काही अधिकाऱ्यांनी दगाबाजी केल्याने त्याचा सपशेल पराभव झाला होता. त्याचे सैनिक कापले जाऊ लागले होते. आणि मागावर असलेल्या शत्रुसैनिकांना चुकवीत जिवाच्या आकांताने त्याने उरल्या सुरल्या सेनेनिशी आपल्या जन्मग्रामाकडे पळ काढण्यास सुरुवात केली होती.

त्यांच्या मागावर हुनानी सुभेदारांचे, तसेच कोमिन्टांगचेही सैनिक होते. कोमिन्टांच्या सैनिकांची त्या काळात हुनानमध्ये भयंकर दहशत बसली होती. आणि जे जे म्हणून कम्युनिस्ट सापडत होते, त्या सर्वांना कोमिन्टांग ठार करीत होते. जीव बचावण्यासाठी चीनमधील सामान्य कम्युनिस्टांना १९२७ च्या शेवटच्या दोन महिन्यांत असेच दशदिशांना रानोमाळ भटकावे लागत होते.

अशीच माओची ती छोटीशी पराभूत सेना हुनानच्या जंगलातून वाट काढीत

असता एकाएकी कोमिन्टांग सैनिकांचा समोरच्या एका तुकडीस वेढा पडला. गोळ्यांच्या फैरी झडू लागल्या आणि त्या तुकडीतील सैनिक उंच गवताचा आसरा घेत पळू लागले. काही काही गोळ्यांना बळी पडले. काही पळून आपल्या मुख्य सैन्यापर्यंत पोचण्यात यशस्वी झाले आणि काही कोमिन्टांग सैनिकांच्या हाती जिवंत सापडले. जिवंत सापडणाऱ्यांमध्ये माओ-त्से-तुंग होता.

## जिवावरचे संकट

पुढे काय घडणार हे उघड होते. संगीनींच्या पहाऱ्यात पकडलेल्या कम्युनिस्टांना जवळच्याच कोमिन्टांग कचेरीकडे नेत. कोमिन्टांगचा एखादा वरिष्ठ अधिकारी त्यांची तपासणी करी आणि नंतर भिंतीकडे तोंड करून त्यांना उभे करून त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात येत.

पकडलेल्या माओला कोमिन्टांग कचेरीकडे नेण्यात येत होते. त्याने आपल्याजवळील बहुतेक पैसे त्याला पकडून नेणाऱ्या सैनिकांना देऊन टाकले. ते त्यांनी खुषीने स्वीकारले. त्या सैनिकांना माओला ठार मारताना पाहण्यात विशेष स्वारस्य नव्हते आणि तो पळून गेला तरी त्यात त्यांना दुःख नव्हते. पण त्यांच्यावरचा अधिकारी अधिक कडक आणि अधिक हुशार होता. आपल्याला मिळालेले पैसे त्याने खिशात ठेवले आणि माओला सोडून देण्यास नकार दिला.

आता लवकर दुसरे कोणते तरी धाडस करणे भाग होते. जवळ कोमिन्टांगची छावणी स्पष्ट दिसू लागली होती आणि जंगल संपून शेते लागली होती. केवळ ६०० फुटांवर छावणी आली असताना माओला संधी मिळाली आणि सैनिकांचे लक्ष नाही असे पाहून त्याने शेजारच्या भाताच्या दाट शेतात उडी टाकली आणि वेगाने तो पळू लागला.

शेतातून लपत छपत माओ एका तळ्याच्या काठापर्यंत उंच जागेवर येऊन पोचला. पुढे जायला सरळ वाट नव्हती आणि सैनिक मागावर येत होते. तेथे अतिशय उंच आणि दाट गवत वाढले होते. त्यातच माओ छपून राहिला. मागावर आलेले सैनिक तळ्याच्या काठापर्यंत येऊन पोचले. आणि त्या गवतामध्ये माओला हुडकण्याचा ते प्रयत्न करू लागले. माओ श्वास रोखून त्यांच्या हालचाली पाहत होता. त्या दाट गवतातून कित्येक वेळ ते त्याच्या जवळून निघून गेले. एक-दोन सैनिक तर त्याच्या इतके जवळ आले होते की, माओ त्यांच्या बुटाला सहज स्पर्श करू शकला असता. आपण आता नक्कीच पकडले जाणार, याची माओला खात्री वाटून त्याने जिवाची आशा सोडून दिली होती.

परंतु इतक्या लवकर माओला संपविण्याचे नियतीच्या मनात नव्हते. त्याच्या हातून तिला चीनमध्ये फार मोठी क्रांती घडवून आणावयाची होती. कसा कुणास ठाऊक पण त्या उंच नि दाट गवताने माओला हात दिला. सैनिकांच्या नजरेला तो काही पडला नाही. आणि शेवटी ते कंटाळून निघून गेले.

संध्याकाळ होताच माओ तेथून सटकला. सबंध रात्रभर तो जंगलातून अनवाणी पायांनी चालत होता. पायांची चाळण होऊन गेली. दुसरे दिवशी वाटेत त्याला एक शेतकरी भेटला. माओने लगेच जुनी ओळख काढून त्याच्याशी मैत्री जोडली. त्याने माओला खाऊ-पिऊ घातले आणि दुसऱ्या जिल्ह्यात नेऊन सोडले. मग लवकरच माओ सुरक्षितपणे आपल्या सैन्याला जाऊन मिळाला.

असे अनेक संकटांना तोंड देत देत, अर्धीअधिक कापली गेलेली माओची शेतकरी सेना शेवटी शाओ-शाननजीकच्या चिंगकाशान नामक एका दुर्गम पर्वत-शिखरावरील तळावर येऊन पोचली. येथेच माओने आपले पहिले 'सोव्हिएट' स्थापन केले.

२७ ऑगस्ट १९२७ ला कोमिन्टांगच्या छायेत भरलेल्या गुप्त बैठकीतून कम्युनिस्ट बाहेर पडले होते ते चीनमध्ये ठिकठिकाणी अशीच 'सोव्हिएटस्' स्थापन करण्याच्या भावनेने.

माओ हुनानमध्ये परत आला तो याच जिद्दीने. हुनानमधील शेतकऱ्यांचा पुन्हा उठाव करून हुनान प्रांत पूर्णपणे कोमिन्टांगच्या ताब्यातून सोडविण्याची त्याची योजना होती व त्यासाठी त्याने गुप्तपणे शेतकऱ्यांची व कामगारांची क्रांतिसेना उभारणे सुरू केले.

## चांगशा शहरावर चाल केली

माओला सुरुवातीला चांगलेच यश मिळाले. हुपेह प्रांतातील हँकोव शहराजवळ त्याने शेतकऱ्यांची व खाणकामगारांची एक छोटीशी सेना यशस्वी रीतीने उभारली. त्यातच कोमिन्टांगचा वीट आलेले काही सैनिक आणि अधिकारी त्याला येऊन मिळाले. आणि एवढ्याशा सैन्याबरोबर त्याने हुनानची राजधानी खुद्द चांगशा शहरावरच चाल केली.

प्रथम हँकोवहून चांगशापर्यंत सुरक्षितपणे पोचणे हेच मोठे जिकीरीचे होते. शत्रु-सैन्याला व ठाण्यांना चुकवीत, वेडीवाकडी वळणे घेत त्यांना प्रवास करावा लागला, शहराच्या जवळ पोचल्यावर त्याने तेथील आसपासच्या खेड्यांतील शेतकऱ्यांची आणखी एक तुकडी उभारली आणि चांगशावर हल्ला चढवला.

आपल्या अपुऱ्या शस्त्रांनिशीही माओच्या जिद्दीच्या सैनिकांनी चांगशा शहर जिंकून घेतले असते. पण दुर्दैव माओचे. त्याच्या सैन्याने प्रखर लढा दिला खरा पण शत्रूची सैन्यसंख्या अधिक होती. विशेषत:, माओच्या क्रांतिसैन्यास जे कोमिन्टांग सैनिक आणि अधिकारी येऊन मिळाले होते, त्यांच्या हृदयात धडकी भरावी एवढी शत्रूची सैन्यसंख्या होती. झाले. त्यांचे मनोधैर्य खचले आणि त्या वेळच्या चीनच्या लष्करी प्रथेप्रमाणे अधिक सैन्यबळ असलेल्या शत्रूला त्यांच्यापैकी काही सैनिक ऐन युद्धात सरळ जाऊन मिळाले.

तेव्हापासून माओवर डाव उलटला. मोठ्या संख्येनिशी आणि आधुनिक शस्त्रांनी

सज्ज असलेला शत्रू माओच्या सैन्यावर तुटून पडला व सैन्याला कापून काढू लागला. आता माओला माघार घेण्यावाचून गत्यंतर उरले नव्हते. याच वेळी त्याला आपले जन्मग्राम शांओ–शानजवळील चिंगकाशान या दुर्गम पर्वताची आठवण झाली आणि त्या दिशेने आपल्या पराभूत सेनेसह माघार घेण्यास त्याने सुरुवात केली. या माघारीतच माओ कोमिन्टांग सैनिकांच्या हाती पडला. पुढे हिकमतीने सुटला. शेवटी आपल्या उरल्या सुरल्या सैन्यासह चिंगकाशान तळावर येऊन पोचला.

चीनमध्ये जी अनेक परंपरागत विलक्षण वैचित्र्ये आहेत, त्यांतच भर पडली आहे चीनच्या परंपरागत दरोडेखोरांची. चीनमध्ये कित्येक दुर्गम प्रदेश असे आहेत की, जेथे सतत दरोडेखोरांनीच वस्त्या केल्या आहेत. बादशाही लष्कराचे हात तेथे कधीच पोचू शकले नाहीत.

हे दरोडेखोरही त्या अर्थाने दुष्ट दरोडेखोर नसत. सरंजामी जुलुमाने त्रस्त झालेला एखादा बाणेदार पुरुष कायद्याविरुद्ध एखादे कृत्य करी आणि त्याच्यामागे बादशाही पोलिसांचा ससेमिरा लागे. असे झाले की तो पुरुष अशाच एखाद्या दुर्गम प्रदेशाचा आसरा घेई व तेथे आपल्याप्रमाणेच पळून आलेले लोक भोवती जमा करून आसपासच्या प्रदेशातील जमीनदारांवर दरोडे घालून उपजीविका चालवी. कित्येक शतकांपासून अशा दरोडेखोरांचा उपद्रव चिनी जमीनदारांना होत आला आहे.

शाओ-शाननजीक असलेले चिंगकाशान हे दुर्गम स्थळ असेच दरोडेखोरांचा अड्डा म्हणून प्रसिद्ध होते. ४० किलोमीटर रुंदीचा आणि २५० किलोमीटर परिघाचा हा टापू दुर्गम पर्वताच्या एका उंच टेकाडावर वसला होता. या पठाराच्या सभोवती उंचच उंच निसटते कडे होते आणि घनदाट पाईन वृक्षांच्या जंगलाने साऱ्या पठाराभोवती कडे घातले होते. महाराष्ट्रातल्या डोंगरी किल्ल्याप्रमाणे असलेल्या अशा या पठारावर पोचण्यासाठी, बाहेरच्या जगाशी संबंध ठेवण्यासाठी अवघ्या तीन-चार अरुंद आणि अवघड वाटा होत्या. आणि त्या पठारावरील इमारती म्हणजे फक्त बौद्ध मंदिरे. हिवाळ्यामध्ये त्या साऱ्या पर्वतराजीवर घनदाट धुक्याचे पांघरूण पडत असे.

अशा या ठिकाणी सुमारे हजार शेतकऱ्यांची, अर्धीअधिक कापली गेलेली. माओची पराभूत सेना १९२७ च्या शेवटास येऊन पोचली. त्यांच्याजवळ काही मोडक्या तोडक्या बंदुकांखेरीज दुसरे शस्त्र नव्हते. पण विरोधाची जिद्द आणि चिंगकाशान पर्वत हेच त्यांचे संरक्षणाचे प्रभावी साधन होते. येथेच माओ-त्से-तुंगने आपले पहिले सोव्हिएट स्थापन केले.

आणि याच ठिकाणी आपल्या कल्पना जशाच्या तशा अंमलात आणण्यास माओला आयुष्यात प्रथमच संधी मिळाली. नागरी शासनाची आणि लष्करी

नेतृत्वाची जबाबदारी आतापर्यंत त्याच्यावर कधी आली नव्हती ती आज आली. सत्तेची खरी चुणूक त्याला इथेच कळून चुकली. एक वर्षभर चिंगकाशान तळाचा बाहेरच्या जगाशी संबंध नव्हता. कम्युनिस्ट पक्षाने आणि पक्षातील अनेक समित्यांनी त्याच्या कल्पनांवर आक्षेप घेऊन त्याच्या कर्तृत्वाला आजपर्यंत लगाम घातले होते. पण आता पक्षाने त्याला घालवून दिले होते आणि चिंगकाशान तळावर त्याला विचारणारे कुणी नव्हते.

परंतु चिंगकाशान तळावरील आयुष्य काही मोठे सुखाचे नव्हते. माओ तळावर येण्यापूर्वी दोन शेतकरी दरोडेखोर त्या तळावर सत्ता गाजवीत होते. वाँग त्सो आणि युआत वैंत त्सौ. या दोन दरोडेखोरांच्या हाताखाली ६०० जणांची सशस्त्र सेना होती. माओ तळावर येताच या सैन्याने माओच्या जवळ जवळ निःशस्त्र सैन्यावर हल्ला करण्याची तयारी केली. एक तर या लाल सैन्याने तळ सोडून जावे किंवा आपल्या आधिपत्याखाली यावे, अशी मागणी दरोडेखोरांनी केली.

माओच्या मुत्सद्देगिरीची यावेळेस परीक्षा होती. त्याने मोठ्या कौशल्याने हा प्रसंग हाताळला. या दरोडेखोरांच्या टोळयांतील बरेचसे शेतकरी चिंगकाशान आणि शाओ–शानच्या आसपासचे होते. त्यामुळे माओला ते ओळखत होते. माओने त्यांच्याशी आणि त्यांच्या पुढाऱ्यांशी अनेक बोलणी केली. जमीनदारांच्या विरुद्ध लढण्यासाठीच आपला प्रयत्न आहे आणि आपण म्हणतो त्याप्रमाणे क्रांती झाली तरच शेतकऱ्यांचे भले होईल हे त्याने त्या



माओ

दरोडेखोरांना पटवून दिले. शेवटी ते दोघेही माओच्या सैन्यात सामील होण्यास तयार झाले आणि लाल सैन्यात त्यांनी अधिकारपद स्वीकारले.

१९२७ चा हिवाळा चिंगकाशान पर्वतांवर भलताच कडक गेला. माओच्या सैन्या-जवळ थंडी निवारणासाठी पुरेसे कपडे नव्हते. पर्वतावर अन्नाचा पुरेसा साठा नव्हता. पर्वतावरील बौद्ध मंदिरांतून सैनिक कसेबसे राहत. बाहेरच्या जगाशी संबंध नव्हता. ज्या कम्युनिस्ट पक्षाने मदत करावी त्या पक्षाने चांगशा शहरावरील हल्ला माओने पक्षाच्या आदेशाविरुद्ध केला म्हणून त्याला पक्षातून हाकून लावले होते. त्यामुळे पक्षाशीही संबंध तुटला होता.

माओच्या सैन्यातील लोकांची हिंमत खचू लागली. पण माओ उत्कृष्ट सेनापती आणि कुशल शासक होता. आपल्या अनुयायांना काबूत कसे ठेवायचे आणि त्यांचे नीतिधैर्य सतत कसे शाबूत ठेवायचे हे तो पक्के जाणून होता.

त्याने आपल्या सैनिकांना अनेक उपयुक्त कामांना जुंपले. पठारावर जेथे जेथे म्हणून मोकळी जमीन सापडेल, तेथे तेथे सैनिक तांदूळ पेरीत. पठाराच्या आस-पासच्या खेड्यांत त्याचे निःशस्त्र सैनिक जात आणि तेथील शेतकऱ्यांच्या अनेक कामांत मदत करून त्यांचा विश्वास संपादन करीत. तसेच पठाराच्या भोवतीही जेथे म्हणून जमिनी असतील तेथेही हे सैनिक धान्ये पेरीत.

संरक्षणासाठी या सैनिकांनी ठिकठिकाणी चर खोदले. आजूबाजूच्या जंगलांमधून झाडे कापून आणून त्यांना आपापली घरे बांधावी लागत. उरलेल्या वेळात माओ-त्से-तुंग स्वतः सैनिकांच्या शिक्षणाचे तास घेई. त्यांच्यापैकी बरेचसे अशिक्षित होते. ज्यांना लिहिता-वाचतादेखील येत नसे त्यांना ते शिकविण्यात येई. लवकरच एक जुन्या पद्धतीचे छापण्याचे चिनी यंत्र पैदा करण्यात आले आणि लाल सैन्याचे पहिले ओबडधोबड नियतकालिक चिंगकाशान येथून बाहेर पडू लागले.

## गनिमी तंत्राची प्रयोगशाळा

त्या चारी बाजूंनी शत्रू सैनिकांनी वेढलेल्या उंच पर्वतावर राहत असतानाच माओला गनिमी युद्धावर अधिक विचार करावा लागला. पूर्वी त्याने बरेच लढे दिले होते आणि दर वेळी त्याचे बरेच सैनिक कापले गेले होते. आता त्याच्या-जवळील सैन्यबळ थोडेसेच होते. एक एक सैनिक महत्त्वाचा होता.

या विचारातच त्याने आपल्या गनिमी लढ्याच्या नव्या पद्धती अंमलात आणल्या. त्याने तीन गोष्टींवर भर दिला. पहिली म्हणजे आजूबाजूच्या शेतकऱ्यांना हरेक तऱ्हेची मदत करून त्यांच्यांत लाल सैन्याबद्दल त्याने सहानुभूती निर्माण केली. त्यामुळे हे शेतकरी कोमिन्टांग सैनिकांच्या हालचालींची इत्थंभूत माहिती माओला पुरवीत. त्यांच्या साहाय्याने माओने समोवतालच्या प्रदेशात आपल्या हेरांचे जाळेच निर्माण केले.

परंतु लाल सैन्याजवळ शस्त्रे नव्हती. आणि शस्त्रे आणणे तर आवश्यक होते. म्हणून त्याने एक वेगळीच क्लृप्ती योजली. आपल्या सैनिकांची एक छोटीशी तुकडी तो जंगलाबाहेर पाठवी. तुकडीची कमी संख्या बघून कोमिन्टांगचे सैनिक या लाल सैनिकांच्या मागे लागत. त्याबरोबर लाल तुकडी शत्रूला हुलकावण्या देत देत जंगलात शिरे. त्यांच्या पाठोपाठ शत्रुसैनिक जंगलात घुसले रे घुसले की दबा धरून बसलेले लाल सैनिक त्यांच्यावर तुटून पडत व अशा रीतीने आपल्याजवळील शस्त्रसंख्या वाढवीत.

तळावर आपल्या लष्करी व राजकीय शिक्षणाच्या तासाला माओ सैनिकांना गनिमी युद्धाच्या पद्धती सोप्या भाषेत समजावून सांगे. छोटया छोटया संगीतमय शब्दांच्या वाक्यात माओने ज्या घोषणा तळावर आपल्या लाल सैनिकांना तालावर पाठ करण्यास शिकविल्या त्याच पुढे चिनी कम्युनिस्टांच्या गनिमी युद्धाप्रमाणे घोषणा मानल्या गेल्या आणि आता कम्युनिस्ट गनिमी युद्धाची भगवत् गीता म्हणून साऱ्या जगातील डाव्या कम्युनिस्टांना त्या मान्य झाल्या.

त्यातील एक सोपी घोषणा अशी :

**शत्रु पुढे येत असेल तर आम्ही माघार घेऊ**
**शत्रू थांबला असेल तर खोडचा काढून जेरीस आणू**
**शत्रू थकला असेल तर त्यावर हल्ला करू**
**शत्रू माघार घेत असेल तर आम्ही त्याचा पाठलाग करू.**

या कल्पना काही नव्या नव्हत्या. सुमारे २५०० वर्षांपूर्वी सुन वू नामक एका चिनी तत्त्ववेत्त्याने त्या अगोदरच वेगळया स्वरूपात लिहून ठेवल्या होत्या. परंतु माओने त्यांना आपल्या घोषणांमध्ये असे काही सुटसुटीत, जोमदार आणि नादमय स्वरूप दिले की लाल सैन्यात त्या एकदम लोकप्रिय झाल्या.

लष्करी संघटनेबरोबरच माओने चिंगकाशानच्या आसपासच्या शेतकऱ्यांच्या संघटनेकडेही बारकाईने लक्ष पुरविले. त्याने आपल्या लाल सैनिकांना शेतकरी चळवळीच्या आणि संघटनांच्या साऱ्या खुब्या शिकविल्या. त्यामुळे चिंगकाशानच्या आसपासच्या टापूत लवकरच क्रांतिकारक शेतकऱ्यांची अनेक सोव्हिएटस् निर्माण होऊ लागली. त्यांना मार्गदर्शन अर्थातच चिंगकाशानहून मिळे.

चिंगकाशान हा पर्वत हुनान, कियांगसी आणि क्वांगटुंग या तीन प्रांतांच्या अगदी सीमेवर होता. त्यामुळे शिवाजीच्या मावळ्यांप्रमाणे माओचे चतुर लाल सैनिक भराभरा पर्वतावरून खाली उतरत, कोमिन्टांगच्या एखाद्या तुकडीवर हल्ला करून त्यांची शस्त्रे जप्त करीत आणि पाहता पाहता दिसेनासे होत. एका प्रांतातील कोमिन्टांग सैनिक पाठलाग करू लागले तर ते चटकन दुसऱ्या प्रांतात पसार होत.

**लाल सैन्याचा जन्म...**

अशा रीतीने हळू हळू माओच्या लाल सैन्याचे संख्याबळ आणि शस्त्रबळ वाढत

असतानाच चीनमध्ये ठिकठिकाणी लाल सैन्ये निर्माण होत होती. ठिकठिकाणी सोव्हिएटस् वाढत होती. परंतु माओने चिंगकाशान येथे तयार केलेली लाल सेना ही काही चीनमधील पहिलीच लाल सेना नव्हती. चिनी लाल सेनेचा जन्म त्या आधीच १ ऑगस्ट १९२७ रोजी नानचांग या शहरात झाला होता.

१२ एप्रिल १९२७ च्या शिरकाणानंतर आपण कम्युनिस्टांचा पक्का बंदोबस्त केल्याच्या आनंदात कोमिन्टांग अध्यक्ष जनरल चँग–कै–शेक होता. थोडेफार कम्युनिस्ट निसटून वाचल्याचे त्याला माहीत होते. पण कम्युनिस्टांना काय शिक्षा मिळते हे त्याने प्रत्यक्ष दाखविले असल्याने उरले सुरले कम्युनिस्ट मूग गिळून गप्प बसतील आणि आपल्याला त्यांचा काहीच त्रास होणार नाही, याची त्याला खात्री होती. आणि या निःशंक मनाने त्याने लगेच सारा चीन कोमिन्टांगखाली आणण्यासाठी उत्तरेची मोहीम हाती घेतली होती.

परंतु कम्युनिस्ट पूर्णपणे नष्ट झाले नव्हते. चँग–कै–शेकच्या लष्करातही काही छुपे कम्युनिस्ट किंवा त्या विचारसरणीचे लोक अद्याप उरले होते. त्यांच्यापैकी बरेचसे अधिकारी व्हाम्पोआ मिलिटरी अॅकेडमीमध्ये शिक्षण घेतलेले होते. कम्युनिस्टांवर आलेली संक्रान्त बघून ते मूग गिळून गप्प बसले होते. आणि योग्य संधीची वाट पाहत होते.

अशी एक संधी लवकरच त्यांना मिळाली. चँग–कै–शेकच्या सैन्याचा एक छोटा तळ कियांगसी प्रांतातील नानचांग येथे होता. वुहान येथील डावे कोमिन्टांग सरकार नुकतेच कोसळले होते आणि या डाव्या सरकारच्या काही सेना चँग–कै–शेकच्या आज्ञेने कियांगसी प्रांतातून वुहानकडे निघाल्या होत्या. त्यांचाही तळ त्या दिवशी नानचांगमध्येच होता. या दोन्ही तळांतील लष्करांत पूर्वीच्या कम्युनिस्टांची बहुसंख्या होती.

वाट याच संधीची होती. दुसरेच दिवशी म्हणजे १ ऑगस्ट १९२७ रोजी या दोन्ही तळांवरील कम्युनिस्टांनी एकदम उठाव करून नानचांग शहराचा ताबा मिळवला. उरलेल्या राष्ट्रीय सैनिकांना नानचांगमधून यःपलायन करावे लागले. आणि अशा रीतीने लाल सैन्याचा जन्म झाला. या उठावाचा नेता आणि लाल सैन्याचा जन्मदाता होता जनरल चुह तेह.

इकडे माओची चिंगकाशान तळावरील लाल सेना १९२८ च्या हिवाळ्यात दुसऱ्यांदा उपासमारीच्या हाल-अपेष्टा भोगीत असता आणि तिचे मनोधैर्य अगदी कडेला आले असतानाच जनरल चुह तेह आपल्या सैन्यानिशी माओला येऊन मिळाला. आणि तेव्हापासूनच चीनच्या कम्युनिस्ट चळवळीत एका नव्या ऐतिहासिक पर्वाला सुरुवात झाली.

(अपूर्ण)




अंकारा येथील जर्मन वकिलातीत आम्हांला पिअरीकडून जबरदस्त किंमत देऊन ब्रिटिशांचे युद्धाचे आराखडे, फिल्मस् मिळत होत्या. केवळ हाऊस ऑफ कॉमन्समध्ये चर्चिलच त्यावर बोलू शकले असते. आम्हाला नाझी जर्मनीचा संपूर्ण विध्वंस त्या फिल्म्सवरून स्पष्ट दिसू शकत होता. युद्धाचे पारडेच फिरू शकेल एवढी सामग्री पिअरी ऊर्फ सिसेरोकडून आमच्या हाती असतानाही आमचे नेते निरर्थक चौकशांमध्ये वेळ घालवत होते.

मला बर्लिनहून निमंत्रण आले होते. 'कशासाठी ?' या धाकधुकीत मी 'सोफिया' या मुक्कामावर पोहोचलो—

लेखक :

**एल्. सी. मोझिस**

अनुवादक :

**अशोक खरे**

लेखांक :

तिसरा

बर्लिनच्या विमानतळावर उतरताच फक्त बोचऱ्या वाऱ्याने माझे स्वागत केले.

विमानतळावर एक मोटार उभी होती. मी मोटारजवळ गेलो, तेव्हा 'रिबेन्ट्रॉपला भेटण्याच्या अगोदर मला भेट' असा जनरल काल्टेनचा निरोप समजला. एकंदर सोफियाला खास विमान पाठवण्याचे हे कारण होते तर.

मला मोटारीतून एका भव्य इमारतीत नेण्यात आले. इमारतीत सर्वत्र पहारेकरी होते. मी काल्टेनच्या खोलीत शिरलो.

त्या प्रशस्त खोलीत मध्यभागी लांबटसे टेबल होते व जवळच गुप्तहेर खात्याच्या सेक्रेटरीपदावर नवीनच नेमणूक झालेला जनरल काल्टेन बसला होता. त्याच्या चेहऱ्यावर सर्वत्र जखमांचे वण दिसत होते व त्यामुळे तो भेसूर दिसत होता. त्याचा आवाजही रूपाला साजेसाच, मारदस्त व कठोर होता. खोलीत इतरत्र चार इसम बसलेले होते. आतापर्यंतच्या सगळ्या फिल्म्स टेबलावर ठेवण्यास त्याने फर्मावले व पुढे म्हणाला,

"ह्या फिल्म्स खऱ्या असतील तर त्यातील माहिती फार उपयुक्त ठरेल. हे चार इसम फिल्मचे तांत्रिक दृष्टिकोनातून निरीक्षण करतील. आजपर्यंत घडलेली सर्व हकीकत तुला सांगावी लागेल. आम्ही काही प्रश्न तयार केले आहेत. त्यांची तुला उत्तरे द्यावी लागतील. न जाणो शत्रूचा डाव असायचा हा."

त्या चौघांपैकी एकाने रेकॉर्डिंग मशीन चालू केले व मग सर्वजण प्रश्नांची सरबत्ती करू लागले. तासाभराच्या या कडाक्याच्या वाग्युद्धानंतर मला थोडीशी विश्रांती देण्यात आली. तेवढ्याच अवधीत फिल्म्सच्या माहितीचे निष्कर्ष काल्टेनच्या पुढ्यात आले. आता तो निःशंक बनल्यासारखे वाटत होते, तरी हा माणूस एकट्याने फिल्म् घेत नाही, त्याचा एखादा साथीदार असावा या एका निष्कर्षामुळे त्याची शंभर टक्के खात्री होईना.

मध्यंतरानंतर पुन्हा एकदा प्रश्न विचारण्यात आले व शेवटी एकदाची कटकट संपली. ते चार तज्ज्ञ निघून गेले. वातावरणातील वादळ शमले. काल्टेनने मला बसावयास सांगितले व नेहमीच्या करड्या आवाजात बोलण्यास सुरुवात केली.

"रिबेन्ट्रॉपच्या अगोदर तू मला भेटावास म्हणून सोफियाला मीच खास विमान पाठवले होते. रिबेन्ट्रॉप तुझा व पॅपेनचा द्वेष करतो हे तुला माहीतच आहे. परराष्ट्रमंत्री म्हणून तुझ्या यशाचे श्रेय तो स्वतःकडे घेईल. परंतु मी त्याला असा सोडीन होय! तुझे श्रेय माझ्याच खात्याला मिळाले पाहिजे. आजपर्यंत पाठवलेल्या सर्व फिल्म्स रिबेन्ट्रॉपच्या टेबलात कुजत पडल्या आहेत हे तुला माहीत आहे काय? तो अजूनही शंकेखोर आहे. पण आपणांस ते परवडणारे नाही. मी फ्यूररला सांगेन की, यापुढे हे प्रकरण संपूर्णतः माझ्याकडूनच दिग्दर्शिले जाईल. ठीक आहे. तुला जे दोन लाख पौंड मिळाले ते मीच पाठवले होते."

"तुमच्या पाठिंब्याने माझा उत्साह द्विगुणित झाला आहे. परंतु या प्रकरणातील मानसिक ताण असह्य आहे. आपला पाठिंबा आहेच पण त्याचबरोबर इतर अनेक खात्यांकडून होणारा प्रश्नांचा मारा थांबवा."

**सिसेरो – कोण ? कसा ?**

"जरूर जरूर. मी फ्यूररला कळवतोच, पण काय रे तो खरोखरच आपल्याशी


किंमतीने एवढा लहान !
कलेने एवढा महान—
साप्ताहिक माणूस
तन्याने सळसळणारी एक वेगळीच
दिवाळी अंक
शब्द आणि चित्रसृष्टी...
या सृष्टीची ओझरती ओळख...
९

# शेर-ए-कश्मीर शेख महंमद अब्दुल्ला

काश्मिरी राजकारणाने निर्माण केलेले
गूढ कोडे—पं. नेहरूंनाही न उकललेले

—लोकशाही आणि समाजवाद यांचा हा
तडफदार पुरस्कर्ता
फुटीर आणि जातीयवादी राजकारण खेळू लागला

## याला जबाबदार कोण ?

आपल्या या जिवलग मित्राला
अखेर पंडितजींनी कारागृहाच्या
चार भिंतींआड ढकलले.

## का ? एवढे घडले तरी काय ?





सादिक

स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच
आक्रमणाची शिकार झालेले कश्मीर
—त्याच्या फाळणीची पहिली योजना कोणी मांडली ?

## पं. नेहरूंनी की आणखी कोणी तरी

बारामुल्लावर विजयपताका रोवणाऱ्या
आपल्या हिंमतबहाद्दर जवानांची
विजयी आगेकूच कोणी रोखली ?
पाकिस्तानने ? सुरक्षा समितीने ? की ?....


श्यामाप्रसाद मुकर्जींच्या रहस्यमय
मृत्यूला जबाबदार कोण ?

शेख गेले आणि बक्षी आले
बक्षींनाही जावे लागले
आणि आता आले आहेत
गुलाम महंमद सादिक

सादिक कोणती स्वप्ने पाहत आहेत ?

करणसिंगांच्या मनात तरी काय आहे ?






## कश्मीरवर निराळ्याच छाया पडू लागल्या आहे

काश्मीरवर निराळ्याच छाया पडू लागल्या आहेत . . .



या स्वप्नांचा आणि छायांचा मागोवा घेणारी
समग्र आणि साधार
जितकी प्रक्षोभक तितकीच रंजक दीर्घकथा–

# काश्मीर

## हिरवी स्वप्ने : लाल छाया

'माणूस' दिवाळी अंकात
वाचकांना सादर केली जात आहे.

या सर्वस्वी वेगळ्या असणाऱ्या
दिवाळी अंकाची अधिक ओळख
पुढील अंकी. . . .





प्रामाणिक आहे ना ? कारण एक दिवस तो यात आपले प्राण गमावणार हे नक्कीच. त्याने दिलेल्या माहितीचा दर्जा इतका उच्च आहे की संशयाला जागाच नाही. परंतु तू सांगितलेली त्याची गोष्ट इतकी लाघवी आहे की, त्याच्या व्यक्तिमत्त्वाची संपूर्ण कल्पना मला दे बघू."

"मला वाटते तो साहसी आहे. समाजाच्या ज्या थरात जन्मला त्या थरातून वर येण्याएवढा तो बुद्धिमान व महत्त्वाकांक्षी आहे. आता तो खालच्याही थरात नाही वा उच्चभ्रू थरातही नाही. अशा प्रकारची माणसे धोकादायक असल्याचे तो स्वत:च कबूल करतो. माझ्या मते तो आपणाशी अगदी प्रामाणिक आहे व जेव्हा त्याने त्याच्या बापाचा एका ब्रिटिशाने खून केल्याचे सांगितले, तेव्हा माझे हे मत अधिकच दृढ बनले आहे."

"काय ? सिसेरोच्या बापाला एका ब्रिटिशाने ठार मारले ? अरे, मग अगोदर का नाही सांगितलेस ? अं ? त्या सर्व घटनांचे मूळ हेच असेल की !"

"हं हं, असे बोलू नका. मी हे गेल्या पत्रात कळवले आहे." काल्टेनला मी स्पष्टच सांगितले. तशी तो म्हणाला,

"मग त्या गद्धया रिबेन्ट्रॉपने हे दाबून ठेवले काय ?"

अर्धवट जळकी सिगरेट खिडकीतून रागाने फेकत तो एखाद्या चवताळलेल्या वाघासारखा येरझारा घालू लागला. त्याच्या डोळ्यांत उठलेली संतापाची तिडीक आता फक्त रिबेन्ट्रॉपचा गळा घोटूनच शांत होईल, असे भाव त्याच्या तडकलेल्या मुद्रेवर दिसत होते. पण त्या संतापाचा वाटेकरी मी झालो. माझ्याकडे धाव घेत त्याने विचारले, "त्याच्या बापास कसे ठार मारले ते तू शोधून काढ. आता मी रिबेन्ट्रॉपची मुळीच गय करणार नाही."

मीही पवित्रा घेतला, पण ज्वालामुखी थंड होण्याची लक्षणे दिसू लागली. तो खिडकीकडे गेला. स्वत:वर ताबा मिळवला व मला सांगितले, "ब्रिटिशांनी सर ह्यूज नॅचबूलसारख्या इसमाची टर्कीत वकील म्हणून नेमणूक केली यावरून तेथील राजकारणाला ब्रिटिश किती महत्त्व देतात हे तुला माहीतच आहे. तेव्हा या गोष्टी ध्यानात घे व हालचाली कर. कारण नॅचबूलचा मध्यपूर्वेतील व अति-पूर्वेतील राजकारणाचा अभ्यास दांडगा आहे."

मी काल्टेनचे आभार मानले. त्याने दिलेले फोटो मोजण्यास सुरुवात केली. तेव्हा छद्मीपणे हसत तो म्हणाला, "रिबेन्ट्रॉपला तू मला भेटल्याचे सांग. पण लक्षात ठेव, मी सांगेन तसेच तू वागले पाहिजे. बरं, तू अंकाराला कधी निघत आहेस ?"

"काही सांगता येत नाही. कारण, माझे जाणे रिबेन्ट्रॉपवर अवलंबून," असे म्हणून मी दाराशी आलो. काल्टेनही दारापर्यंत आला व म्हणाला,

"रिबेन्ट्रॉप बहुधा उद्या संध्याकाळी सातला भेटेल. तुला मी यश चिंतितो. त्याची तुला गरज आहे."

अशा रीतीने त्या भव्य इमारतीतून बाहेर पडलो; तो अगदी आनंदी मनाने.

दुसरे दिवशी सकाळीच आमच्या कैसरहॉफ या हॉटेलातील खोलीत दोन खाशा स्वाऱ्यांनी प्रवेश केला. ते म्हणाले,

## रिबेन्ट्रॉप मुलाखत

" आम्हांला काल्टेनब्रुनरने पाठवले आहे. आम्ही तुला रिबेन्ट्रॉपकडे घेऊन जाण्यास आलो आहोत. "

काल्टेन्चे ते दोघे लाळघोटे व मी परराष्ट्र मंत्र्यांच्या ऑफिसात शिरलो. सेक्रेटरी श्री. स्टीनग्राक्त व श्री. आल्टेनबर्ज आमची वाट पाहत होते. मी येताच त्यांनी फिल्म्स मागून घेतल्या. ते म्हणाले की, " मंत्रिसाहेब अजूनही या फिल्म्सच्या सत्यतेबाबत संशयी आहेत. पण आम्ही मात्र खरोखर थक्क झालो, त्यांतील माहितीने. इतकेच काय, जर्मनीचे भवितव्य वाईट आहे की काय, अशा शंका येऊ लागल्या आहेत. "

मंत्रिसाहेबांच्या भेटीस फक्त मला एकटयालाच आत सोडण्यात आले. अर्थात् ते लाळघोटे ताबडतोब पसार झाले. मंत्रिसाहेब ऑफिसात यावयाचे होते. परंतु कौन्सिलियर श्री. लिकस मात्र होता. माझ्या अनेक जुन्या दोस्तांपैकी लिकस हा एक होता. त्याने सांगितले,

" वातावरण तप्त आहे. काल्टेनब्रुनरच्या चोंबडेपणामुळे मंत्रिसाहेब संतापले आहेत. त्यांची सिसेरोबद्दलची शंका मुळीच कमी झालेली नाही. अशा परिस्थितीत तू संभाषणात पॅपेनचे नाव मुळीच घेऊ नकोस. कारण त्यांचे सख्य आहे विळचा-भोपळचाएवढे. तसे केल्यास ते काय थैमान मांडतील हे काही सांगवत नाही. "

इतक्यात खाट्खाट् आवाज करीत रिबेन्ट्रॉपची स्वारी आली. आमच्या परराष्ट्र-धोरणाचा जन्मदाता व जर्मनीचा दुसरा बिस्मार्क म्हणून स्वतःचीच पाठ थोपटणारा एक पुरुष त्याच्या भेदक निळचा डोळचांनी आमच्याकडे रोखून बघत होता.

टेबलावर मी सर्व फिल्म्स ठेवल्या. त्याने फिल्म्स पाहण्यास सुरुवात केली व मी इकडे रेकॉर्ड चालू केली. थोडक्यात सर्व मुद्दे विशद केले.

" अगदी पैशाचा लोभी दिसतो. पण त्या फिल्म्सच्या खरेपणाबद्दल तुला काय सांगायचे आहे ? " रिबेन्ट्रॉपने विचारले.

" आजपर्यंत जे कळवले त्याहून वेगळे काही नाही. माझे वैयक्तिक मत... "

" मला तुझी मते ऐकावयाची नाहीत. खरी परिस्थिती सांग. जेंके काय म्हणतो ?" रिबेन्ट्रॉप गुरगुरला.

" याबाबतीत तो माझ्याशी सहमत आहे. इतकेच काय, पॅपेनसाहेबही. "

...वाक्‌बाण सुटला होता. रिबेन्ट्रॉपचा मस्तकशूळ उठवण्यास तो पुरेसा होता. डिवचलेल्या नागाप्रमाणे त्याने फुत्कार टाकण्यास सुरुवात केली.

" पॅपेनला काय अक्कल आहे ? केवळ माझ्यामुळे तो या पदावर तरी आहे. त्याचे

नाव उच्चारून तू आमचा अपमान केलास पण तोही विसरेन एका अटीवर, तू माझी खात्री करून दे, की त्या फिल्म्स संपूर्णतः खऱ्या आहेत. मला तुझी मते नकोत की, त्या महाभागाचीही नकोत. मला सत्य परिस्थिती हवी, सत्य परिस्थिती. तुला ते काम जमत नसेल तर मी पाठवीन दुसऱ्याला. "

मनात आले याला टोला लगावल्याशिवाय शुद्धीवर येणार नाही. पण मला शांत राहणे भाग होते. मी बोलणार इतक्यात लिकस माझ्या मदतीस आला. तो म्हणाला,

" मोझिसला फिल्म्सच्या खरेपणाबद्दल १०० टक्के-पुरावा उपलब्ध करता येणे आवश्यक आहे. सिसेरो एकटयानेच फिल्म् घेत असेल तर त्या खऱ्या. नाहीतर तो मदतनीसाबरोबर काम करीत असल्यास त्यातून एखादे लचांड उद्भवेल. तेव्हा मोझीस, आता तू त्याला मदतनीस आहे किंवा काय हे शोधण्याचा प्रयत्न कर. "

" फार चांगला मुद्दा उपस्थित केलास. लिकस म्हणतो तसेच कर. आजपर्यंत तसा काही प्रयत्न केलास काय ? " परराष्ट्रमंत्र्याने विचारले.

" सिसेरोस काही प्रश्न विचारण्यापलीकडे काही नाही, " मी म्हणालो. रिबन्ट्रॉप त्रासिकपणाने फोटो फेकून म्हणाला,

" हे घे तुझे फोटो. अजून काही वेळ बर्लिनमध्येच राहावे लागेल तुला. कदाचित्, पुन्हा मी तुझी भेट घेईन."

जर्मनीचे ६५,००० पौंड आजपर्यंत खर्च झाले म्हणून तो चिडल्याचे दिसत होते.

" परंतु सिसेरो माझी वाट पाहत असेल अंकारात. " मी म्हणालो.

" पण बिण काही नाही. तुला थांबावेच लागेल. " तो फुत्कारला. मी बाहेर पडलो.

या घटना बर्लिनला नवीन नव्हत्या. या दोन बैलांच्या मारामारीत माझ्यासारख्याची अवस्था केविलवाणी होई. अशा भांडणातच त्यांना मनस्वी आनंद होई. जर्मनीच्या अंतःकाळचे घंटानाद त्यांच्या कानांत कधीच घुसले नाहीत. हजारो निरापराध माणसांच्या भयानक किंकाळयांनी त्यांच्या हृदयाला पाझर फुटला नाही. रोमला आग लागली असता वीणावादन करणाऱ्या त्या इतिहासप्रसिद्ध नीरो राजात व जर्मन सत्ताधिशांत काय फरक ? खरोखरच मी कंटाळलो तो या मूर्खांच्या भांडणाला. जर मी लंडन, पॅरिस या ठिकाणी जन्माला येतो तर माझ्या भावनांचा नक्कीच विचार केला गेला असता. या कटकटींतून मुक्त होण्यासाठी त्या सर्वांचेच मूळ असा जो हिटलर त्याला ठार मारणाऱ्यांच्या टोळीत मी जाऊ शकलो असतो. पण जर्मनीसाठी—माझ्या प्रिय देशासाठी—मला माझे कर्तव्य करणे भाग होते.

काही दिवस असेच गेले. एक दिवस जपानी वकील ओशिमाकडून चहापार्टीला बोलावणे आले. माझा त्यांनी खास सन्मान करावा याचे मला आश्चर्य वाटले.

कारण अगोदर आम्ही कधीच भेटलो नव्हतो. ओशिमाने माझे स्वागत उत्तमप्रकारे केले. राजकारणावर थोड्याशा गप्पा झाल्यावर मी निघालो. तो दारापर्यंत आला व म्हणाला, "तुमच्या अंकारातील यशाबद्दल अभिनंदन" व अत्यंत जाणीवपूर्वक त्याने स्मित केले. या ओशिमाच्या वाक्याचा अर्थ लक्षात येण्यास फार वेळ लागला नाही.

एकदा मी असाच एका खाजगी समारंभास गेलो होतो. समारंभास निरनिराळ्या क्षेत्रांतील अधिकारी व्यक्ती हजर होत्या. आतापर्यंत मला समजले होते की बर्लिन-मध्ये सर्वांच्या तोंडात सिसेरोचा विषय होता. अर्थात्‌च समारंभास माझ्यासारख्यास बोलावणे न येईल तरच नवल. सगळेजण माझ्याकडे आदराने पाहत होते, पण मी लक्ष दिले नाही. शेवटी शेवटी कित्येकांनी त्या सिसेरोनामक अद्‌भुत पुरुषाची माहिती सांगण्याचा आग्रह धरला. काय बोलावे हे सुचेना. इतिहासाची लहानपणा-पासूनच मला थोडीशी आवड होती. ज्युलियस सीझरच्या वेळी मार्कस् सिसेरो नावाचा एक योद्धा होऊन गेल्याचे वाचलेले आठवत होते. त्याच सिसेरोवर अत्यंत रटाळ भाषेत बोलण्यास मी सुरुवात केली. हळूहळू माणसे पांगत होती. शेवटी हॉल रिकामा झाला. मी खाली बसलो.

नंतर एक अतिशहाणा माणूस बोलावयास लागला. परराष्ट्र खात्यात त्याची जागा फार महत्त्वाची होती. तरीसुद्धा स्टॅलिनग्राडचे युद्ध हिटलरने किती तुटपुंज्या रणसाहित्यावर जिंकले, त्याचे रसभरीत वर्णन तो करीत होता. त्यात एक लष्करी व राजकीय गुपितही त्याने फोडले. अशा तऱ्हेने त्याने अक्षम्य गुन्हा केला. त्याबद्दल मी त्याला चांगलेच फैलावर घेतले व हॉटेलात परतलो. माझ्यासाठी हॉटेलात निरोप होता. "अंकारास ताबडतोब रवाना व्हा.– रिबेन्ट्रॉप."

त्याच दिवशी संध्याकाळी बर्लिन-ब्रुस्लॉव–व्हिएन्ना एक्स्प्रेसने मी अंकारात आलो. १९४५ च्या ऑक्टोबरपर्यंत मी आता जर्मनीला जाणार नव्हतो.

## अंकारा प्रवेश

बऱ्याच दिवसांनंतर मी आज ऑफिसात आलो, तेव्हा सेक्रेटरीकडून असे समजले की पिअरीकडून अनेक वेळा फोन आला होता.

"आणखी काही विशेष ?" मी विचारले.

"हो आहे की, गेल्याच आठवड्यात मी विवाहबद्ध झाले आहे. ह्यांना भेटण्या-साठी मला काही दिवसांची रजा मिळाल्यास बरे होईल."

"तुझ्यासारखीला रजा नाही द्यायची तर मग कोणाला द्यायची. जाव जाव, बहोत मजा करो. आपको हम रजा मंजूर करतें हैं" मी म्हणालो. आता फारच खुशीत दिसत होती मिसेस् स्नुर्शेन.

थोड्याच वेळानंतर पॅपेनसाहेबांना भेटून बर्लिनची सगळी हकीकत सांगितली. ते फार लक्षपूर्वक ऐकत होते. मध्येच ते नापसंती दर्शवीत. जपानी वकिलाच्या

"अभिनंदन आपल्या यशाबद्दल," या शब्दपंक्तीने ते फारच चिडले. ते म्हणाले, "मंत्र्यांनी फिल्मसबाबत संशय घेतला तर समजण्यासारखे आहे, पण त्याची गुप्तताही गाढवांना राखता येऊ नये? चढेलखोर लेकाचे."

स्वारी फारच गरम झालेली दिसत होती. स्वाभाविक होते ते. मी घरी आलो. तोच सिसेरोने रात्री ९ वाजता भेटावयास बोलावले आहे, असा फोन आला.

मी मोटार घेऊन बरोबर ९ च्या ठोक्याला नेहमीच्या जागी आलो. पण त्याचा पत्ता नव्हता. तिथल्या इमारतीला दोन-तीन फेऱ्या घातल्या. इमारतीच्या एका कोपऱ्याला तो उभा होता. मला पाहताच तो धावत आला व अत्यंत चोर पावलाने मोटारीत घुसला. इतके दिवस मी कुठे असल्याचे त्याने विचारले. मी बर्लिनला जाऊन आल्याचे त्याला सांगताच त्याला आनंद झाला.

तेथून अगोदरच ठरवलेल्या माझ्या मित्राच्या खोलीवर मी सिसेरोस घेऊन गेलो. तो घरातील उंची उंची फर्नीचरचे निरीक्षण करू लागला. कदाचित् तसलीच फर्नीचर्स घेण्याचा त्याचा विचार असावा. बर्लिनला जाण्यापूर्वी त्याने जी फिल्म दिली होती, त्याचे १५,००० पौंड मी त्याला दिले. तसेच बर्लिनला जाताच एक फिल्म त्याने स्वतःच एक्सपोज केली होती. पण एक्सपोजिंग त्याला जमले नव्हते. तशी ती खराब झालेली फिल्मही मला घेण्याविषयी तो आग्रह करू लागला. मी त्यास स्पष्टच सांगितले, "अरे बाबा, अशी फिल्म् घेतली तर माझी घडगत नाही." असे म्हणून त्याच्याकडची एक चांगली फिल्म् मी माझ्या खिशात टाकली व ती खराब फिल्म् त्याच्या पँटच्या खिशात टाकली. तेव्हा हाताला थंड व धातूचे काहीतरी लागले.

"म्हणजे तू पिस्तूल वापरतोस तर?" मी विचारले.

"ते वेळच आली तर मला जिवंत पकडू नये म्हणून." तो म्हणाला. तो अगदी घरच्यासारखा वागत होता. मदिरापान करीत तो आरामखुर्चीवर पहुडला होता. मी त्यास विचारले,

"काय रे? तुझ्या वडिलांचा खून झाला तरी कसा?"

**प्रश्नांचा भडिमार**

"त्यात सांगण्यासारखे काही नाही. मला आवडत नाही त्याविषयी बोललेले. पण काय रे तुला एवढी उत्सुकता का? नको तिथे नाक खुपसायची तुम्हा जर्मनांना फारच सवय बुवा!"

मला राग आला त्याचा. मी म्हणालो, "मला तुझ्या खासगी बाबीत शिरायचे नाही. पण बर्लिनला जो माणूस आपणांस एवढी अमूल्य माहिती पुरवतो त्या माणसाविषयी जास्त माहिती हवी आहे."

"तरीही मी ती सांगणार नाही. मी तुझ्या कोणत्याही प्रश्नांना उत्तरे देण्यास बांधलेला नाही. आपल्या भेटीने दोघांचाही फायदा होतो. कोणी कोणावर कृपा करत नाही यात."

"वडिलांच्या खुनाशी काही गुप्त गोष्टींचा तर संबंध नाही ना ?"

"नाही. काहीच संबंध नाही. एका इंग्लिशाने त्यांना शिकार मारण्यास नेले व ते स्वतःच त्याचे सावज झाले. माझे वडील परकियांचा द्वेष करीत. आमच्या समाजात त्यांनी फार कटकटी निर्माण केल्या. त्यामुळे मी तर परक्यांचा फारच द्वेष करतो. मी मोठा झाल्यावर खुनाची चौकशी केली तेव्हा माझे पैशाने तोंड दाबले गेले. त्याच पैशाने मी टर्कीला आलो. परंतु माझा ब्रिटिशद्वेष तसूभरही कमी झालेला नाही. आणि आता मी त्यांचा बदला घेत आहे." त्याच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. रुमालाने डोळे पुसले व तो म्हणाला "ब्रिटिश मला फार वाईट वागणूक देतात. वकीलसाहेब नाहीत–तो अंगदी देवमाणूस आहे–पण इतर अधिकारी. आम्हांला ते रानटी पशू समजतात."

"इतके असूनही तू त्यांच्याकडे राहतोस ?"

"बदला. खुनाचा बदला हेच कारण. मी नाही राहिलो तर तुम्हांला फिल्म कशा मिळतील. काही दिवसांनी मी त्यांना सोडून देईन. भविष्यासाठी अनेक योजना तयार आहेत माझ्याकडे."

बोलण्याच्या ओघात त्याला उशीर झाला असावा. त्याने घड्याळांत पाहिले व ताबडतोब माझी रजा घेतली.

मी लागलीच घरी परतलो. दुसरे दिवशी मी बर्लिनला २० नवे फोटो धाडले. या फिल्ममध्ये लंडन व अंकारामधील ब्रिटिश वकिलातीला दिले गेलेले तांत्रिक ज्ञानाचे बिनतारी संदेश होते. आम्हांला अर्थातच ही गोष्ट फार महत्त्वाची वाटली. तसेच जर्मन–टर्की संबंधांत ब्रिटिश वितुष्ट आणण्याचा प्रयत्न करीत आहेत हे स्पष्ट दिसत होते. पण आमच्या नेत्यांना त्या गोष्टी पटल्या नाहीत.

फार दिवसांपूर्वी सिसेरोने खास बक्षिशी म्हणून पौंडांऐवजी ५,००० डॉलर्स मागितले होते. स्थानिक बँकेत एवढी मोठी रक्कम डॉलर्समध्ये मिळणे अशक्यच पण तरीसुद्धा मी प्रयत्न करण्याचे ठरवले. कारण, सिसेरोला डॉलर्सची अत्यंत जरूरी होती. तो ते पैसे धंद्यात गुंतवणार होता व त्याला खूष ठेवणे आम्हांला भाग होते.

मी आमच्या अंकारातील बँक मॅनेजरला भेटलो व पौंडांच्या बदल्यात ५,००० डॉलर्स मिळतील काय याची चौकशी केली. आम्ही सुदैवी होतो. आत्ताच एका आर्मेनियन गृहस्थाने परदेशी जाण्यासाठी डॉलर्सबद्दल पौंड मागितले होते. हे मिळालेले ५,००० डॉलर्स मी सिसेरोस देऊ केले.

बरेच दिवस झाले या घटनेला. मी तो व्यवहार संपूर्णतः विसरून गेलो. इतक्यात बँक मॅनेजरचा फोन आला. तो कोणत्यातरी संकटात होता. त्याला मी ताबडतोब भेटलो; तेव्हा असे समजले की, त्याला स्वित्झर्लंडहून टेलिग्राम आला होता. तिकडे एका स्विस उद्योगपतीने त्या आर्मेनियन गृहस्थाकडून पौंडांच्या नोटा

विकत घेतल्या होत्या. तो पुढे इंग्लंडला गेला तेव्हा त्या नोटा फसव्या असल्याचे समजले.

तत्काळ ही घटना मी बर्लिनला कळवली. मला त्यांच्याकडून संतापजनक उत्तर आले, "नोटांच्या खरेपणाबद्दल संशय घेणे हा मूर्खपणा आहे. एवढ्या लांबच्या प्रवासात खोट्या नोटा पसरवून खऱ्या नोटा स्वतःकडे घेतल्या असतील अथवा तो त्या आर्मेनियन गृहस्थाचा चावटपणा असावा. वकिलातीच्या फंडातून अंकारा बँकेत तेवढे पैसे ताबडतोब भरावे."

मी बर्लिनची आज्ञा पाळली, परंतु अत्यंत नाखुषीने. मध्यंतरी अशा अफवा उठल्या होत्या की बर्लिनमध्ये खोट्या नोटा छापण्याचा एक कारखाना आहे. परंतु सिसेरोच्या बाबतीत बर्लिनचे नेते इतका मूर्खपणा करतील, असे वाटत नाही. तरीही सिसेरोस दिलेल्या नोटांच्या पुडक्यांतील एक नोट मी तपासून पाहिली. नशीब असे की त्या नोटा खऱ्या होत्या.

एक दिवस मला बर्लिनहून भले मोठे पार्सल आले. 'विसाव्या शतकांतील हेरकथांचा तो एक मोठा संग्रह होता. त्यांच्या मते या हेरकथा मला उपयोगास येतील. बरे, त्या हेरकथांत व 'ऑपरेशन सिसेरो'त काही साधर्म्य होते म्हणावे तर तसेही नाही. नाइलाजाने पुस्तकांना अडगळीची खोली दाखवावी लागली.

आठवडाभरानंतर काल्टेनकडून जे पत्र आले ते पत्र म्हणजे सरळ सरळ मला दिलेली तंबीच होती. "ऑपरेशन सिसेरो"बद्दलचे काहीही कागदपत्र मी पॅपेनला दाखवू नये, असा मला दम भरला होता.

अर्थात् त्या गद्धयाची ही सूचना मी साफ धुडकावली व सर्व काही पॅपेनला सांगितले. या वेळी पॅपेनचा अवतार पाहण्यासारखा होता. डोक्यात कधीच राख घालून न घेणारे पॅपेन आज उग्रचंडी बनले व तत्काळ राजीनामा खरडला. परंतु थोडावेळ विचार करून राजीनामा केराच्या टोपलीत फेकून दिला.

डिसेंबर महिना म्हणजे सिसेरोचा अविस्मरणीय काळ. भूतकाळात कधीही नाही इतक्या महत्त्वाची माहिती त्याने या वेळी आणून दिली. या धामधुमीच्या काळात सिसेरो मला जास्तच बोलका वाटला. त्याचा पहिला लाजरेपणा आता दिसत नव्हता. तो त्याला मिळालेल्या यशाचा सार्थ अभिमानी होता. त्याला त्याच्या भवितव्याबद्दल बोललेले फार आवडे. एका दूरच्या देशात तो टुमदार बंगला घेणार होता. पुष्कळसे नोकरचाकरही ठेवण्याची त्याची मनीषा आहे. त्याने प्रत्येक गोष्टीचा विचार करून अनेक आराखडे बनवले आहेत. पण ते त्याने कधीच सांगितले नाही. त्याच्या पेहेरावात आता चांगलाच बदल झाला होता. एखाद्या कोटयधीशासारखा तो आता पोशाख करीत असे. एक दिवस मी त्याला म्हणालो,

"अरे, हा तुझा पोशाख पाहून कोणी विचारत नाही काय? यानेच एक दिवस गोत्यात येशील." त्याला ते पटले. हातातील सोन्याचे घड्याळ काढून ते मला जपून ठेवण्याची त्याने विनंती केली.

मध्यंतरीच्या काळात दोस्तांच्या कैरो व तेहरान येथे बैठकी झाल्या होत्या. सिसेरोचा फोन आला तेव्हाच मी ओळखले की, या बैठकीचा वृत्तांतच आपल्याला आता मिळणार. त्याच दिवशी रात्री मला एका भोजन समारंभास जावयाचे होते. म्हणून सिसेरोला जरा लौकरच भेटावयास आठ वाजता मी नेहमीच्या जागी गाडी घेऊन पोचलो व सिसेरो आपल्या मांजरपावलाने हळू हळू जाणाऱ्या गाडीत घुसला. तोसुद्धा घाईत दिसत होता. मी त्याला दोन रोल्सबद्दल पैसे दिले व पुढच्याच गल्लीच्या कोपऱ्यावर तो निसटला.

फिल्म् घेऊनच मी भोजन समारंभास गेलो. खिशांतील फिल्म्समुळे पार्टीच्या आनंदावर विरजण पडणे स्वाभाविक होते. कोणी ब्रिज खेळत आहेत, तर कोणी संगीतात रममाण आहे. कोणी गोष्टीवेल्हाळाच्या सभोवती गोळा झाले आहे. पण माझे कशाकशात लक्ष लागेना. ताबडतोब वकिलातीत परतलो. पत्नीला घरी पाठविली व शुभस्य शीघ्रम् या न्यायाने लागलीच डेव्हलपिंगच्या कामाला सुरुवात केली.

रात्रभर काम करून दुसरे दिवशी बर्लिनसाठी एक अहवाल तयार केला. त्याचे टंकलेखन अर्थातच मला करावे लागले. आमची सेक्रेटरी मिसेस् स्नुर्शेन ऑफिसात येत होती, पण मी टंकलेखन करीत असल्याचे पाहूनही तिने काहीच शेरा मारला नाही. सेक्रेटरी असावी तरी अशी हुशार.

प्रस्तुत फिल्म्समध्ये अत्यंत महत्त्वाची माहिती होती. मॉस्को, कैरो, तेहरान येथील आमच्या शत्रूंत झालेल्या खलबताचा त्यांत वृत्तांत होता. त्या फिल्म्स पाहून जगाला हादरा देण्याऱ्या जर्मनीची विकलांग अवस्था होणार असल्याचे स्पष्ट दिसत होते. चर्चमध्ये जर्मनीची मृत्युघंटा वाजत असल्याचा भास होता. जर्मनीचे दिवस संपल्याची ती क्रूर भविष्यवाणी होती. मॉस्को बैठकीत आम्हांला गाडण्याची तयारी झाली. कैरोला शेवटचा हात फिरवण्यात आला आणि तेहरानला तिघा बड्यांनी मृत्युदरबारात जर्मनी येत असल्याची घंटा वाजवली.

सिसेरो दर दोन-तीन दिवसांनी आता अत्यंत महत्त्वाच्या फिल्म्स आणू लागला. डिसेंबरचा दुसराच आठवडा चालू होता. सिसेरोने मला फोन केला व भेटावयास बोलावले. नेहमीप्रमाणे गाडीत आमचे व्यवहार झाले. सिसेरोने या वेळी फिल्मबरोबर एक लहानसे पार्सल दिले.

" हे बघ. ही पुडी उघडू नकोस. फक्त बर्लिनला पाठव. त्यांना याचे काय करायचे आहे ते माहीत आहे. " तो म्हणाला.

### गाडीचा पाठलाग

मला फार आश्चर्य वाटले. त्यात काय आहे म्हणून विचारणार तोच मागून प्रकाशाचा झोत आला. मी बाहेर वाकून पाहिले. एक लिमोसीन मोटर आमच्यामागून येत होती. आमच्या मोटरची नंबरची पाटी मुद्दाम मातीने मढवून घेतल्याने मनाच मी धन्यवाद दिले.

मी मोटार रस्त्याच्या कडेस थांबवली हेतू हा की, मागील मोटार पुढे जावी. परंतु लिमोसीनही थांबली. आता मला थोडासा संशय आला. त्या मोटारच्या प्रखर दिव्याने आमच्या मोटारमधील सर्व भाग उजळून गेला होता. सिसेरोला मात्र हे काय चालले आहे याचा पत्ताच नव्हता. प्रकाशामुळे तो थोडासा चाळवला गेला इतकेच. त्यामुळे त्याने पडदे खेचून घेतले. याच वेळेला मागील मोटार मंदगतीने आमच्याकडे येत होती. आता मात्र माझा संशय पक्का झाला व थोडासा घाबरलोही. मी गाडीचा ॲक्सिलरेटर दाबला. गाडीने वेग घेतला. मागील मोटारही त्याच वेगाने पळू लागली. मी ब्रेक्स दाबले. त्या पाठलाग करणाऱ्या गाडीचाही वेग कमी झाला. आमच्या व्यवहाराबाबत नक्कीच ब्रिटिशांना समजले होते व त्यामुळेच ते सिसेरोचा पाठलाग करीत होते.

आता मी मुद्दाम गल्लीबोळातून गाडी हाकू लागलो. त्याचाही काही उपयोग नव्हता. माझे हात भीतीने थरथरत होते, तरीही मी निसटण्याची पराकाष्ठा करीत होतो. इकडे सिसेरोची अवस्था केविलवाणी झाली होती. त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता. कपाळावर घर्मबिंदू जमा झाले होते. छाती धडधडत होती. त्याने हाताने सीट पकडली व विचारले, " जरा जोरात चल की. "

" त्याचा काही उपयोग नाही. तरीही प्रयत्न करतो मी. " मी निराशेने म्हणालो. शेवटचा प्रयत्न म्हणून पुन्हा भयंकर वेगाने मी गल्लीगल्लीतून गाडी हाकू लागलो. असा बराच वेळ झाल्यावर सहज मागे वळून पाहिले. तो त्या गाडीचा पत्ता नव्हता. माझा जीव भांड्यात पडला. आम्ही सरळ जर्मन वकिलातीकडे निघालो.

"मला कृपया ब्रिटिश वकिलातीत पोचव बघू." अत्यंत क्षीण असा आवाज आला. मी भरधाव वेगाने त्याला ब्रिटिश वकिलातीजवळ पोचवले. स्वसंरक्षणार्थ वाटेत उभा असलेल्या पोलिसाने बाजूस उडी घेतली तरी त्याची मी पर्वा केली नाही. थोड्याच वेळाने सिसेरोने बाहेर उडी मारली. मी वळून पाहतो तो सिसेरो केव्हाच अंधारात लुप्त झाला होता.

मी तसाच ऑफिसात परतलो. हृदयाची धडधड थांबली नव्हती. हात थरथरत होते. मी फिल्म्सचे रोल तिजोरीत ठेवले व ती लहानशी पुडी सोडली. साधारण आगपेटीच्या आकाराच्या त्या वस्तूस मेणाचा वास येत होता. ती वस्तू मी जरा निरखून पाहिली. तेव्हा त्यावर चाव्यांचे ठसे. ब्रिटिश वकिलाच्या तिजोरीचे होते ते ठसे. आमचे श्रेष्ठ यंत्रज्ञ तशीच चावी बनवून पाठवतील इकडे. मला सिसेरोच्या बुद्धिमत्तेचे कौतुक वाटले.

नुकत्याच घडलेल्या खळबळजनक पाठलागाचा चित्रपट माझ्या डोळ्यांपुढून सरकत होता व इकडे निद्रादेवीची माझ्यावर मोहिनी पसरत होती.

[ अपूर्ण ]

●

# प्रपंच परमार्थाच्या आड न येईल अशा युक्तीने करावा

पुष्कळ लोक जोडधंदा करतात, म्हणजे त्यांचा एक मुख्य धंदा असतो व त्याला मदत म्हणून दुसरा धंदा करतात. त्यांचे सर्व लक्ष मुख्य धंद्याकडे केंद्रित झालेले असते, म्हणजे जोडधंद्यामुळे जर मुख्य धंद्यात व्यत्यय येऊ लागला तर तो जोडधंदा ते वेळेनुसार बंदही करतात किंवा नफानुकसानीचा प्रसंग आल्यास जोडधंद्यातील नफानुकसानीकडे दुर्लक्ष करून मुख्य धंद्यातील नफानुकसानीकडे विशेष आस्थेने पाहतात. प्रत्येक माणसाने परमार्थ हा मुख्य धंदा ठेवून प्रपंच हा जोडधंदा म्हणून करावा; म्हणजेच प्रपंचात होणाऱ्या लाभहानीचा परिणाम भगवंताचे अनुसंधानावर होऊ देऊ नये. परमार्थाचे आड प्रपंच न येईल अशा युक्तीने वागावे. भाजीला जसे मीठ लागते, तसा परमार्थाला प्रपंच लागतो. मीठ नसेल तर भाजी अळणी लागते. पण मीठ जास्त झाले तर भाजी खाववत नाही. त्याचप्रमाणे प्रपंच आणि परमार्थ यांचा संबंध आहे. काही लोकांना मीठ जास्त लागते. तसे ज्यांना प्रपंचाची सवय झाली आहे त्यांना तो जास्त लागतो. त्यांची गोष्ट निराळी, पण ज्यांना प्रपंच नवीन सुरू करावयाचा आहे, त्यांनी तो बेतानेच वापरावा. भगवंत डोळ्यापुढे ठेवून वागावे. प्रपंचात व्यवहार जतन करावा खरा, पण तो काही सर्वस्व नव्हे. भगवंताचा विसर हा कोणत्याही कारणाने झाला तरी तो बरा नव्हे, मग तो प्रपंचात सुखसोयी असल्यामुळे होवो किंवा प्रपंचात दुःख झाल्यामुळे तो होवो. प्रत्येकाला प्रपंचाची अत्यंत जरूरी आहे. पण आपण त्याला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देतो व त्यामुळे सर्व बिघडते. प्रपंच पाहिजे आणि दुःख नको असे म्हणणे वेडेपणाचे आहे. मूल असेल तर ते कधीतरी आजारी पडायचेच. नवरा-बायकोचे ध्येय एकच असेल तर त्यांचा प्रपंच सुखाचा होतो. प्रपंच हा कोणाला सुटला आहे ? नुसता प्रपंच तापदायक नाही तर आकुंचित प्रपंच हा तापदायक आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या या खिशातील पैसे त्या खिशामध्ये ठेवतो, त्याचप्रमाणे प्रपंचातील आपले मन आपण काढून भगवंताकडे लावावे. तसे करण्यात समाधान आहे. जो मनुष्य हौसेने प्रपंच करील तो करण्यास चोवीस तास पुरणार नाहीत; पण जो जरूरीपुरता प्रपंच करील त्याला तीन-चार तास पुरतील. हा प्रपंच, हा संसार जर भगवंतानेच उत्पन्न केला आहे तर कोणाला तरी सुटेल काय ? जो आश्रयाखाली राहतो, त्याला संसार आहे, असे समजावे. तुकोबांना व ज्ञानेश्वर महाराजांनासुद्धा संसार, प्रपंच होता. पण त्यामध्ये त्यांची आसक्ती नव्हती, म्हणून त्यांना तो बाधला नाही. हे संत लोक फक्त देवाला घट्ट धरून राहिले, त्यामुळे सुरुवातीला जरी जगाने त्यांना सोडले तरी पुढे जगच त्यांच्या मागे लागले. जग त्यांनी सांगितलेल्या मार्गाकडे वळले. त्यांनी स्वतःला जिंकले होते, म्हणून त्यांना जगाला जिंकता आले.

# भगवंताजवळ नामाचे प्रेमच मागा

काकड आरतीच्या समाप्तीच्या दिवशी इतके दिवस म्हणजे सबंध महिनाभर एखादे सत्कर्म चालणे, हे भगवंताच्या कृपेशिवाय शक्य नाही. त्याचा मोबदला तोच देईल. तुम्ही मात्र त्याच्याजवळ मागताना नामाचे प्रेमच मागा. दुसरे काहीही मागू नका. देवाजवळ मागणे मागताना चूक होऊ नये. एखाद्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना वर्षभर उत्तम शिकविले, परीक्षेचे वेळी परीक्षक कोणते प्रश्न विचारण्याचा संभव आहे ते सांगून त्यांची उत्तरेही सांगून ठेवली, पण परीक्षक परीक्षा घेण्यास आला असता प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनीच द्यायची असतात, तेथे शिक्षक हजर असला, व विद्यार्थी उत्तर चुकीचे देत आहे, हे जरी त्याला दिसले तरी तेथे त्याला बोलता येत नाही. तशी माझी स्थिती आहे. म्हणून मागणे मागण्याचे काम तुम्हांलाच आहे तेव्हा त्या वेळी चुकीने काही भलतेच मागू नका. एवढ्याचकरिता हा इशारा आहे. कोणतीही परिस्थिती असली तरी त्यात भगवंतांचे स्मरण ठेवावे म्हणजे बऱ्यावाईट गोष्टींचा परिणाम मनावर कमी होतो. मनुष्यावर संकटे आली की तो घाबरतो; परंतु परमेश्वराचे अस्तित्व मानणाऱ्यांनी तरी असे करणे योग्य नाही. समजा, एखाद्या लहान मुलाच्या बापाने डोक्यावर पांघरूण घेऊन बागूलबुवा केला तर ते मूल भिते. पण पांघरूणाचे आत आपला बापच आहे, असे त्याला समजले की, ते घाबरत नाही. त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने आपल्याबाबतीत घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टी परमेश्वराच्या किंवा आपल्या गुरूच्या इच्छेने होतात, ही जाणीव ठेवावी; म्हणजे त्याला भीती वा दुःख वाटणार नाही. याकरिता सदासर्वकाळ भगवंताचे चिंतन करावे. कर्ज फिटताना जसा आपल्याला आनंद होतो, तसा देहभोग भोगताना आपल्याला आनंद झाला पाहिजे. प्रारब्ध टाळणे म्हणजे लोकांचे कर्ज बुडविणेच होय. आपला ( म्हणजे 'मी'पणाचा ) नाश आणि प्रारब्धाचा नाश बरोबरच होतो. दळायच्या जात्याचे दोन दगड असतात; खालचा दगड स्थिर असतो व वरचा दगड गोल फिरतो. खालचा स्थिर राहिल्याने जात्यामधून पीठ बाहेर पडते. त्याचप्रमाणे आपले शरीर प्रारब्धाच्या खुंटाने जेथे फिरेल, तेथे फिरू द्यावे, पण आपले मन मात्र भगवंताच्या ठिकाणी स्थिर ठेवावे, तरच त्यातून समाधानाचे पीठ बाहेर पडेल. "भगवंता, प्रारब्धाने आलेल्या दुःखांचा दोष तुझ्याकडे नाही. पण जर त्या दुःखामुळेच तुझे अनुसंधान टिकत असेल तर मला जन्मभर दुःखामध्येच ठेव," असे कुंतीने भगवंताजवळ मागितले. काय तिची योग्यता असेल! आज आपली योग्यता तशी नाही, हे खरे. म्हणूनच आपण भगवंताजवळ मागावे की, "भगवंता, प्रारब्धाने आलेले भोग येऊ देत, पण त्यामध्ये तुझा विसर पडू देऊ नकोस."

● ● ●

## □ शतायुषी भाग्यवंताचे चरित्र

' एकशे दोन वर्षांचे आयुष्य लाभलेले कै. रामुअण्णा किर्लोस्कर यांचे हे चरित्र त्यांच्या नातवाने संपादित केले आहे. रामुअण्णांच्या स्वतःच्या आठवणी (रोजनिशीवरून), जीवन किर्लोस्कर यांचे तीन लेख आणि रामुअण्णांच्या पत्रांतील काही उतारे या पुस्तकात आहेत. वाङ्मयीन दृष्टीने या पुस्तकाचे मूल्य काहीही नाही, आणि तो त्याचा उद्देशही नाही. मात्र शतायुष्याचे वरदान लाभलेल्या थोर पुरुषांचा दैनंदिन जीवनक्रम कसा असतो, त्यांच्या सवयी आणि वागण्याच्या पद्धती कशा असतात, जीवनात त्यांना येणाऱ्या अडचणींवर ते कशी मात करतात आणि इतरांच्या त्यांच्याबद्दलच्या भावना कशा आणि कोणत्या कारणांनी निर्माण होतात हे समजून घेण्याची अपेक्षा या पुस्तकाने पूर्ण होईल. पराकाष्ठेचा प्रामाणिकपणा, काटेकोरपणा आणि व्यवस्थितपणा हे कै. रामुअण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचेच विशेष असल्याने त्यांच्या आत्मचरित्रातही ते प्रकट झालेले आहेत. तत्कालीन समाजाचीही कल्पना या आठवणीवरून अनुषंगाने येते आणि त्यावरून चरित्रविषय थोर पुरुषांची थोरवी जास्त जाणवते. श्री. जीवन किर्लोस्कर यांच्या लेखांतून आजोबांविषयीची पूज्यबुद्धी दिसून येते. ' ये ! मृत्यो ये ! ' हे त्यांचे गद्यकाव्यही प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट आहे. त्यांच्या भावनानिष्ठतेमुळे या काव्याला गंभीरता प्राप्त झाली आहे. त्याला तत्त्वचिंतनाचे अधिष्ठान लाभल्याने स्मृतीवर चढवलेला कल्पनेचा साज मनोहर झाला आहे. यातील भावना मनाला स्पर्श करते. सायकली, पवनचक्क्यांपासून सुरुवात करून आज वृद्धिंगत झालेल्या किर्लोस्कर कारखान्याचे संस्थापक, महाराष्ट्रातील स्वतंत्र उद्योगधंद्यांचे आद्य प्रणेते व सामाजिक वर्तनाचे आदर्श शतायुषी कै. रामुअण्णा किर्लोस्कर यांचे हे चरित्र त्यामुळे वाचनीय झाले आहे. ●

## □ करमणूक करणारा ज्ञानसंग्रह

या छोट्याशा पुस्तकात खुसखुशीत करमणूक, नर्म विनोद आणि उपयुक्त माहिती यांचा साठा भरलेला आहे. हा एक संग्रह आहे. संग्राहक गो. सी. गोखले यांनी त्याचे चांगले संकलन व संपादन केलेले आहे. अनेक गोष्टी यांत सापडतील. गमतीदार कोडी, म्हणी, चुटके, ' हसण्याचे विविध प्रकार व नमुने ', ' संत एकनाथांनी रंगविलेले डाव्याउजव्या हातांचे भांडण ' याच्या जोडीलाच ' प्लॅस्टिक सर्जरी म्हणजे काय ? ', ' धनुर्वात होण्याचा संभव केव्हा असतो ', ' लिपीज लूपविषयी उपयुक्त माहिती ' यांसारख्या माहितीवजा ज्ञानाचा भरणा आहे. दीपगृहांची रचना, टेपरेकॉर्डिंग, नाणी पाडणे, प्रिस्ट्रेस्ड कॉंक्रीटचे घरबांधणीचे काम

अशांसारखी वैज्ञानिक माहितीही दिली आहे. निरनिराळ्या वनस्पतींचे घरगुती उपयोग यात आहेत. एकंदरीत, सर्वसामान्य मनुष्याला ज्या ज्या गोष्टींविषयी कुतूहल वाटते, अशा गोष्टींची माहिती देणारे, ज्ञान वाढविणारे, असे हे पुस्तक आहे. विविध विषयांतील संग्राहकाचा व्यासंग यात दिसून येतो. वाचलेली माहिती नीट संकलित करून तिचे व्यवस्थित वर्गीकरण करून त्यांनी येथे मांडली आहे. विशेषत:, प्रौढ साक्षरांना अथवा रोजच्या जीवन- व्यवसायामुळे ज्ञानोपासनेची इच्छा अपुरी राहणाऱ्यांना हे पुस्तक फार उपयुक्त वाटेल. एस्. एस्. सी. नंतर जीवनाच्या धकाधकीत हरवून ज्यांचे शिक्षितपण केवळ नावापुरतेच शाबूत राहते अशा तरुणांनी यांसारखी पुस्तके अवश्य वाचावीत. —निशिकांत मिरजकर

[ 'रामुअण्णा किर्लोस्कर' : संपादक — जीवन किर्लोस्कर : मूल्य — बारा रुपये पृष्ठे २५६. 'ज्ञानसागरातील शिंपले' — गो. सी. गोखले— किंमत दोन रुपये पन्नास पैसे — यशवंत प्रकाशन — पृष्ठे २१२ ]


"डायमंड"

टॅक्सी व रिक्षा मीटर्स

भारतात सर्वप्रथम

डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,

११८० बुधवार पेठ, पुणे २.

डायमंड वॉच कंपनी

११७९ बुधवार पेठ, पुणे २.

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची घड्याळे व इन्स्ट्रुमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.



# निलम परी

मराठी रंगभूमीच्या चलतीच्या काळातही बाल-रंगभूमीकडे आवश्यक तितके लक्ष दिले जात नाही. अशा परिस्थितीत सौ. सुधा करमरकर, सौ. सई जोगळेकर या व्यक्तींनी, तसेच भरत नाटय मंदिराच्या 'बाल रंगभूमी'ने केलेले कार्य निश्चितपणे स्वागतार्ह आहे.

'तीन चोक तेरा' प्रसिद्ध शाम फडके यांनी लिहिलेले 'राजकन्या निलमपरी' हे नवीन बालनाटय भरतनाटय मंदिराच्या 'बाल रंगभूमी'ने नुकतेच सादर केले.

नाटकामध्ये जी कथा शाम फडके यांनी गुंफलेली आहे, तीत फारसे नावीन्य नाही. कोण्या एका राजाची राजकन्या निलमपरी एक जादूगार राक्षस पळवून नेतो. नेहमीप्रमाणे दवंडी पिटली जाते. राजकन्या शोधणाराला राजकन्या मिळणे क्रमप्राप्तच असते. राजकन्येच्या शोधार्थ जादूगार भगवान, 'उंदऱ्या चंदऱ्या'ची दुक्कल आणि राजपुत्र विक्रम बाहेर पडतात. राजकन्येला विक्रम सोडविणार आणि त्याला राजकन्या मिळणार हे उघड गुपित अगदी बाल गोपाळांच्यासुद्धा लक्षात येईल इतके स्पष्ट. कथानक हलते तेही प्रेक्षकांच्या अपेक्षांप्रमाणे. दुष्टांचा संहार करून सुष्टांची मदत घेऊन विक्रम राजकन्येला सोडवतो. सगळं कसं अगदी बाल-कथेच्या परंपरेला धरून.

असे असले तरी प्रयोग रंगतो. इतका की काही वेळा नाटक पाहण्यापेक्षा प्रयोग तन्मयतेने पाहणाऱ्या बाल प्रेक्षकांच्या चेहऱ्यावरील भावदर्शनाचा आस्वाद घ्यावा, असे 'मोठ्या' प्रेक्षकांना वाटते. नाटकाच्या यशाचे मोठे वाटेकरी आहेत, दिग्दर्शक वसंत दाते. मुलांना नेमके काय हवे हे त्यांनी बरोबर ओळखले आहे. संवादापेक्षा मुलांना Action आवडते हे ध्यानात घेऊन राक्षसाचे नृत्य, त्याचे रांगणे, या गोष्टींचा अंतर्भाव केला आहे.



# ...बच्चे लोकांची खुषी

सर्वच कलावंतांवर त्यांनी भरपूर मेहनत घेतली आहे.

छोटा उंदन्या ( दीपक माहुलीकर ) बच्चे लोकांना एकदम पसंत पडल्याचे दिसून आले.

नाटकामध्ये काम करणाऱ्या राजा फडणीस ( भगवान ), मनोहर यादव ( अमात्य ), उदयसिंह पाटील ( राक्षस ), राम शिदगीकर (महामंत्री) या ' मोठया कलावंतांना ' नाटक लहान मुलांसाठी आहे याची पूर्ण जाणीव असलेली दिसली. नाटक लहान मुलांसाठी असले तरी कथानकामध्ये सुसंबद्धता राखण्यासाठी काही कंटाळवाणा भाग ठेवण्यात आला आहे. उदा० महामंत्री व अमात्य यांचा प्रवेश. परंतु हा भागही जास्तीत जास्त रंजक करण्याचा प्रयत्न संबंधित कलावंतांनी व दिग्दर्शकाने केला आहे.

शाम फडके यांचे संवाद सुरेख मुलांच्या पसंतीस उतरतील व बुद्धीस मानवतील असे आहेत. निलमपरीच्या संवादांत त्यांनी साधलेली तालबद्ध लय उल्लेखनीय आहे. विषयात नावीन्य नसूनही त्यांच्या नवीन बालनाटयाची मुलांनी उत्सुकतेने वाट पाहावी इतके यश त्यांनी या नाटकाद्वारा निश्चित संपादन केले आहे. कु. रेखा अभ्यंकर यांनी निलमपरीचे नृत्य चांगले बसवून घेतले आहे. श्री. मनोहर केतकर यांचे पार्श्वसंगीत समयोचित आहे.

शेवटी आवर्जून उल्लेख केला पाहिजे, तो नेपथ्याचा. बाल-नाटयच आहे, घ्या कसेही उरकून अशी प्रवृत्ती न ठेवता निर्मात्यांनी नाटय-निर्मितीचा दर्जा समाधानकारक ठेवला आहे. राक्षसाची गुहा व त्याच्या वाडयाचा दर्शनी भाग, यांचा उल्लेख करणे अगत्याचे वाटते.

" राजकन्या निलमपरी " बालांचे तर मनोरंजन करीलच. परंतु थोरांनाही रुचीपालट म्हणून आवडेल.

— शरद गोखले

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## सव्वा रुपयाला 'हाऊसवाइफ'?

कालीदासाने म्हणे कविता लिहिली की, "वाचमर्थोऽनुधावति" अशी स्थिती व्हायची, म्हणजे त्याने लिहिलेल्या शब्दांना आपोआप अर्थ प्राप्त व्हायचा. आता तो कालीदासही गेला अन् अर्थपूर्ण शब्दांचा पुराणा जमानाही गेला. आता ज्या कवितेचा अर्थ समजेल ती फडतूस ठरते. कारण आता कशातच काही अर्थ उरला नसल्याने शब्दाला अर्थ असण्याची आवश्यकता उरली नाही. उलट एखाद्या पुराणमतवादी शब्दाला अर्थाची हौस असलीच तर त्याने पट्टीच्या मुत्सद्याप्रमाणे आत एक, बाहेर एक असे अनेक अर्थ बाळगले तरी चालते. कारण आता "दर डोई एक मत" या लोकशाहीचा काळ असला तरी एका नावाला एकच अर्थ असला पाहिजे असा कुणाचा दुराग्रह नाही. काही शब्द तर थेट हरून-अल्-रशिदप्रमाणे गुप्त वेष घेऊन वावरत असतात.

परवाचेच उदाहरण घ्या. आसामच्या मुख्यमंत्र्यांनी तेथल्या विधान सभेत अशी अजब माहिती दिली की, आसामी पोलीस खात्याला सुमारे सव्वा रुपयाची एक 'हाऊसवाइफ' पुरविण्यात आली आहे! स्तंभित झालेल्या प्रतिपक्षाने खुलासा विचारला, तेव्हा कळले की, 'हाऊसवाइफ' हा इंग्रजी भाषेतला एक पारिभाषिक शब्द असून त्याचा अर्थ सुई-दोरा व बरण्यांचा संच, असा होतो व या संचाची किंमत एक रुपया वीस पैसे होती! आता बोला, साहेबाचे डोके अजब आहे की नाही? गृहिणी ही नुसती गृहिणी नसते तर सचिव, सखीपासून "प्रियशिष्यालीनते कलाविधौ" पर्यंत अनेक गोष्टी असते, असे जेव्हा कालिदासाने लिहिले तेव्हा त्याला प्रतिभेची शर्थ केल्यासारखे वाटले असेल. पण सुईदोऱ्याने नवऱ्याच्या सदऱ्याची बटणे शिवते तीच गृहिणी हा साहेबी अर्थ कालीदासाच्या काकालाही सुचला नाही.– कसा सुचणार म्हणा! भाषा हे विचार लपवायचे साधन आहे, अशी म्हण इंग्रजीत आहे, संस्कृतात नाही. खरे म्हणजे मराठीतही असे अफलातून अर्थ काढा-

यला हरकत नाही. गृहिणी म्हणजे सुईदोरा असे एकदा ठरले की प्रिया म्हणजे साड्यांचे दुकान हे ओघानेच आले. मुद्राराक्षस म्हटले की डुलक्या घेणारा उप-संपादक हे उघड आहे, अन् मेंडीची माजी म्हटले, की जगभर निषेध-खलिते पाठवीत बसणारे भारत-सरकार हे सांगायला नकोच. शाळा मास्तर म्हटले की पाटी, दगडी पेन्सिल, बिगारीचे पुस्तक आणि शेंबूड पुसायचा सदरा एवढा संच तयार होतो. त्याचप्रमाणे पोस्टमन म्हणजे परत आलेला लेख, सौंदर्यस्पर्धा म्हणजे सुगंधी साबू अन् 'याऽहू' म्हणजे हिंदी सिनेमा हे समजायला कठीण नाही. पण 'माणूस' म्हणजे काय ? – अर्थात् "एक समग्र साप्ताहिक" !

## लाच न घेणारा वाघ

फार प्राचीन काळची गोष्ट. गृहमंत्री नंदाजींनी जाहीरपणे पैजेचा विडा उचलून प्रतिज्ञा केली की, दोन वर्षांत देशातला भ्रष्टाचारच नाहीसा करीन, नाहीतर राजीनामा देईन. तेव्हापासून मला सारखी भीती वाटत होती की आज ना उद्या नंदाजी मंत्रिपदाला मुकणार. चुकलो, मंत्रिपद नंदाजींना मुकणार. ती दोन वर्षे गेली, सरकारी साधूंचे सदाचार-सोहळे संपले पण भ्रष्टचार कायम तो कायमच ! मी तर चांगलाच घाबरलो, नंदाजींसारख्या जन्मजात हंगामी पंतप्रधानाला भारत खरोखरीच मुकणार काय ? पण नाही ! भारताच्या सुदैवाने नंदाजी आपले वचन विसरले. आणि भारतावरचे एक मोठे गंडांतर टळले.

पण खरे सांगू, माझ्या मते लाचलुचपतीवर जो एक रामबाण उपाय आहे तो नंदाजींनी योजलाच नाही. आता त्याला त्यांचाही इलाज नव्हता म्हणा; कारण, हा उपाय नुकताच शोधून काढण्यात आला आहे. इंडोनेशियात एके ठिकाणी एका कॉफीच्या मळ्याच्या मालकाने चोरांच्या विरुद्ध उपाययोजना म्हणून रखवाली करण्यासाठी वाघ ठेवले आहेत! कारण "वाघ लाच घेत नाहीत." आता सांगा, नंदाजींनी हा उपाय योजला का? एक तरी बिबट्या वाघ आय्. ए. एस्. मध्ये आहे का? बिबट्या वाघाचे काय घेऊन बसलात, घाटावरचे एखादे वाघरू-देखील लोअर डिव्हिजन क्लार्क म्हणून नेमण्यात आलेले नाही. कदाचित् याचे कारण असे असावे की म्हशीपासून माणसापर्यंत सगळे खायला सवकलेले हिंदुस्थानी वाघ लाच खायलाही कमी करीत नसावेत. तसे असेल तर नंदाजींचा तरी उपाय काय ? पूर्वी सरकारी अधिकाऱ्याला भेटायला जाणारा जो काळाबाजारवाला शेटिया खिशात लठ्ठसे चेकबुक घेऊन जात असे त्या ऐवजी वाघोबाच्या अॅपॉइंट-मेंटला जाताना तो दोरीला गुबगुबीत शेळी बांधून घेऊन जाईल एवढेच.

• • •

मधू लिमये : [पृष्ठ १५ वरून]

करीत बसलेले असतात. त्यांच्याएवढा त्या ग्रंथालयाचा कुणी उपयोग करीत नाही. कुठल्याही प्रश्नावर लोकसभेत बोलायचे झाल्यास त्याची पूर्ण तयारी केल्याशिवाय ते बोलत नाहीत. म्हणूनच संसद व्यवहारनिपुण मंत्र्यांनाही ते हार जात नाहीत. "मी कुठल्याही मंत्र्यावर प्रहार करायला मागेपुढे पाहत नाही, मला फक्त अगोदर माहिती हवी," ते म्हणतात. "संपूर्ण माहितीशिवाय मी कुठलीच गोष्ट करीत नाही."

आणि एखाद्या लोहचुंबकाप्रमाणे माहिती त्यांच्याकडे आकर्षिली जाते. साऱ्या देशातून असंख्य लोक त्यांच्याकडे तक्रारी, गाऱ्हाणी घेऊन येतात. दिल्लीतील त्यांच्या छोटयाशा निवासस्थानी कित्येक लोक त्यांची भेट घेण्यासाठी तासन् तास खोळंबून बसतात. आणि त्यातूनच त्यांना अमीचंद प्यारेलाल कंपनी, मिल्सुबी शिपिंग कंपनी यांसारख्या बडचा प्रकरणांची माहिती मिळते.

**स्वातंत्र्य आंदोलनात उडी**

श्री. लिमये यांचा निर्भीडपणा आणि अभ्यासूपणा लहानपणापासून लोकांच्या नजरेत भरत आला आहे. १९२२ च्या मेमध्ये त्यांचा पुण्यातच जन्म झाला. घरची अत्यंत गरिबी. वडील श्री. रामचंद्र लिमये पुण्याच्या नू. म. वि. मध्ये शिक्षक होते. चार बहिणी आणि चार भाऊ अशी ही आठ भावंडे. वयाच्या पंधराव्या वर्षीच त्यांनी त्या वेळच्या काँग्रेस सोशालिस्ट पक्षात प्रवेश केला. त्या पक्षाचे त्या वेळचे नेते श्री. एस. एम्. जोशी यांनी त्यांना पक्ष कामासाठी धुळयाला पाठविले. १९४० साली त्यांना युद्धविरोधी भाषणे केली म्हणून १ वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली. धुळयाच्या तुरुंगातच त्यांची साने गुरुजींशी प्रथम गाठ पडली. साने गुरुजींना कम्युनिस्टांमधून समाजवाद्यांकडे ओढून आणण्यामध्ये १८ वर्षे वयाच्या मधू लिमये यांचा मोठा वाटा होता. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी खानदेशमध्ये तरुणांच्या संघटना उभ्या करण्यास जोरात सुरुवात केली.

१९४२ मध्ये समाजवादी क्रांतिकारक भूमिगत होताच श्री. मधू लिमयेही भूमिगत झाले. मुंबईच्या सुप्रसिद्ध 'मूषक महाल' व 'हडळ हाऊस' या भूमिगतांच्या ठिकाणी ते श्री. एस्. एम्. जोशी यांच्याबरोबर राहत. लुंग्या नेसून डोक्यावर तिरप्या गोंडेदार लाल टोप्या घालून ते व एस्. एम्. उर्दूतून बातचीत करीत हिंडत व स्वतःला मुस्लीम म्हणवून घेऊन भाऊ, भाऊ म्हणून राहत. त्याच वेशात दोघांनाही मुंबईतच पकडले आणि श्री. लिमये यांना पुढे १९४५ पर्यंत वेगवेगळया तुरुंगांतून स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. तुरुंगात असतानाही अन्यायाविरुद्ध बंड

करून उठण्याची त्यांची वृत्ती गेली नाहीच. विसापूरच्या तुरुंगात १९४४ साली कैद्यांवर केलेल्या अत्याचारांच्या निषेधार्थ त्यांनी दहा दिवस उपोषण केले.

त्यांचा अभ्यासूपणा, त्यांची तडफ आणि विरोधातील कणखरपणा वरिष्ठ समाजवाद्यांच्या नजरेस येऊ लागला होता. १९४७ साली अँटवर्प येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी अधिवेशनात भारताचे प्रतिनिधी म्हणून त्यांना पाठविण्यात आले. १९४८ साली समाजवादी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर त्यांची निवड झाली आणि पक्षाच्या परराष्ट्र धोरण समितीचे ते चिटणीस झाले. भारतातील समाजवादी आणि कम्युनिस्ट चळवळींवर त्यांनी सखोल लिखाण केले. विशेषत:, भारतातील कम्युनिस्ट चळवळीचे १९५२ सालीच त्यांनी केलेले विश्लेषण भारतात आणि बाहेरही प्रमाण मानले जाते.

धुळ्याला तरुणांची अभ्यासमंडळे श्री. लिमये चालवीत असताना त्या मंडळात चंपा गुप्ते नावाची एक हुशार मुलगी येत असे. तिच्याशीच पुढे १९५२ साली श्री. लिमये यांनी प्रेमविवाह केला. सौ. चंपा लिमये या सध्या मुंबईच्या नॅशनल कॉलेजमध्ये एका विभागाच्या प्रमुख आहेत. त्यांचा ९ वर्षांचा चुणचुणीत अनिरुद्ध वडील दिल्लीहून घाईगर्दीत आले म्हणजे म्हणतो, " बाबा, तुम्ही गुप्तपणे का नाही हो येत ? जाहीर करून आलात म्हणजे सगळे लोक तुम्हांला भेटायला येतात. मग आम्हांला एक मिनिटभरही तुमच्याशी बोलता येत नाही. "

पक्षाची आणि आंतरराष्ट्रीय समाजवादी संघटनांची अनेक पदे भूषविल्यानंतर त्यांनी १९५५ साली गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतला होता. पोर्तुगीजांनी पकडून त्यांना बारा वर्षांची शिक्षा दिली होती. त्यांना २० महिन्यांनंतरच सोडून देण्यात आले, पण तेवढ्या अवधीत त्यांचा अमानुष छळ करून त्यांना बेदम मारहाण करण्यात आली.

पोर्तुगीज तुरुंगातून सुटल्यानंतर १९५८ सोशालिस्ट पार्टीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. तेव्हापासून त्यांनी मुंबईच्या कामगार जगतात बरेच काम केले. जॉर्ज फर्नांडीस यांच्या बरोबरीने त्यांना मुंबईच्या कामगार जगतात मान आहे. १९६४ मध्ये ते पोटनिवडणुकीसाठी मोंघीरमधून उभे राहिले, तेव्हा प्रांताबाहेरचा म्हणून त्यांना बराच विरोध झाला. तो त्यांनी सफाईने हाणून पाडला. गेल्या दीड वर्षांत त्यांनी आपल्या मतदार संघाचे अनेक दौरे केले. पूर्वी तेरा वर्षे काँग्रेस आमदार जेवढे हिंडले नाहीत, तेवढे ते हिंडले, अस्खलित हिंदी भाषेत त्यांनी अनेक भाषणे दिली आणि आता आपल्या मतदारसंघात त्यांनी अमाप लोकप्रियता मिळविली आहे.

प्रखर विरोधाचे श्री. मधू लिमये भारताच्या समाजवादी चळवळीतील प्रथमपासूनचे पुरस्कर्ते. " रचनात्मक कार्यासाठी शेवटी विध्वंसक मार्गच अनुसरावा लागतो, " असा अनुभव असल्याचे ते सांगतात आणि सध्याचे सरकार आम्हांला

रचनात्मक कार्य करू देत नाही, अशी त्यांची तक्रार आहे. लेबर युनियन्समध्ये फूट पाडणे, सहकारी चळवळींमधून विरोधी पक्षीयांना उखडून लावणे ही उदाहरणे ते आपल्या या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ देतात. लोकसभेतही आपण करीत असलेली प्रत्येक गोष्ट न्यायासाठी असते, असे ते म्हणतात. नियमांचे पांघरूण घालून सत्ताधारी पक्ष तेव्हा न्याय दडपू लागतो तेव्हाँ त्यांचा संताप होतो. आणि हे अन्याय्य नियम बदलून " जनतेच्या आशा आकांक्षांचेही खरे प्रतिबिंब " असणारी लोकसभा निर्माण करण्याच्या पोटतिडिकीने ते उठतात. लोकसभेच्या कामकाजाचे नियम बदलून ते अधिक प्रभावी आणि कार्यक्षम करावेत, असे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. इतर विरोधी आमदारांप्रमाणे त्यांच्या लोकसभेतील विरोधात बेमानपणा नाही तो यामुळेच. आणि यामुळेच सत्ताधारी पक्षाला त्यांची दखल घ्यावी लागते.

**धोकेबाज प्राणी**

प्रजासमाजवादी पक्षाचे श्री. नाथ पै आणि श्री. मधू लिमये यांची आजकाल तुलना करण्यात येऊ लागली आहे. नाथ पैंचा भाषेचा फुलोरा श्री. लिमये यांच्याजवळ नाही. पण पै यांच्याजवळ नसलेला भाषेचा कणखरपणा, क्लिष्ट गोष्टी ठोसपणे मांडण्याची शैली त्यांच्याजवळ आहे. त्यांचे मुद्दे आणि त्यांची माहिती आणि त्यांच्या वाक्यांवाक्यांतील शब्दांचा जोर हे सारे एवढे जबरदस्त असते, की ते एकदम मनावर जाऊन भिडते. श्री. लिमये यांना घशाचा त्रास आहे. लोकसभेत गेल्यापासून ते सतत बोलत आलेले आहेत. एखादी गोष्ट श्री. लिमये यांनी मनावर घेतली, की मग तडजोड नाही. कठोर निश्चयाने ते हटून उभे राहतात. अडवतात. तत्त्वाच्या गोष्टींवर जमविणे नाही, हा त्यांच्या निर्धारीपणा गेल्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेत दिसला. आणि या रोखठोकपणावर खूष होऊनच फूटबॉल संघांपासून तो बड्या सरकारी अधिकाऱ्यांपर्यंत ठिकठिकाणांहून सर्व थरांतील लोकांची त्यांना अभिनंदनाची पत्रे आली.

श्री. मधू लिमये यांनी अल्पावधीत आणि अल्पवयात ही झेप घेतली खरी. पण त्यांच्या या वेगवान प्रगतीमुळे त्यांनी अनेक शत्रू निर्माण करून ठेवले आहेत. काँग्रेशी खासदारांच्या दृष्टिकोनातून श्री. लिमये एक " भयंकर धोकेबाज " प्राणी झाले आहेत तर विरोधी पक्षीयांच्या सतत अग्रभागी राहून झळकल्यामुळे इतर अनेकांत त्यांच्याबद्दल असूयाही निर्माण झाली आहे. सं. सो. पा. चे भांडवल म्हणजे तडफदार पुढारीच. त्यात आता मधू लिमयांनी मोठीच भर टाकली आहे. त्यामुळे सं. सो. पा. येत्या निवडणुकीत श्री. लिमये यांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेईल आणि तो बऱ्याच ठिकाणी कामीही पडेल यात शंका नाही.

श्री. लिमयेसुद्धा आपल्या यशाचे सारे श्रेय पक्षाला देतात. एवढा कणखरपणा तुम्ही आणला कुठून आणि एवढे आश्चर्यकारक यश मिळविले कसे, असे विचारले तर ते म्हणतात, " यात आमच्या पक्षाच्या धोरणाचाच मोठा आहे. सर्वंकष, सर्वां-

-गीण विरोधाचे आमच्या पक्षाचे धोरण मी कसोशीने पाळण्याचा प्रयत्न करतो एवढेच. कारण पक्षाचे धोरण एवढे स्पष्ट असल्याशिवाय कुणीच एवढे रोखठोक वागू शकत नाही. "

श्री. लिमये विरोधी नेत्यांमध्ये तरुण आहेत. त्यांचे वाचन, निरीक्षण, समाज-परिस्थितीचा अभ्यास दांडगा आहे. लोकांची नाडी त्यांना अचूक हेरता येते. कामे उरकण्याची त्यांची तडफ विलक्षण आहे. दिल्लीला लोकसभा चालू असताना जेवणा-खाणाची फिकीर न करता ते अठरा–अठरा तास कामे करीत असतात. विरोधी पक्षांत असल्याने सांगवत नाही. पण त्यांचा राजकीय भविष्यकाळ उज्ज्वल आहे, हे निश्चित.

सध्या श्री. लिमये भारताच्या झंझावाती दौऱ्यावर आहेत. प्रकृतीला मानवत नसतानाही एकेका ठिकाणी चार-चार भाषणे करीत हिंडत आहेत. घसा दुखत असतानाही तासन तास बोलत आहेत. प्रवासातच ते श्रमाने झोपी जातात. पण विश्रांती घेऊन भागणार नाही. निवडणुका आता जवळ आल्या आहेत. आणि भारतात सर्वत्र सर्वदूर लोकप्रियता संपादन केलेला श्री. मधू लिमये यांच्यासारखा एकच तरुण नेता सं. सो. पा. मध्ये आहे. त्यांनी आपल्या सांसदीय पराक्रमामुळे जनमनावर टाकलेली मोहिनी अद्याप ताजी आहे. आणि या गोष्टीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे पक्षाच्या दृष्टीने अवश्य आहे.

श्री. मधू लिमये यांच्या लोकसभेतील प्रवेशामुळे संसदीय कामकाजाला ज्या-प्रमाणे जिवंतपणा आला आहे, त्याचप्रमाणे फाटाफुटीमुळे बुडण्याच्या बेताला आलेल्या संयुक्त समाजवादी पक्षातही नवा जीव ओतला गेला आहे. हे निश्चित. त्यामुळेच सं. सो. पा. आता पुन्हा एकदा नव्या दमाने उभे राहण्याचा प्रयत्न करीत आहे.

## 'माणूस' प्रतिनिधी आणि श्री. लिमये

**प्रश्न :** सर्व विरोधी पक्षांच्या एकजुटीविषयी आपण बोलता. आपला सर्वांत जवळचा प्रजासमाजवादी पक्ष यांच्याशी निवडणूक एकीविषयी आपण काय करीत आहात ?

**उत्तर :** प्रजासमाजवादी पक्षाच्या अध्यक्षांना मी स्वत: पत्रे पाठवून काही योजना सुचविल्या आहेत समाजवादी जागा आपापसात वाटून घेण्याविषयी. ज्या जागां-वरून पूर्वी समाजवादी पक्षांतर्फे उमेदवार निवडून आले होते, त्या जागा आम्ही दोन पक्षांनी त्या त्या मतदारसंघांतील आमचे सध्याचे बलाबल ठरवून वाटून घ्याव्यात, अशी माझी सूचना आहे. पण या सूचनेला मला अद्याप प्रतिसाद मिळाला

नाही. मी डाव्या आणि उजव्या कम्युनिस्टांनीही कम्युनिस्ट मतदार संघ असेच वाटून घ्यावेत अशी सूचना केली आहे. जिथे बलाबलाचा निर्णय लागत नसेल, तेथे लवाद नेमावा.

**प्रश्न :** जनसंघ आणि सं. सो. पा. यांच्या युतीचे मागे प्रयत्न झाले. या युतीआड तत्त्वे येतात की व्यक्ती ?

**उत्तर :** जनसंघाशी—वास्तविक पाहता सर्वच विरोधी पक्षांशी—मर्यादित एकी करण्याचे आमचे प्रयत्न चालू आहेत. जनसंघाशी आमची बऱ्याच ठिकाणी युती होऊ शकेल असा रंग दिसतो. मागे काय झाले त्याचा इथे संबंध येत नाही.

**प्रश्न :** एका बाजूला जनसंघासारखा उजवा मानला जाणारा पक्ष आणि दुसरीकडे डावे कम्युनिस्ट या सर्वांशी निवडणुकीसाठी 'मर्यादित एकी' करण्याची सं. सो. पा. ची भाषा आहे. हे कसे शक्य आहे ?

**उत्तर :** सत्ताधारी पक्षाला सर्वंकष आणि सर्वांगीण विरोध करण्याचे सं. सो. पा. चे धोरण आहे. यातच याचे उत्तर आहे. सं. सो. पा. हाच असा पक्ष आहे की जो काँग्रेसला एवढा संपूर्ण हातचे काही न राखता विरोध करतो. बाकीच्या पक्षांचे तसे नाही. त्यांचा काही बाबतीत काँग्रेसला विरोध असतो तर काही बाबतींत पाठिंबा. त्यामुळे सर्व विरोधी पक्षीयांना सं. सो. पा. त काही ना काही समान तत्त्वे आढळतातच म्हणून तो सर्व विरोधी पक्षांना स्वीकारार्ह आहे.

**प्रश्न :** भारतातील समाजवादी पक्षांनी सुरुवातीपासून संघटनेकडे दुर्लक्ष केले आहे. केवळ काही तडफदार नेत्यांच्या जोरावर समाजवादी पक्ष टिकून आहेत, असे का ?

**उत्तर :** संघटनेबाबतचा आक्षेप बरोबर आहे. देशात, लोकसभेत रान उठविण्याच्या बाबतीत सं. सो. पा. ला नेत्रदीपक यश मिळाले आहे. पण संघटना मात्र कमजोर आहे, सं. सो. पा. मध्ये हे न्यून आहे. याला कारण आमचे तसे जोरदार प्रयत्न झाले नाही म्हणा किंवा करूनही आम्ही अद्याप या बाबतीत अयशस्वीच झालो. संघटनेच्या दृष्टीने मजबूत असल्याशिवाय कोणताही पक्ष सत्तेवर येऊ शकत नाही हेही मान्य आहे.

**प्रश्न :** आपण जवळ जवळ सर्व केंद्रीय मंत्र्यांवर टीकेची झोड उठवून त्यांना धारेवर धरलेत. संरक्षण मंत्र्यांच्या बाबतीत आपण बहुश: मौन पाळलेत. याचा अर्थ फक्त संरक्षण मंत्रालयाचा कारभार सुरळीत चालू आहे काय ?

**उत्तर :** आपण असे म्हणू शकत नाही. संरक्षण मंत्र्यांना पेचात टाकणारे प्रश्न कुणी विचारले ? छांब-जौरीयन विभागातील ३६ एकर जमिनीच्या भांडणाबद्दल आणि नागा बंडखोरांनी फ्रेंच रॉकेट्स् आणि लाँचिंग पॅड्स् वापरली, त्याबद्दल कुणी

संरक्षण मंत्र्यांना विचारले ? आता हे खरे आहे की संरक्षणाबद्दल आम्हांला माहितीच फार कमी मिळते. आणि 'कुठल्याही प्रश्नाला उत्तर देणे सुरक्षिततेच्या दृष्टीने हिताचे नाही,' असे सांगून संरक्षण मंत्री आमच्या तोंडाला पाने पुसू शकतात. त्यामुळे आम्ही सखोल मार्मिक प्रश्नही विचारू शकत नाही.

**प्रश्न :** संरक्षण व्यवहाराबाबत एवढी गुप्तता राखणे हे खरोखरच अवश्य आहे काय ?

**उत्तर :** मुळीच नाही. इतर देशांतही तशी राखत नाहीत.

**प्रश्न :** यावर उपाय काय ?

**उत्तर :** प्रश्न फारच व्यापक आहे. संरक्षण मंत्र्याला सर्व तऱ्हेचे प्रश्न विचारण्याचा आणि सर्व कागदपत्रे तपासून पाहण्याचा अधिकार असणारी स्थायी समिती नेमणे हा एक उपाय.

**प्रश्न :** भारत-चीन तंटा कोणत्या मार्गाने सोडवावा ? शस्त्र हाती धरावे काय ?

**उत्तर :** आपल्यामागून स्वातंत्र्य मिळवूनही चीनने आर्थिक, औद्योगिक व लष्करी प्रगतीत आपल्यापेक्षा खूपच पुढे आघाडी मारली आहे हे सत्य आहे. चीनचा औद्योगिक पाया मजबूत आहे. लष्कर अधिक बलवान आहे. शस्त्रसामर्थ्य आपल्यापेक्षा जास्त आहे. शिवाय चिनी सैन्य हे चिनी समाजातील एकीचे आणि समानतेचे प्रतीक आहे. चिनी शेतकरी मार्शलपदावर चढल्याची उदाहरणे आहेत. उलट भारतीय सैन्य आपल्या विषम, फाटाफूट झालेल्या समाजाचे प्रतिबिंब आहे. आपल्यांत तशी औद्योगिक क्रांती झाल्याशिवाय, तशी सामाजिक क्रांती झाल्याशिवाय चीनविरुद्ध शस्त्र धरणे आपल्याच हिताचे नाही. सं. सो. पा. ला तशी क्रांती अभिप्रेत आहे.

**प्रश्न :** काँग्रेसला पर्यायी असा बलवान विरोधी पक्ष निर्माण होण्याअगोदर जर केवळ 'मर्यादित एकी'साठी एकत्र येऊन विरोधी पक्षांनी काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचले तर या विरोधी पक्षांना सत्ताग्रहण करता येईल काय ?

**उत्तर :** मुख्य म्हणजे काँग्रेसचा संपूर्ण राष्ट्रीय पराभव झाल्याशिवाय मोठा राष्ट्रव्यापक पर्यायी राजकीय पक्ष निर्माणच होणार नाही. जोपर्यंत असा पर्यायी पक्ष निर्माण होत नाही तोवर अशा प्रायोगिक अवस्थेतूनच जावयास हवे. काँग्रेसने संघटित अराजक निर्माण केले आहे ते गेले तर त्यांच्या जागी फारच झाले तर असंघटित अराजक येईल. ते अधिक बरे.

●

# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

## दिनांक ८ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर १९६६

**मेष :** सप्ताहात रवी, बुध आणि मंगळ या तीन ग्रहांची आपणांस अनुकूलता आहे. या सप्ताहात चंद्राची पण चांगली अनुकूलता आहे. त्यामुळे मन प्रसन्न राहून कार्यात सिद्धी प्राप्त होईल. नोकरीत बढतीचा योग आहे. संततिसौख्य चांगले मिळेल. पत्नीच्या प्रकृतीस मात्र किरकोळ त्रास. दिनांक ११ फारच शुभ. या तारखेस कोणतेही नवीन काम करण्यास हरकत नाही. प्रयत्नाने पुढे येण्यास चांगलाच योग आहे. अश्विनी नक्षत्र असणारांना हा सप्ताह फारच चांगला आहे. अकस्मात लाभाचा योग. पैसे देण्या–घेण्याचे व्यवहारात दक्षता घ्यावी. जे लोक टक्निकल किंवा यांत्रिक विभागात असतील, त्यांना बढती मिळेल.

**वृषभ :** या सप्ताहात सुखस्थानात मंगल व लग्नेष पंचमात नीच. त्यामुळे कौटुंबिक अडचणी व प्रकृतीस त्रास उद्भवेल. संततीच्या आरोग्याबाबत मात्र किरकोळ त्रास. आर्थिक अडचणी निर्माण होतील. नोकरीमध्ये वरिष्ठांशी मतभेद होऊन कामाचा बराच ताण पडेल. अकारण वादविवाद व वैमनस्याचा योग आहे. प्रवास शक्यतो टाळावा. घरात कोणी ना कोणी तरी आजारी पडून औषधपाण्याचा खर्च होईल. व्यवहारात नम्रता व लीनतेचे धोरण ठेवावे. त्यायोगे अडीअडचणी बऱ्याचशा कमी होतील. रक्तविकार व कातडीच्या विकारांपासून त्रास होईल. कोर्टकामे लांबणीवर टाकावीत. ज्यांना तुम्ही आपले म्हणता, तेच विश्वासघात करतील. दिनांक ९ व १० ह्या अनुकूल असून दिनांक १२ प्रतिकूल आहे.

**मिथुन :** या सप्ताहात आपला राशीस्वामी शुभस्थितीत आहे व मंगळासारखा पराक्रमी ग्रहही अनुकूल आहे. म्हणजे तर दुधामध्ये साखरच. आता आपण कोणतेही कार्य हाती घ्या त्यात यशप्राप्ती निश्चित होईलच. मन उल्हसित राहून नवचैतन्य निर्माण होईल. मित्रांचे चांगले सहकार्य मिळेल. प्रियकर-प्रेयसींना हा सप्ताह स्वर्गीय आनंदाचाच वाटेल. शास्त्रीय, तत्त्वज्ञ, पंडित यांना समाजात मान्यता व प्रतिष्ठा मिळून त्यांना समाजात मानाचे स्थान मिळेल. संतती व पत्नीही मनाप्रमाणे वागेल. दि. ११ व १२ शुभ.

**कर्क :** आपल्या राशीवर गुरुमहाराजांची पूर्ण कृपा आहे व रवीसारखा तेजस्वी ग्रह आपणांस साहाय्यकर्ता आहे. त्यामुळे मन प्रसन्न राहून आनंदी वातावरण राहील. पैसा मिळविण्यापेक्षा पैसा राखणे महत्त्वाचे आहे, पैशाच्या खर्चात नियमितपणा ठेवा. कारण, मंगळाच्या प्रतिकूलतेमुळे अनाठायी द्रव्यखर्च होईल. दि. १३ व १६ फारच शुभ आहेत. ज्या कार्याकरता आपण मनस्वी प्रयत्न करीत होतात, त्यात

आता निश्चितपणे यश मिळेल. पत्नीच्या प्रकृतीस मात्र जपावे. गर्भवती स्त्रियांनी या सप्ताहात विशेष काळजी घ्यावी. प्रवासाचा योग येईल. दुसऱ्यावर आपल्या उत्तम व्यक्तिमत्त्वाची छाप पडेल. एकंदरीत या सप्ताहात कर्तबगारीला चांगलाच वाव आहे.

**सिंह :** या सप्ताहात आपल्या राशीतून मंगळाचे परिभ्रमण सुरू होत आहे. मूळचे आपण तापट व करारी स्वभावाचे. त्यास मंगळामुळे आणखीन चांगलीच धार चढेल. तरी कोणत्याही कार्यात आपण संयम ठेवावा. आकाशात मनाने व्यर्थ उंच भरारी मारू नये. कारण आपणांस ग्रह पूर्णांशी साहाय्यभूत नाहीत. केवळ क्षुल्लक कारणांवरून आपण चांगल्यांची मने दुखवाल. बोलण्यापेक्षा कृतीकडे आपण जास्त लक्ष द्या. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे. गुरुमहाराजांच्या अवकृपेमुळे आपणांस कोणत्याही कार्यात अडथळे निर्माण होतील. दिनांक ९ व १० प्रतिकूल आहेत.

**कन्या :** आपणांस रवि-गुरूची अनुकूलता आहे, परंतु मंगळासारखा प्रखर ग्रह प्रतिकूल असल्यामुळे आपणांस व्यवहारात १६ आणे यशप्राप्ती होणार नाही. आपण मूळ विचारी, संयमी व शांत धोरणाचे आहात. तरी धीमेपणानेच कार्य करावे. उतावळेपणा करू नये. त्यायोगे कार्यातील विघ्ने कमी होतील. संततीच्या प्रकृतीबद्दल काळजी घ्यायला हवी. विद्यार्थ्यांस विद्येत अडीअडचणी निर्माण होतील. अभ्यासात मन लागणार नाही. दिनांक १०-११ प्रतिकूल. १३, १४ मात्र अनुकूल आहेत. महिलांचे बाबतीत त्यांचे पतीस उष्ण विकारांपासून किरकोळ त्रास. अकारण वादविवाद व भांडणाचा योग. प्रवास शक्यतो करू नये. मित्रांपासून धोक्याचा संभव.

**तूळ :** आपणांस गुरू–मंगळांचे चांगले साहाय्य आहे. त्यामुळे नोकरी व्यवसायात प्रगती होऊन अर्थप्राप्तीत प्रगती होईल. स्थावर व कोर्टकामांत अनुकूलता. रवि–शुक्राच्या प्रतिकूलतेमुळे आरोग्याबाबत मात्र दक्षता घ्यावयास पाहिजे. दिनांक १३–१४ प्रतिकूल. चित्त शांत ठेवावे. कोणतेही नवीन कार्य करू नये. संततीचे तब्येतीस त्रास, मित्र व पत्नी यांचे चांगले सहकार्य मिळेल. बेकारांना नोकरी मिळेल. दिनांक १० व ११ ह्या शुभ तारखा. अनुकूल घटना घडतील. नोकरीत बढती व कोर्टकामांत यश. विद्यार्थ्यांना मात्र अभ्यासात व्यत्यय येईल. अर्थप्राप्तीच्या दृष्टीने प्रवास सुखप्रद होणार नाही. महिलांच्या बाबतीत त्यांचे मन प्रसन्न होऊन त्यांच्या इच्छा पूर्ण होतील.

**वृश्चिक :** आपल्या राशीस रवि–मंगळ ह्या तेजस्वी ग्रहांची चांगलीच अनुकूलता आहे. त्यामुळे मन प्रसन्न राहून कोणत्याही कार्यात यशप्राप्ती होईल. या सप्ताहात दिनांक ११ ते १४ फारच शुभ आहेत. संतती, पत्नी, मित्र यांचे सहकार्य चांगले मिळेल. अनुकूल घटना घडून अकस्मात लाभाचा योग येईल. नोकरीत अकस्मात बढतीचा योग व बदलीचा पण योग. व्यापारी, कलावंत यांना उत्तम फायदा होऊन नवीन कामेपण मिळतील. गेले वर्षभर आपण बराच त्रास काढलात. पण आता तो नष्ट होत आहे. कोणतेही नवीन व्यवसाय करण्याच्या दृष्टीने चांगलीच अनुकूलता

आहे. ज्यांचे विशाखा नक्षत्र चतुर्थ चरण आहे, त्यांना हा सप्ताह बराच अनुकूल आहे.

**धनू** : आपला राश्याधिपती अष्टम स्थानामध्ये आहे. तथापि रवी, मंगळ, शुक्र या तीन ग्रहांचेही पण आपणांस पूर्ण पाठबळ आहे. त्यामुळे बऱ्याचशा अडचणी दूर होतील. मित्रांचे सहकार्य चांगले मिळेल. मंगळासारखा तेजस्वी ग्रह गेला महिनाभर आपणांस प्रतिकूल होता. तो आता अनुकूल असल्यामुळे गेल्या महिन्याशी या महिन्याची तुलना करता आपल्या कार्यातील विघ्ने नष्ट होऊन आशादायक वातावरण निर्माण होईल. संततीच्या तब्येतीस स्वास्थ्य. पत्नीच्या तब्येतीस किरकोळ त्रास. विद्यार्थ्यांस विद्याभ्यासात प्रगती होईल. दिनांक १०–११ शुभ आहेत. या दिवशी मनाजोगत्या घटना घडून येतील. शनि–मंगळांच्या प्रतिकूल योगामुळे कुटुंबामध्ये अधून-मधून अस्वास्थ्य निर्माण होईल.

**मकर** : आपला राशीस्वामी वक्री असून मंगळही या सप्ताहात प्रतिकूल आहे. त्यामुळे प्रामुख्याने प्रकृतीस जपावे. यंत्र, अग्नी, प्रवास इत्यादी गोष्टींपासून धोका. कोणतेही नवीन आर्थिक व्यवहार करू नयेत. काही विशिष्ट प्रलोभनामुळे अर्थप्राप्तीबद्दल मोह निर्माण होईल. तरी प्रलोभन टाळावे. त्यात यश मिळणार नाही. स्थावरांच्या कटकटी निर्माण होतील. नोकरीव्यवसायात पूर्णपणे दक्षता घ्यावी. कारण अकस्मात त्रास, कोर्टदरबार इत्यादी प्रसंग उद्‌भवतील. आपली साडेसाती संपली आहे. तरी ह्या सप्ताहात पुन्हा आपल्याला साडेसाती सुरू झाली काय, असे वाटेल. वरिष्ठांशी मतभेद होतील व गैरसमजुतीमुळे ठपका येण्याचाही संभव आहे.

**कुंभ** : आपला राशिस्वामी वक्री असून व मंगळ आणि रवीसारखे ग्रहही प्रतिकूल आहेत. त्यामुळे अकारण कटकटी निर्माण होतील. कनिष्ठ लोकांपासून त्रासाचा संभव. कोणाशीही वादविवाद घालण्याची ही वेळ नाही. खाण्यात संयम ठेवा. कारण पोटातील विकारांपासून त्रासाचा संभव. ग्रहमान प्रतिकूल असल्यामुळे आपल्या आप्तस्वकीयांना आपली जरी वागणूक कितीही चांगली असली तरी त्यांना ती पटणार नाही व त्याला ते दोष देतील. भावी कालाकडे पाहून मौन सांभाळणे इष्ट आहे. दिनांक १३–१४ फारच प्रतिकूल. या दिवशी कोणतेही व्यवहार न करता ईश्वरी प्रार्थनेत दिवस घालवावेत.

**मीन** : आपल्या राशीवर गुरूची पूर्ण कृपा आहे. मंगळही त्यात शुभ आहे. त्यामुळे प्रयत्नांत चांगलाच वाव आहे. विरोधकांचे विरोध नष्ट होतील. कोर्टकामात यश मिळेल. विद्यार्थ्यांना विद्याभ्यासात चांगली प्रगती. संततिसौख्य चांगले मिळून घरात संततीच्या शुभकार्याविषयी चौकशी चालेल. प्रवासाचा योग. अकस्मात अर्थप्राप्ती पण होईल. दिनांक ८–९ या तारखा शुभ. मनाजोगत्या घटना घडतील. इच्छित कार्यात यशप्राप्ती मिळेल. मन प्रसन्न राहून घरात आनंदी वातावरण राहील. पत्नीही मनाप्रमाणे वागेल. पत्नीच्या प्रकृतीस थोडा त्रास. तिच्याशी किरकोळ प्रमाणात वादविवाद होतील. ●

# प्यार किये जा

## मजाच मजा

नवे हिंदी चित्रपट पाहण्याचे धाडस आजकाल क्वचितच होते. परवा ते केले! आणि एकदम मजा आला. अडीच तासांच्या करमणुकीनंतर मन खरोखरच हलके फुलके झाले.

श्रीधर या मद्रासी निर्मात्याचा 'प्यार किये जा' हा चित्रपट मद्रासी असूनही निर्मळ करमणूक करणारा. मोठी कुटुंबे, खलनायक, दुःखांचे डोंगर, आसवांचे पूर आदी 'पेट' मद्रासी फॉर्म्युले याच्यात मुळीच नाहीत. आता प्रत्येक पात्राजवळ मोठमोठ्या मोटारगाड्या आहेत. अगदी रिटायर्ड शाळामास्तरच्या मुलाजवळसुद्धा. परंतु तिकडे दुर्लक्ष करायचे. खरी गंमत आहे ती या पात्रांनी घातलेल्या स्वैर धांगडधिंग्यात.

कथा अशी विशेष नाही. आपल्या श्रीमंत मालकाच्या मुलीला पटविण्यासाठी शाळामास्तरचा एक तरुण मुलगा ( शशी कपूर ) आपल्या दुसऱ्या श्रीमंत मित्राला ( किशोर कुमार ) वेशांतर करायला लावून कोट्याधीश बाप बनवतो. आणि ते दोघे मग धुमाकूळ घालीत त्या मालकाच्या दोन मुली मिळवतात. बस्स्. एवढीच कथा. कुठे गांभीर्याचा किंवा उपदेशाचे डोस पाजविण्याचा आव नाही. पण याच कथेत भरपूर विनोदाचे मसाले भरवून चित्रपट सतत प्रेक्षकांना हसत खिदळवीत जातो.

चित्रपट विनोदी आहे हे लक्षात ठेवूनच प्रत्येक पात्राने कामे केली आहेत. शशी कपूर एवढा गंभीर आणि धीम्या प्रकृतीचा नट. पण त्याने एवढे झकास काम केले आहे म्हणता. त्याच्या प्रत्येक अभिनयातून विनोदाचा जोष आहे. मस्त-वाल स्वैरपणाची भूमिका त्याने सुरेख वठविली आहे. किशोरकुमार मात्र त्याच्यापुढे फारच फिका वाटतो.

पण खरी मजा आणली ती मेहमूदने. मालकाच्या ( ओमप्रकाश ) फिल्म-वेड्या मुलाचे काम त्याने मनापासून, अतिशय समरस होऊन केले आहे. मेहमूद आहेच गुणी नट. त्याला संधी दिली तर त्याच्या गुणांचे चीज होते. प्रत्येक भूमिका

तो पूर्ण समजून घेऊन करतो. 'छोटे नबाब', 'दिल तेरा दिवाना' याचित्रपटांतील त्याच्या भूमिका त्यामुळेच लक्षात राहतात. याही चित्रपटास त्याने स्वतःच प्रोडयूसर, डायरेक्टर, अॅक्टर बनून स्वतःची फिलम काढण्याची स्वप्ने पाहणाऱ्या मुलाची बेफाट भूमिका वठविली आहे. त्याच्या शब्दाशब्दांतून आणि प्रत्येक हालचालीतून हा स्वप्नाळूपणा जाणवतो. फिल्मी डायरेक्टर्सच्या बोलण्यातील लकबी त्याने पुरेपूर उचलल्या आहेत. वाक्यावाक्यांगणिक तो प्रेक्षकांना गुदगुल्या करीत जातो. प्रक्षक तो पडद्यावर केव्हा येतो याची वाट बघत असतात.

मेहमूदने कमाल केली आहे ती बापाला आपल्या सस्पेन्स पिक्चरची स्टोरी सांगताना. वाऱ्याचा घोघावणारा ध्वनी, दूरवरून येणारे बुटांचे आवाज, पाण्याचे थेंब ठिबकणे, बेडकांचे ओरडणे, गंजलेले दार 'क र्र र्र र्र... ' करीत उघडल्याचा आवाज, चुडेलीचे हसणे आणि शेवटची भयाण किंकाळी हे सारे अशा काही गमतीदार पद्धतीने त्याने आपल्या बापाला सांगितले आहे की हसता हसता पोट दुखून जाते.

शशी कपूरच्या प्रेयसीचे काम केले आहे कुणा एका दक्षिणी राजश्रीने. काही काही शॉट्स्मध्ये तिच्याकडे पाहवत नाही. पण प्रेमज्वराने विव्हल होऊन तिने केलेले नृत्य बऱ्याच जणांना चटका लावील. ओम्प्रकाशने नेहमीच्या सफाईने श्रीमंत मालकाचे काम केले आहे. त्याच्या मोठ्या मुलीचे कल्पना हिने बरे काम केले आहे. पण मेहमूदने आपल्या भावी चित्रपटासाठी हिरॉईन म्हणून निवडलेली मुमताज तिच्यापेक्षा चांगली दिसते आणि कामही बरे करते. लक्ष्मीकांत प्यारेलालचे संगीत वातावरणनिर्मितीला पोषक आहे. अधूनमधून ते फार कर्कश वाटते एवढेच. फोटोग्राफीदेखील आल्हाददायक आहे. रंगसंगती छान आहे. शशी कपूर एकदम देखणा दिसतो.

थोडक्यात 'प्यार किये जा' म्हणजे डोक्याला बिलकूल त्रास नाही. चष्मिष्ट टीकाकारांना कदाचित चित्रपट आवडणार नाही. १७ तांत्रिक चुका आणि १८ दिग्दर्शनाचे दोष दाखवून ते नाके मुरडतील. पण त्याला अर्थ नाही. परीक्षेत नापास झाले असाल, प्रेमभंग झालेला असेल, नोकरी सुटली असेल तर दीड रुपयाचे तिकीट काढून बिनदिक्कत 'प्यार किये जा'ला जाऊन बसायला हरकत नाही. एकदम मजा वाटेल. ●



# बिग डील अॅट डॉज सिटी

## अत्युत्कृष्ट दिग्दर्शन

काही चित्रपट असे असतात की, टायटल्समध्ये 'दिग्दर्शकाचे नाव' असले तरच कळते की, या चित्रपटाला दिग्दर्शक आहे म्हणून! परंतु नुकताच याला सर्वस्वी अपवाद असा चित्रपट पाहिला. पदोपदी दिग्दर्शक दिसावा असा. पात्रांची निवड एकदम चोख. सर्व पात्रांनी आपापल्या परीने चांगली कामे केली आहेत; परंतु तरीदेखील जाणवत राहते की, या चित्रपटावर 'इम्पॅक्ट' आहे तो एका पात्राहून वेगळ्या व्यक्तीचाच–दिग्दर्शकाचा.

चित्रपटाचे स्थळ अर्थातच डॉज शहर! हॉटेल पॉलोमर येथे सारे कथानक घडते. 'पोकर' हा जुगाराचा एक प्रकार. चित्रपटाची कथा या भोवतीच गुंफली आहे. पाच अट्टल जुगारी जुगार खेळायला बसतात. अगदी अटीतटीने खेळ चालू असतो. मोठमोठ्या रकमा क्षणोक्षणी ओतल्या जात असतात. चार्ल्स बिकफोर्ड, बर्गेस मेरिडिथ, जोन वुडवर्ड प्रभृतींनी ही जुगाऱ्यांची कामे केली आहेत. साऱ्यांचे चेहरे कसे एकजात मख्ख. 'पोकर'ची मख्खी चेहरे अगदी शून्यवत्, मख्ख ठेवण्यातच असते. तुमच्या हातातील पानांबरोबर जर तुमच्या चेहऱ्यावरील बरोबर भाव बदलू लागते तर मग सगळा खेळ खलास. ही पात्रेसुद्धा वल्ली आहेत. एक मुलीचे लग्न टाकून तसाच खेळायला आलेला, सारखा बडबड करणारा, पूर्ण व्यवहारी एक मिशीवाला पंतोजी, तर दुसरा भय वाटावे अशा थोराड चेहऱ्याचा, तर तिसरा रेखीव नाक-डोळे असलेला. साऱ्यांचे चेहरे असेच तऱ्हेवाईक. एकमेकांबद्दल अजिबात थांगपत्ता लागू न देणारे. इरेला पेटलेल्यांचा हा खेळ दिग्दर्शकाने कलात्मकतेने चितारला आहे. हॉटेलच्या भोजनगृहात खेळ जेथे चाललेला असतो, तेथे कोणालाही जाण्यास मुभा नसते. हॉटेलातील प्रमुख नोकर क्षणाक्षणाला आत काय लागेल ते नेऊन देत असतो. बाहेर असंख्य लोक ताटकळत उभे असतात. कोण जिंकले, हे ऐकण्यास ते अतिशय उत्सुक असतात. नोकराजवळ क्षणाक्षणाला ते चौकशी करतात, शिगोशीग भरलेले हे औत्सुक्य दिग्दर्शकाने चांगलं टिपलंय. नोकराची आत जाण्याची पद्धत, बाहेर येताच जोराने दार आपटून लावतानाची त्याचा उर्मटपणा आणि हॉटेलातील असंख्य जुगारवेडयांच्या चेहऱ्यांवरील बदलते भाव यामुळे हा परिणाम फार चांगला साधला आहे. औत्सुक्याला असे उधाण आले असतानाच कथेच्या मुख्य भागाला आरंभ होतो. पति-पत्नी आणि त्यांचा एक लहान

मुलगा हे त्या हॉटेलात मुक्कामाला येतात. पत्नी अतिशय सालस, सुस्वभावी. पर्त (हेन्री फोंडा) एकेकाळी अट्टल जुगारी. परंतु या जुगारानेच त्याचे सारसर्वस्व हिरावून नेले. पत्नीला वचन देऊन गेली कित्येक वर्षे पत्त्यांच्या पानाला त्याने स्पर्श केलेला नाही. हे सारे ध्यानात यायला हवे; कारण, आपण जेथे उतरलो आहोत त्याच हॉटेलात एक मोठा जुगाराचा डाव चालला आहे हे समजताच खऱ्या मूळच्या जुगारी इसमाची होणारी तळमळ हेन्री फोंडाने समर्थपणे दाखवलेली आहे. त्याला राहवत नाही. सर्वांच्यादेखत तो पत्नीपुढे 'मला फक्त खेळ पाहू दे...' अशी विनवणी करतो. खूप आणाभाका झाल्यावर ती त्याला कशीबशी परवानगी देते. ती पण आहे मोठी धूर्त. स्वतःच्या पोराला आपल्याबरोबर बाहेर नेत नाही. बापाबरोबरच ठेवते पोराचे बापावर लक्ष असावे म्हणून. आसुसलेल्या चेहऱ्याने तो जुगाराचा डाव पाहू लागतो. व्याकुळता वाढते. त्याला अगदीच राहवत नाही नि तो खेळात पडतो. परंतु त्या दिवशी त्याचे नशिबच दगा देते. साऱ्या आयुष्याची कमाई–चार हजार डॉलर्स–तो गमावून बसतो. त्याची अवस्था आणखी केविलवाणी होते. त्याची पत्नी येते. आपली अगदी काटकसरीने साठवून ठेवलेली संपत्ती गेली हे पाहून तिला ब्रह्मांड आठवते. आणि त्याच वेळी एकाएकी असहाय झालेल्या तिच्या पतीला हृदयविकाराचा झटका येतो. एकच धावपळ होते. डॉक्टर येतात. पत्नीचे काळीज गलबलून जाते. फळीच्या स्ट्रेचरवर घालून त्याला नेण्यात येते. जाताना तो आपल्या हातातील पाने आपल्या पत्नीच्या हाती देतो–तिने अपुरा डाव सोडू नये म्हणून. बिचारी पत्नी–पापभीरू व सालस. पत्ते तिने आयुष्यात कधीही हातात धरले नाहीत. परंतु तिचा नाइलाज होता. साऱ्या आयुष्याची पुंजी पणाला लागली होती. ती इरेला पडली. गेलेला पैसा परत मिळविण्याशिवाय तिला गत्यंतरच नव्हते. पाच अट्टल जुगाऱ्यांबरोबर ती जुगार खेळायला बसली. आणि पहिले वाक्य तिने उच्चारले, "मला कुणीतरी हा खेळ खेळायचा कसा ते शिकवा." सारे आश्चर्याने थिजून गेले. जुगारात आधी बाईचे कामच काय ? येथे तर बाई जिद्दीला पेटून खेळायला बसली आहे–खेळ माहीत नसताना. तसेच तिच्याकडे पैसे नसतात. शेजारच्या बँकेतून पैसे घेऊन यावयास ती निघते–आपल्या डावाची पाने हातात घेऊन. तेवढ्यात एकजण शंका काढतो. या बाईने बाहेर गेल्यावर पाने बदलली तर ? तेव्हा तो बाईने एकटे जाण्यास आक्षेप घेतो. तेवढ्यात दुसराही आणखी एक शंका काढतो. बाई बाहेर गेल्यावर उरलेले पाच खेळाडू आपल्या पानांत बदल कशावरून करणार नाहीत ? तेव्हा सारेच जण आपापली पाने हातात घेऊन बाई-बरोबर बाहेर पडतात ही 'सिच्युएशन' मोठी झकास घेतली आहे, बँकेच्या मॅनेजरला (पीटर लॉकर्स) ती तारण म्हणून आपली चक्क पत्त्याची पाने दाखविते. तिची असहायता, व्यथा त्यातून प्रकटते. आणि मग परत सर्वजण डाव खेळण्यासाठी बसतात. बाई डाव जिंकते आणि मग काय पैसाच पैसा. अक्षरशः पाण्यासारखा पैसा



चित्रपटातील
एक प्रसंग

ती मिळवते.–शेवट–हिंदी सिनेमासारखा–म्हणजे गोड हृदयविकाराच्या झटक्यातून तिचा पती बरा होतो आणि ते दांपत्य परत सुखाने कालक्रमणा करू लागते !

या कथेचे दिग्दर्शकाने अक्षरश: सोने केले आहे. असा प्रभावी दिग्दर्शक असलेला चित्रपट बऱ्याच दिवसांत पाहिला नव्हता. दाराची विशिष्ट उघडझाप, मख्ख, शून्य चेहऱ्याची पात्रे. हेन्री फोन्डा आपली कमाई जुगारासाठी ओतत असताना त्याच्या मुलाचे जात असलेल्या पैशाकडे अर्थगर्भ पाहणे, वल्ली–डॉक्टर हे सारे दिग्दर्शकाच्या बारीक सारीक निरीक्षणाचे यश होय. मूळ कथेला न्याय देणारा दिग्दर्शक भेटला तर ती कथा कशी सुरेखपणे चित्रित केली जाते याचे 'बिग डील अॅट डॉज सिटी' हे उदाहरण ठरावे.

# ट्रेन

## हृदयस्पर्शी घटनेवरील चिरस्मरणीय चित्रपट

दुसरे महायुद्ध अखेरीला आलेले, सर्वत्र पीछेहाट होत असलेल्या जर्मनांना पॅरिसमधूनही माघार घ्यावी लागणार हे स्पष्ट झालेले, अशा परिस्थितीत पॅरिसच्या जॉ डी पॉम संग्रहालयातील निवडक चित्रे जर्मनीत घेऊन जाण्याची योजना नाझी कर्नल आखतो. युद्धाच्या ऐन धामधुमीतही त्याने या संग्रहालयाचे संरक्षण केलेले असते ते याच हेतूने. हा अमूल्य खजिना सुरक्षितपणे जर्मनीत न्यावयाचा, याखेरीज दुसऱ्या कशाचीही त्याला पर्वा नसते. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आज्ञा

डावलण्यास तो तयार झालेला असतो, त्यासाठी कितीही लोकांचे बळी घेतले गेले तरी त्याला दुःख नसते. इतरत्र निकड असलेले सैन्य, चित्रे जर्मनीत सुरक्षितपणे न्यावी म्हणून वापरण्यास तो तयार झालेला असतो.

पण तरीही त्याची योजना फसते. याला कारण फ्रेंच भूमिगत चळवळीचे मुख्यतः रेल्वेतच काम करणारे स्वयंसेवक. चित्रे घेऊन जाणाऱ्या ट्रेनचा ताबा ते आपल्याकडे घेतात. दुसऱ्याच मार्गावरून ती नेतात व स्टेशनांवरील पाट्या बदलून योग्य मार्गाने चालली आहे असे दाखवितात व शेवटी ट्रेन पुनः पॅरिसलाच आणतात. त्यांच्या या कृत्याने जर्मन कर्नल वैतागतो व अधिकाधिक निश्चयाने प्रतिकार मोडून काढण्याचा विफल प्रयत्न करतो.

या सत्य घटनेवर आधारलेला हा चित्रपट फ्रान्समध्येच तयार केला आहे. प्रतिकार करणाऱ्या रेल्वेमेनचे नेतृत्व असते बर्ट लँकेस्टरकडे. बेफिकिरीने भूमिका करण्याची त्याची नेहमीची पद्धत येथे अगदी फिट्ट बसली आहे. पण खरी रुखरुख लावून जातो. जर्मन कर्नल फ्रान्झव्हॉन वाल्डहॅम, ब्रिटिश रंगभूमीवरच मुख्यतः कामे करणाऱ्या व दुसरा रिचर्ड बर्टन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पॉल स्कॉफील्डने, जर्मन कर्नलची भूमिका जिवंत साकार केली आहे. चालण्यात किंवा त्याच्या शारीरिक आविर्भावात तो रंगभूमीवरील नट असल्याचे स्पष्ट जाणवते. पण बर्ट लँकेस्टरबरोबरच्या काही समोरासमोरच्या प्रसंगात त्याने कमाल केली आहे. लष्करी अधिकाऱ्याची घीमी, बेडर वृत्ती व कलाप्रेमी मन याचा समतोल त्याच्या चेहऱ्यावरून कधीही ढळला नाही.

युद्धप्रसंगावरील इंग्रजी चित्रपटांतील छोट्या छोट्या भूमिका काही वेळा मनावर कायमचा ठसा उमटवून जातात. 'ट्रेन' मधील सर्वांगाने सुटलेला इंजिन ड्रायव्हर पॉपबलू ( मिचेल सायमन ) असाच चटका लावून जातो. रंगचित्रांचे रक्षण का करावयाचे हे त्याला माहीत नसते, पण स्टेशनमास्तरने सांगितले की ही चित्रे म्हणजे फ्रान्सचे वैभव आहे आणि नाझी ती लुटून नेत आहेत. एवढी सूचना त्याला इंजिनमध्ये बिघाड होईल अशी व्यवस्था करून ठेवण्यास पुरेशी होते. यामुळे शेवटी त्याला 'विध्वंसक कृत्य' केले म्हणून नाझी शिपायांच्या गोळ्यांना बळी पडावे लागते.

समर्थपणे फिरणारा कॅमेरा व स्वतःची प्रज्ञा यांच्या साहाय्याने दिग्दर्शक जॉन फ्रँकनहैअर यांनी चित्रपट सजीव बनविला आहे. वाफेच्या रेल्वेइंजिनाचा बाँबफेक्या विमानांनी केलेल्या पाठलागासारखे वेगवान दृश्य किंवा रेल्वेयार्डातील शंटिंग त्यांनी अतिशय वास्तव उभे केले आहे. उत्कृष्ट अभिनय, झकास छायाचित्रण, समर्थ दिग्दर्शन व हृदयस्पर्शी कथा यांमुळे 'ट्रेन' चिरस्मरणीय ठरला आहे.

• • •

## आपण आपला अंक कोठून घेणार ?

स्थानिक विक्रेत्यांकडून घेतला तरी हरकत नाही.
पण वर्गणीदार होण्याचे ठरवत असाल तर
या आकर्षक सवलतीचा आपण विचार करू शकता.

'माणूस' साप्ताहिकाची दिवाळी अंकासहित
वार्षिक वर्गणी आहे रुपये वीस.

# १००

पाच वर्षांची वर्गणी होते रुपये शंभर. आपण पाच वर्षांची शंभर रुपये वर्गणी 'माणूस'कडे एकदम भरली तर सहा वर्षे-- *एक वर्ष अधिक*

माणूस साप्ताहिकाचे अंक आपल्याला घरपोच मिळतील.
म्हणजेच वर्गणीत वीस टक्के सवलत मिळून आपली
वीस रुपये बचत होईल.
आपण मनात आणले तर ही


## माणूस पंचवार्षिक ग्राहक योजना

यशस्वी करणे आपल्याला मुळीच अवघड नाही.
स्वावलंबनाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून,
अधिक अन्नासाठी, अधिक पाण्यासाठी—
'माणूस'ने सव्वा लाखाचे हे प्रस्थान ठेवले आहे.
आपणही या प्रस्थानयात्रेत सहभागी होऊ शकता.
हा प्रजासूय यज्ञ सिद्धीस नेऊ शकता.



*रामायणातल्या*
*त्या छोट्या खारीइतका*
*पुण्य संचय करू शकता.*

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**